शनिवार । १८ जून १९७७
७५ पैसे
माणूस

# काँग्रेसजनांचे पक्षांतर का लांबत आहे ?

माहितगार

काँग्रेस आमदार काँग्रेस सोडणार, काँग्रेसजन नव्या पक्षाची स्थापना करणार अशा बातम्या अधूनमधून प्रसिद्ध होत आहेत; परंतु काँग्रेस आमदारांनी पक्ष सोडलेला नाही म्हणून या बातम्या खोटया मानावयाच्या काय ? सामान्य माणसाचा तसा समज होणे स्वाभाविक आहे. मात्र महाराष्ट्र काँग्रेसच्या, त्याचप्रमाणे विरोधी (महाराष्ट्रातील) पक्षाच्या वर्तुळात प्रसिद्ध झालेल्या बातम्या खोटया आहेत, त्यांना काही आधार नाही, असे मानले जात नाही. काँग्रेस आमदार व काँग्रेसजन पक्ष सोडणार आहेत ही बातमीही खोटी नाही आणि त्याप्रमाणे प्रत्यक्षात घडत नाही, यामागचे गौडबंगाल काय आहे ? असा प्रश्न निर्माण होईल. प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांनुसार प्रत्यक्ष घटना घडत नाही यामागे सावधानता हे कारण आहे. त्याचप्रमाणे जनता व शे. का. पक्ष यांचेही कार्यकर्ते जबाबदार आहेत. उत्तर भारतात होणाऱ्या निवडणुकांचे निकाल काय लागतात हे काँग्रेसजन पाहात आहेत. समजा, काही राज्यांत काँग्रेस सावरली तर महाराष्ट्रात तिची परिस्थिती सुधारण्याची शक्यता आहे. अशी परिस्थिती निर्माण होणार की नाही हे स्पष्ट झालेले नसताना पक्ष सोडला आणि नंतर काँग्रेस पक्षाची परिस्थिती इतर राज्यांत सुधारली तर पक्षांतराचे वेळापत्रक चुकणार व त्यामुळे पक्ष बदलण्याचे राजकारण फसेल, ही सावधानतेची भूमिका काँग्रेसजन घेत आहेत. म्हणूनच उत्तर भारतातील निवडणुकांचे निकाल लागले व तेथे जनता पक्षाची सरकारे आली की महाराष्ट्रात पक्षबदलाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरू होईल. पक्ष सोडण्याच्या तयारीत कोणकोण आहेत याची माहिती आमदार-निवासाचा कानोसा घेता सहज मिळते. इतक्या उघडपणे काँग्रेसजन पक्ष सोडण्याची भाषा करतात. खोल्याखोल्यांमधून आपापल्या कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या जात आहेत. निवडणुकांच्या निकालानंतर आम्ही निर्णय घेऊ असे सांगणारेही आमदार आहेत. काही जण त्याच्यापुढे जाऊन असेही सांगतात की, आम्ही काँग्रेस सोडणार हे नक्की आहे. त्या निर्णयात बदल केला जाणार नाही. मात्र आम्ही एकटेच बाहेर पडणार नाही. आमच्याबरोबर इतरांना खेचण्याचा आमचा प्रयत्न आहे.

काँग्रेसजन पक्ष सोडणार हे स्पष्ट असताना ते कोणत्या पक्षात जाणार ? शे. का. जनता पक्षात जाणार की नवाच पक्ष काढावयाचा ? या पर्यायाचा बाहेर पडणाऱ्या नेत्यांनी विचार सुरू केला आहे. या नेत्यांवर त्यांना मानणारे अनुभवी कार्यकर्ते यांचा दबाव आहे. 'कोणत्या पक्षात जावयाचे हे नंतर ठरवा; पण प्रथम काँग्रेसमधून बाहेर पडा !' असा आग्रह कार्यकर्ते करीत आहेत. त्यांचा दबावही वाढत आहे. अलीकडेच पश्चिम महाराष्ट्रातील एका आमदाराच्या खोलीवर कार्यकर्त्यांची बैठक भरली असता त्या बैठकीत या आमदाराने असे विचार मांडले की आपण जी कृती करावयाची ती याच महिन्याच्या अखेरीस किंवा जुलै महिन्यापर्यंत केली पाहिजे. ही मुदत सांगताना तो आमदार म्हणाला की, विधानसभा निवडणुका लौकर घेण्यासाठी आमच्यावर दडपण

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक तिसरा

१८ जून १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९


आणले जात आहे असे मुख्य मंत्री पाटील म्हणू लागले आहेत. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये निवडणुका घेण्याचे ठरले आणि त्या सुमारास आम्ही पक्षातून बाहेर पडलो व जनता किंवा शे का. पक्षात सामील झालो तर निवडणुकीसाठी काँग्रेस पक्ष सोडला असा समज होईल आणि काँग्रेसत्यागाचा हेतू व त्याचे परिणाम व्हावेत तसे व्हावयाचे नाहीत यासाठी जो निर्णय घ्यावयाचा तो जूनअखेरपर्यंत किंवा जुलैमध्येच घेतला पाहिजे.

पक्ष केव्हा सोडावयाचा व कोणत्या पक्षात जावयाचे याविषयी काँग्रेसजन सावधानतेची भूमिका घेत आहेत त्याच वेळी जनता पक्ष व शे का पक्षही काँग्रेसजनाना सहजासहजी, हुरळली मेंढी लागली लांडग्याच्या मागे या पद्धतीने– पक्षात घेण्यास तयार नाहीत काँग्रेसचे काही नेते शेतकरी–कामगार पक्षाच्या नेत्याना भेटले होते 'या लोकाना आमची दारे बद नाहीत, पण त्याच्या प्रवेशामुळे आमच्या पक्षाच्या इभ्रतीवर परिणाम होणार नाही ना हे पाहून त्याना पक्षात घेऊ.' असे शे. का. पक्षाचे कृष्णराव धुळप, दाजीबा देसाई, एन. डी. पाटील आदी नेते म्हणतात. शंकरराव चव्हाण, पी के. सावत हे दोघे शे. का पक्षात आले तर आणीबाणीतील व्यवहाराशी त्याचा जवळचा संबंध असल्याने त्याचा पक्षप्रवेश आम्हाला किती परवडणारा आहे याचा विचार करावा लागेल असे ही नेतेमंडळी म्हणतात, परतु त्याच वेळी या लोकाना आमची दारे बद आहेत असे नव्हे, असे स्पष्टीकरण ते देतात जनता पक्षाच्या बाबतीतही हीच गोष्ट आहे त्याशिवाय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्येही काँग्रेसजनाना पक्षात घेण्यावरून काही मतांचा आग्रह आहे. गेली तीस वर्षे विरोधी पक्ष वनवासात होते. राजदरबाराच्या पायऱ्या चढण्याचा काळ आता कोठे येत आहे अशा वेळी काँग्रेसमधून येणाऱ्याना त्याच पायऱ्यावरून मानाने वर आणले तर आमच्या आजवरच्या कष्टाचे काय, हा विचार जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आहे. महाराष्ट्रात जनता पक्षाचा विचार करताना समाजवादी व जनसघ या दोनच पक्षाची दखल घ्यावी लागेल. काँग्रेसजन पक्षात आले तर त्याना पदे द्यावी लागतील व आपले काय होणार हा विचार समाजवादी कार्यकर्त्यांमध्ये फारसा कोणी बोलत नाही काँग्रेसचे विघटन झाले पाहिजे. पदांचा, जागाचा प्रश्न प्रतिष्ठेचा करून विघटन थाबवावे असे पूर्वाश्रमीच्या समाजवाद्याना वाटत नाही. हा प्रश्न जनसंघ कार्यकर्त्यांना गभीरतेने भेडसावीत आहे. बहुजन समाजाच्या कार्यकर्त्यांना समाजात स्थान राहील आणि आपण बाजूला पडू हा विचार जनसघाच्या कार्यकर्त्यांना अस्वस्थ करून सोडीत आहे. राष्ट्रीय स्वयसेवक सघाच्या शाखेवर रुजविलेले विचार त्याच्या मनात उफाळून येत आहेत जनसंघाचे स्थान शहरांतील काही भागात आहे समाजवाद्याची परिस्थिती थोडी वेगळी आहे काही शहरात व ग्रामीण भागात बऱ्याच ठिकाणी त्याचे कार्य असल्याने आपल्या कार्याच्या जोरावर आपल्याकडे जनता पक्षाला पाहावे लागणार आहे ही त्याची भूमिका आहे त्यामुळे आपल्याला कोणी खाऊन टाकील याची भीती त्याना वाटत नाही. म्हणून ते काँग्रेसजनांना जनता पक्षात घेण्यास राजी आहेत, पण ज्याच्या चारित्र्याविषयी शका आहे त्याना मानाची जागा देता कामा नये असा तात्त्विक आग्रह पूर्वाश्रमीचे समाजवादी घेत आहेत.

आपल्या वनवासाचा विचार करीत असल्यामुळे काँग्रेसमधून येणाऱ्या काँग्रेसजनाना जनता पक्षात प्रवेश करू देण्याबाबत जनता पक्ष फारसा प्रयत्न करीत नाही फुटीर काँग्रेसजनाच्या प्रमुख नेत्याने जनता पक्षाच्या नेत्याना भेटण्याचा निरोप दिला होता. तो निरोप महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष एस एम जोशी याच्यापर्यंत पोचू दिला नाही महाराष्ट्रात बहुजनसमाज बरोबर आल्याशिवाय पक्ष वाढणार नाही, त्याची पाळेमुळे खोलवर रुजणार नाहीत हे एसेम ओळखून आहेत पूर्वाश्रमीचे जनसंघीय बदलतील, पण अद्यापही त्याचा आर्थिक दृष्टिकोण काय आहे ? एका क्रियाशील कार्यकर्त्याला आर्थिक प्रश्नासबधी मी विचारले तेव्हा त्याने पूर्वीच्या जनसघात अर्थशास्त्राची पदवी घेणारे, पदके मिळवणारे, कोणकोण आहेत त्याची नामावळी सांगितली. पदके का पदवी मिळविणारे पक्षात आहेत याचा अर्थ पक्षाला आर्थिक दृष्टी आहे असा कसा होतो ? पण या कार्यकर्त्याने आर्थिक प्रश्नावर आपले विचार सांगण्याऐवजी वरील

नावाचीच जत्री सांगितली. शिवाय आर्थिक प्रश्नापेक्षा भावनिक प्रश्न महत्त्वाचे आहेत असेही तो म्हणाला सामाजिक वा आर्थिक विचार न करता जनसंघाचे कार्यकर्ते भावनिक प्रश्न जोपासू लागले तर ते मुख्य प्रवाहापासून बाजूला पडल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणूनच जनता पक्षावर जनसंघाचा प्रभाव राहणार नाही. जो विचार जोपासतो त्याची प्रगती होते. म्हणजेच माणूस बदलतो. काँग्रेसजन, समाजवादी याचा प्रभाव पक्षावर राहू नये असे जनसंघवाल्यांना वाटते. त्यामुळे ते काँग्रेसजनाना पक्षात घेण्याबाबत उत्सुक नाहीत आणि समाजवाद्याविषयी त्याना काही बोलता येत नाही.

महाराष्ट्रात काँग्रेसनतर ग्रामीण भागापर्यंत पोचलेला दुसरा पक्ष कोणता असेल तर तो शे. का. पक्ष आहे. अलीकडच्या काळात हा पक्षही मर्यादित राहिला आहे बडया जमीनदारवर्गाचे प्रतिनिधित्व करणारा, पण तोडाने जहाल भाषा बोलणारा असे शे का पक्षाचे वर्णन केले जाते. या पक्षाला बरोबर घेऊनच महाराष्ट्रातून काँग्रेसला शह देता येईल याची खात्री जनता पक्षाच्या नेत्याना आहे जनता पक्षाचे नेतृत्व जातीने ब्राह्मणी आहे हा जनता पक्षाचा अडसर आहे. म्हणून जनता पक्ष तोडाने मार्क्सवादाची भाषा बोलणा-या शे का पक्षाला बरोबर घेऊन ग्रामीण भागापर्यंत पोचू पाहात आहे. जनता पक्षाची देशात लाट आहे. आपली ताकद खच्ची झालेली आहे. आपल्या पक्षाला पुन जम बसवावयाचा असेल तर, जनता पक्षाच्या लाटेत सामील झाले पाहिजे हे शे का. पक्ष ओळखून आहे. म्हणून त्याने जनता पक्षाबरोबर समझोता केला आहे.

शे का पक्ष जनता पक्षाला बरोबर घेऊन सत्तेचा सोपान चढण्याची स्वप्ने रगवीत आहे हे पाहून गृहमंत्री शरद पवार, शे का पक्षाला काँग्रेसबरोबर घेण्याचा प्रयत्न करीत आहेत श्री. पवार यानी अलीकडे तसा प्रयत्न केला, असेही सागण्यात येते. शे का. पक्ष नेत्याची श्री. पवार व त्याचे मध्यस्थ यानी भेट घेतली. जनता पक्षाबरोबर समझोता करून सत्तेत सहभागी होण्याचे शे का पक्षाचे स्वप्न साकार होईल की नाही कोण जाणे ! त्यापेक्षा आताच तुम्ही सत्तेवर आलेल्या काँग्रेसशी सहकार्य करा व सत्तेत सहभागी व्हा, असे पवार यानी एन. डी पाटील आदीना सागितले, अशी चर्चा चालू आहे श्री. शरद पवार यानी महाराष्ट्र काँग्रेसच्या शिबिरात शे का , कम्यु (उजवे) लोकशाही समाजवादावर निष्ठा असणारे पक्ष याच्याशी समझोता करावा, अशी सूचना केली होती त्यामुळे पवार–एन. डी पाटील-चर्चा झालीच नसावी, असे म्हणता येत नाही. अर्थात एन डी. पाटील यानी पवाराच्या प्रयत्नाला वाटाण्याचा अक्षता लावल्या, ही गोष्ट वेगळी !

पवार शे का पक्षाशी जमवून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्याला यशवतराव चव्हाण याची मान्यता असणार हे उघड गुपित आहे ! शे का. पक्षाशी समझोता झाला तर आपली व यशवंतराव चव्हाण याची ताकद पक्षात वाढेल, असाहो हिशोब पवाराच्या प्रयत्नामागे आहे. भ्रष्ट म्हणून काही मन्त्र्याविरुद्ध मोहीम चालू ठेवायची, दादा व नाईक-गटाला कमकुवत करावयाचे व त्याचबरोबर काँग्रेसनतर असलेल्या दुसऱ्या मोठ्या पक्षाबरोबर समझोता करावयाचा यामागे ताकद वाढविण्याचे राजकारण आहे. ते किती यशस्वी होणार हा प्रश्न वेगळा ! काँग्रेसमधून एक गट बाहेर गेला तरी पक्ष सावरावयाचा म्हटले तर काँग्रेसला इतर कोणाच्या तरी पाठिंब्याची कुबडी घ्यावी लागणार, अशी महाराष्ट्र काँग्रेसच्या नेत्याची धारणा झालेली आहे

फारसा प्रयत्न न करता काँग्रेसजनानी पक्ष सोडला तर त्याना पक्ष-प्रवेशावेळी आश्वासने द्यावी लागणार नाहीत, असे जनता पक्षाला वाटते. महाराष्ट्रातील काँग्रेसजन, जनसघ असलेल्या जनता पक्षात जाणार नाहीत, तर ते आपल्या पक्षात येतील व आपली ताकद वाढेल, असे शे का पक्षाला वाटते. कोणत्याच पक्षात गेलो नाही आणि आपण स्वतत्र पक्षच काढला तर समान तत्त्वावर आपल्याला जोखले जाईल व निवडणुकीत शे का , जनता व फुटीर काँग्रेसजनाचा नवा पक्ष असा समझोता करून महाराष्ट्राचे राजकारण करावे, असा नाराज काँग्रेसनेत्यांचा प्रयत्न आहे. म्हणूनच काँग्रेसमधून बाहेर पडणाऱ्या लोकाच्या बातम्या येत असल्या तरी प्रत्यक्ष घटना लाबत आहे. □


☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

□ **सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

□ **टॉलस्टॉय एक माणूस**
सुमती देवस्थळे

□ **श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर

□ **शतपावली**
रवींद्र पिंगे

□ **पुरंदऱ्यांची दौलत**

□ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो पुरंदरे

☆ ☆

## दिल्ली-अलिगड-पाटना-बिहार निवडणूकपूर्व विश्लेषण

# जनता-विजय अन्त्योदयास पूरक ठरेल का ?

प्रा. प्रवीण सप्तर्षी

### दिल्ली सोडता सोडता

दिल्लीच्या निवडणुकांची कल्पना वाचकांना मागील अंकातील लेखावरून आली असेलच. जनमानसातील राजकारणाबद्दलची उदासीनता धोकादायक आहे असे त्यात मी म्हटले होते. या उदासीनतेमुळे येथील उमेदवारही अस्वस्थ आहेत त्यामुळे निवडून येण्यासाठी कोणतीही अॅडजस्टमेंट करायला तो तयार आहे. या उदासीनतेमुळे मतदारांबरोबर उमेदवारांचेसुद्धा राजकीयीकरण सकोच पावते, हे पाहताना निश्चितच खेद होतो. याचे एक उदाहरण द्यायचे झाले तर अजमेर गेट या कौन्सिलच्या मतदारसघातील देता येईल. जनता-पार्टीची स्थापना झाल्यापासून पूर्वीचे जनसघ आणि समाजवादी एकत्र येण्याची ऐतिहासिक घटना झाली. या दोन्ही पक्षातील चांगल्या गोष्टींचा एकमेकांवर परिणाम होणे मी जाणू शकतो; परंतु ज्या निधर्मीवादाचा पाया या जनता पक्षास आहे त्याच जनता पक्षातले उमेदवार प्रचाराचा नारळ फोडण्यासाठी यज्ञ करतात ही अत्यंत खेदजनक गोष्ट आहे. पाच-सहा उमेदवार, उघडेबब होऊन, जानवे घालून यज्ञामध्ये पळीपळीने तूप टाकतात पाहून हसावे की रडावे हे कळेना. जनता पक्षाच्या झेंड्याखाली आणि मडपाखाली असले प्रकार पाहून जयप्रकाशजींना काय वाटेल, हे विचारल्यावर ते लोक जरा अस्वस्थ झाले. तेवढ्यात पायी चालत व पत्ता शोधीत प्रमिलाताई दंडवते तेथे आल्या त्याना तेथे प्रचार सभेसाठी आमत्रण होते त्याना आणण्यासाठी उमेदवारातर्फे गाडी जाणार होती, परंतु २-३ तास उशीर म्हणजे येथल्या लोकाना विशेष वाटत नाही. 'मत्र्याची गाडी मी जनता पक्षाच्या प्रचारार्थ वापरू शकत नाही म्हणून बसने आले.' प्रमिलाताईंनी आपली अडचण सागितली. 'यज्ञ' प्रकरणाबद्दल त्यानी त्याच्या भाषणात जेव्हा खेद व्यक्त केला, तेव्हा मात्र पूर्वीच्या समाजवादी तरुण उमेदवाराने आपले जानवे हळूच तोडले. तुम्ही धर्म घरी पाळा, सार्वजनिक ठिकाणी धर्माचे अवडबर माजवू नका, त्यामुळे जे. पी नी सागितलेल्या सपूर्ण क्रातीचा मार्ग खडित होतो, असे प्रमिलाताईंनी त्याना बजावले.

एकंदरीत जसजशी जनतालाट ओसरू लागते तसतसे घटक पक्ष आपापली डोकी वर काढताना दिसतात. त्यामुळे जनता पक्षाच्या पुरोगामित्वास अडचण येणार आहे 'सतनगर' भागातील उमेदवार जसबीरसिंग आणि त्यांचा मित्र तेजीन्दरसिंग यांना याबाबत विचारल्यावर त्यानी ही अडचण व्यक्त केली. ते म्हणाले, 'लोकसभा निवडणुकीमध्ये ज्या उत्साहाने दलितवर्ग सामील झाला होता तेवढा उत्साह सध्या दिसत नाही' 'दलिताना जर जास्त तिकिटे दिली तर हा प्रश्न सोपा झाला असता का' असे विचारल्यावर मात्र त्याने नकारार्थी उत्तर दिले जसबीरसिंग म्हणाला, 'असल मे वो 'कोटा' सिस्टीम ही बहुत बुरी है।' जनतापार्टीने काँग्रेसप्रमाणेच निरनिराळ्या घटक पक्षाना कोटा ठरवून दिला, त्याबद्दल हे तरुण उमेदवार नाराज आहेत शिवाय तरुण, दलित उमेदवाराकडे स्वत चे रिसोर्सेस कमी आहे. त्याना वरून मदत होत नाही दलित उमेदवाराचे बॅनर्सही त्याच्या कपड्याप्रमाणेच फाटके दिसले काँग्रेसच्याही दलित उमेदवाराची हीच अवस्था दिसून येते म्हणूनच जनता पक्षातील अशा उपेक्षित उमेदवाराचा काँग्रेसलाही फायदा मिळणार नाही.

निवडणुकीच्या राजकारणास महत्त्व दिले गेल्याने महिलावर्गाची उपेक्षाही दिल्लीमध्ये दिसून येते. १०० कॉर्पोरेशनच्या जागासाठी एकही महिला-उमेदवार जनता पक्षाच्या उमेदवार-यादीत नाही ५६ कौन्सिलच्या जागापैकी केवळ तीन जागा महिलाना दिलेल्या आहेत काँग्रेसच्या बाबतही हीच उपेक्षा दिसून येते. असे असून सुद्धा मुस्लिम महिला मात्र मोठ्या सख्येने सभाना दिसतात. प्रमिलाताई दडवते यानी महिला दक्षता समित्या स्थापन केलेल्या आहेत त्यात बहुताशी मुस्लिम महिला कार्यकर्त्या आहेत त्याचा जनता पक्षास फायदा होईल. या कार्यकर्त्या महिलाची मागणी आता अशी आहे की, पालिकेसाठी नियुक्त सदस्यामध्ये सर्वच्या सर्व स्त्रिया असाव्यात. व्यावहारिक अडचणींचा बागुलबुवा पुढे करून मूलभूत तत्त्वाची पायमल्ली न करता जनता पक्ष पुढे कसा नेता येईल हा जनता पक्षनेत्याच्या कसोटीचा प्रश्न ठरलेला आहे, तर केलेल्या अपराधाची पुनरावृत्ती होऊ देणार नाही, याबद्दल जनतेत विश्वास निर्माण करून किमान जागा किती टिकविता येतील हा काँग्रेसनेत्यापुढे महत्त्वाचा प्रश्न आहे.

□

### तीन सुखीया मेल !

दिल्ली ते तीन सुखीया हा रेल्वेमार्ग गगानदीप्रमाणेच अनेक प्रांतांच्या सरहद्दी छेदून जातो दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, बगाल, मणिपूर व आसाम या प्रातातून जाणाऱ्या या रेल्वेमध्ये 'आतर-भारती दर्शन' ची आठवण होते. दिल्लीहून पटण्यास जाताना वाटेत अलिगड, फिरोजाबाद, कानपूर यासारखी महत्त्वाची शहरे लागतात. बिहार विधानसभा निवडणुकाचा वृत्तात देण्यापूर्वी या तीन शहरामधून उत्तर प्रदेशचे झालेले धावते दर्शन प्रथम वाचकासमोर ठेवतो

## उत्तर प्रदेश

अलिगड मुस्लिम विद्यापीठातील विद्यार्थीवर्ग आणीबाणीविरुद्ध मोठ्या सख्येने झगडला. लोकसभा–निवडणुकीमध्ये या विद्यार्थ्यांनी फार मोठे काम जनता पक्षाच्या वतीने केले. 'जनता पक्षाचे सरकार आल्यामुळे मुस्लिमाची गळचेपी दूर होण्याची शक्यता वाटते काय ?' असे एका पी एच. डी च्या विद्यार्थ्यास विचारले असता त्याने होकारार्थी उत्तर दिले बहुताशी विद्यार्थी भेटले ते पी. एच. डी. चेच विद्यार्थी होते. म्हणजेच उच्च सुशिक्षित मुसलमान विद्यार्थ्यांचा दृष्टिकोण या मुलाखतीत व्यक्त होतो. एक जण म्हणाला, " We are the majority in minority. लेकिन काँग्रेसने हमारे लिए कुछ नही किया. सिर्फ हमारे कम्युनिटीके अगरेस्टको खरीदनेकी कोशिश की है। हमारे युनिव्हर्सिटीमे स्टुडन्टस् पहलेसेही ॲन्टी–काँग्रेस थे और इस इलेक्शनमे भी रहेंगे।' मुस्लिम जातीयवादाबद्दल विचारल्यावर त्याचे साधे लॉजिक ते माडतात 'तुमच्यामध्ये ज्याप्रमाणे यादव यादवालाच मते देतो, रजपूत रजपूत उमेदवारालाच मते देतो तसे आम्ही मुस्लिम उमेदवारास मते दिली तर काय हरकत आहे ?' असे हे लॉजिक आहे लोकसभा निवडणुकाच्या निमित्ताने मात्र मुस्लिम मतानी धर्मवादाच्या कक्षा ओलाडल्या. हो मुस्लिम जातीयवाद सपुष्टात येण्याच्या दृष्टीने सुरू झालेली प्रक्रिया मात्र या निवडणुकाच्या वेळी थोडी कमी झालेली आहे ९००० विद्यार्थ्यांचे होस्टेल असलेल्या या विद्यापीठामध्ये फारच थोडे विद्यार्थी मुस्लिमातर्गत सास्कृतिक परिवर्तनाच्या दृष्टीने विचार करीत आहेत.

उत्तर प्रदेश–विधानसभा निवडणुकीमध्ये एकूण ४२५ जागासाठी २७७४ उमेदवार मैदानात उतरलेले आहेत सुमारे चार हजार उमदवाराना आपली उमेदवारी मागे घेतल्यानंतरची ही परिस्थिती आहे. यावरून उमेदवारीसाठी किती मोठ्या प्रमाणात झुबड उडालेली होती हे लक्षात येते. उमेदवाराची सख्या जास्तीत जास्त असलेले मतदारसघ म्हणजे झाशी (२०), अलाहाबाद (१९), मुरादाबाद (१८) आणि प्रतापगड (१७) ही होत केवळ १६ मतदारसघात दुहेरी सामना आहे तर ३२ मतदारसघात तिहेरी सामना होईल.

अपक्ष उमेदवाराचे महत्त्व जरी कमी झालेले असले तरी जनता पक्ष व काँग्रेसच्या दृष्टीने अपक्ष उमेदवारामध्ये युती झालेला एक गट त्रासदायक ठरेल असे दिसते. भारतीय समाजवादी पक्ष, पुनर्रचित लोकशाहीवादी काँग्रेस आणि क्रांतिकारक समाजवादी पक्ष यानी युती करून 'सयुक्त–मोर्चा' स्थापन केलेला आहे. त्यात नतर रिपब्लिकन पक्ष आणि फॉर्वर्ड ब्लॉकही सामील झालेले आहेत. एकूण ३२५ जागा लढविणारा सयुक्त–मोर्चा जनमानसात सहानुभूती जरी मिळवू शकत नसला तरी असंतुष्ट गटाना समावेशक व प्रोत्साहक असा तो ठरेल यात शका नाही.

जनता पक्षाच्या दृष्टीने सध्या अपक्ष विरोधकाचा प्रश्न ५० टक्क्यानी सुटलेला असला तरी एकूण ९० ते १०० अपक्ष उमेदवार पक्षाच्या विरोधामध्ये उभे आहेत. पक्षातील घटकपक्षाची नाराजी या वितरकाना फायद्याची रत आहे तिकिटवाटपाबद्दल असतुष्ट असलेला जनसघाचा एक कार्यकर्ता म्हणाला, 'महिलाना आणि अल्पसंख्यांक व हरिजन यांना तिकिटे देण्याच्या नावाखाली जनसघाच्या उमेदवाराची संख्या कमी केली गेली.' महिलाना २५–३० जागा देण्याचे आश्वासन मिळाले होते, परतु केवळ १२ जागा देण्यात आलेल्या आहेत जनतापक्षाचे लोकसभेच्या निवडणुकामधील सुमारे ३०० युवक कार्यकर्ते आता जनतापक्षाच्या विरोधी उभे आहेत. त्याची निवडून येण्याची शक्यता कमी असली तरी त्याच्या कार्याची उणीव जनता पक्षास भासत आहे हे नक्की. लखनौसारख्या मुस्लिमांचे वर्चस्व असलेल्या क्षेत्रात मुस्लिम उमेदवाराला तिकिट न देऊन जनता पक्षाने मोठा धोका पत्करलेला आहे जनता पक्षास विजय मिळणारच असे त्याचे नेते सागत असले तरी युवकशक्तीचा अभाव व असतुष्ट कार्यकर्त्यांचा असहकार यामुळे जनतापक्षाच्या प्रचारामध्ये आत्मविश्वास व उत्साह फारसा दिसून येत नाही. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे झेडयाची, पताकाची व पोस्टर्सची कमतरता त्वरित नजरेस येते.

याचा अर्थ मात्र काँग्रेसला फार चागले दिवस आलेत असे मात्र नव्हे काँग्रेसच्या प्रचारामध्ये जनतासरकारच्या स्थिरतेबद्दल, जनता पक्षाच्या एकीबद्दल वारवार बोलले जाते. प्रचाराचा सूर लोकसभा निवडणुकाप्रमाणेच आहे, परतु म्हणूनच तो गेल्या निवडणुकीप्रमाणे याही वेळेस जनतेच्या बरोबर जुळणारा नसेल असे म्हणणे योग्य ठरेल

सर्वसामान्य माणसाना विचारल्यावर त्याच्यात अजूनही जयप्रकाश नारायण, जनता पक्ष याबद्दल आदरभाव व सहानुभूती दिसते. त्याचप्रमाणे आणीबाणीतील अत्याचाराबद्दलचा राग गेलेला नाही जनतालाट कमी झाली असली तरी त्याचा फायदा काँग्रेसला मिळणार नाही. कानपूर स्टेशनवर पाणी वाटणाऱ्या पाण्याशी झालेली बातचीत बरेच काही सागून जाते. रात्री १० च्या सुमारास पाणी वाटण्याच्या ड्यूटीवर असलेला शकर म्हणाला, 'जनता राज हमारे लिए तो बहुत अच्छा है।'

'यहाँ कौन जीतनेवाला है ?' माझा प्रश्न.

'जनता तो आएगीही. हम बिहारी है इसलिए कहते है कि वहाँ भी जनता आएगी। लेकिन अब हम नाराज है। आपसमे खिचातानी बहुत हो रही है। वे समझते नही की जिस जनताने उन्हे यही रूप दिया उस जनताकी असलमे क्या हालत होगी।'

जनता पक्षाच्या गुणदोषावर चर्चा करणारा हा साधा मजूर पाहिल्यावर, जनतापक्ष लोकसभा – निवडणुकाच्या निमित्ताने या भागात किती खोलवर रुजला होता याची कल्पना येते शेवटी त्यानेच मला विचारले, 'भाईसाब, आप कहाँसे आये हो ?'

'पूनासे.'–मी.

'तो फिर बबई होकरही आये होगे.!'

'हाँ, आपको बबई मालूम है ?'

'वहाँ हमारे जे पी जी है। कैसी है उनकी तबीयत ?' त्याने आतुरतेने आणि आपुलकीने प्रश्न विचारला.

'बहुत अच्छी है।–' मी उत्तर दिले.

'भाईसाब, एक बिनती है, जाते वक्त आप जे पी जी को मिलकरही जाइएगा और हमारी तरफसे उनको प्रणाम करना।'

□

पृष्ठ २८ वर

# रशिया
## दोन महत्त्वाच्या घटना
वा. दा. रानडे

रशियाची नवी राज्यघटना आणि सोव्हिएटचे अध्यक्ष पॉडगोर्नी याना पोलिटब्यूरोमधून वगळणे या घडामोडी रशियातील आणि कम्युनिस्ट चळवळीतील काही नव्या प्रवाहांच्या निदर्शक आहेत काय या दृष्टिकोनातून त्याचा विचार करायला हवा.

पॉडगोर्नी याना पोलिटब्युरोमधून वगळले व अध्यक्षपदावरूनही ते लौकरच निवृत्त होतील अशा बातम्या आहेत. रशियन वृत्तसंस्थेने फक्त दोन ओळींची बातमी दिली. पॉडगोर्नी याना का वगळले ? केवळ प्रकृतीच्या कारणासाठी वगळले असते तर त्याचा उल्लेख बातमीत असता. पॉडगोर्नी ७४ वर्षांचे आहेत, पण ब्रेझनेव्ह आणि कोसीजिनही सत्तरीच्या आसपास आहेत. ब्रेझनेव्ह आजारी असल्याच्या बातम्या अनेक वेळा आलेल्या आहेत रशियाचे हे तिन्ही प्रमुख नेते निवृत्तीच्या सीमेवर आहेत. त्यात पॉडगोर्नी याचा क्रम प्रथम लागला. ब्रेझनेव्हशी त्याचे मतभेद झाले होते काय ? पाश्चात्य वार्ताहराच्या बातम्यांतूनसुद्धा यावर अधिक प्रकाश पडत नाही. रशियन क्रांतीला साठ वर्षे होत आली तरी नव्या बदलामागची कारणे स्पष्टपणे जाहीर का केली जात नाहीत ? ही गुप्तता कशासाठी ? हे प्रश्न मनात येतात. कम्युनिस्ट कार्यपद्धतीतून ही गुप्तता केव्हा नाहीशी होणार ? रशियातील घडामोडींचे जाणकार पाश्चात्य निरीक्षक व्हिक्टर झोर्झा यानी याबाबतीत असा अदाज केला आहे की रशियन क्रांतीच्या हीरकमहोत्सवाच्या वेळी येत्या ऑक्टोबरात ब्रेझनेव्ह चिटणीसपदावरून निवृत्त होणार असून अध्यक्षपदी त्याची नेमणूक होणार आहे चिटणीसपद आपल्याशी एकनिष्ठ अशा तरुण सहकाऱ्याकडे सोपवावयाचे; पण त्याच्याकडे सपूर्ण सूत्रे द्यावयाची नाहीत. अध्यक्षपदी राहून त्याच्यावर नियत्रण ठेवायचे असा ब्रेझनेव्ह याचा विचार आहे. ब्रेझनेव्ह यांचा सल्ला डावलणे नव्या चिटणिसास कठीण जाईल आणि पक्षावर आपली अप्रत्यक्ष पकड ब्रेझनेव्ह कायम ठेवतील.

दुसरा प्रश्न रशियाच्या नव्या राज्यघटनेचा. ही घटना साठाव्या क्रांतिदिनापासून अमलात येणार आहे. सध्याची घटना स्टालिन यानी तयार केली होती व ती १९३५ साली अंमलात आली. नवी घटना 'ब्रेझनेव्ह घटना' म्हणूनच ओळखली जात आहे, तिचा पूर्ण मसुदा उपलब्ध झाल्यावरच त्यासबंधी सविस्तर लिहिता येईल. सध्या उपलब्ध आहे तो फक्त 'टास'ने दिलेला या घटनेचा साराश घटनेतील एक महत्त्वाचा बदल म्हणजे 'कामगारवर्गाची हुकूमशाही' या कम्युनिस्ट विचारप्रणालीच्या मुख्य तत्त्वाचा त्यात त्याग केलेला आहे. त्याचे समर्थन असे करण्यात आले आहे की रशियात आता वर्गविहीन समाजरचनेचे उद्दिष्ट साध्य झाले असल्याने कामगारवर्गाच्या हुकूमशाहीची आवश्यकता नाही. 'सबंध जनतेचे समाजवादी राज्य' असे रशियाचे वर्णन त्यात केले आहे. पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राजवटीचे वर्णन जनतेची लोकशाही (पीपल्स डेमॉक्रसी) या शब्दानी केले जात असे. रशियाने त्यात बदल केला तो एवढाच की 'लोकशाही' शब्दाऐवजी 'समाजवादी राज्य' हे शब्द घातले. या बदलामुळे रशियातील कम्युनिस्ट सरकार आणि कम्युनिस्ट पक्ष याच्या कार्यपद्धतीत प्रत्यक्षात काही फरक पडणार आहे का ? हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

'कामगारवर्गाची हुकूमशाही' हे शब्द घटनेतून गेले असले तरी हुकूमशाही गेलेली नाही. कामगारवर्गाच्या हुकूमशाहीला प्रत्यक्षात कम्युनिस्ट पक्षाच्या हुकूमशाहीचे आणि स्टालिनच्या काळात तर एका व्यक्तीच्या हुकूमशाहीचे स्वरूप आले होते. स्टालिनच्या काळातील दहशत गेली असली तरी हुकूमशाही अजून कायमच आहे. क्रातीला साठ वर्षे होत आली तरी हुकूमशाहीची आवश्यकता रशियन नेत्याना अजून का वाटते ? सुरुवातीच्या काळात क्रातीला धोका असताना आणि रशियात पुन भाडवलशाही आणण्यासाठी भाडवलदार राष्ट्राच्या मदतीने यादवीयुद्ध सुरू असताना क्रातीच्या रक्षणासाठी हुकूमशाही आवश्यक होती असे म्हणता येईल; पण क्राती स्थिरावल्यानंतर हुकूमशाही हळूहळू कमी व्हायला हवी होती, रशियात तसे काही घडलेले नाही आणि नव्या घटनेतसुद्धा त्या दृष्टीने बदल केलेले नाहीत. राज्यसस्था विसर्जित होणे हे कम्युनिस्ट तत्त्वप्रणालीचे अतिम उद्दिष्ट साठ वर्षानंतरही ते अजून दूरच आहे. राज्यसंस्था विसर्जित होण्याच्या दिशेने तर पावले पडली नाहीतच, पण सत्तेचे विकेंद्रीकरणसुद्धा झालेले नाही. उलट केंद्रीकरण वाढत आहे.

काम मिळण्याचा हक्क, व्यवसायनिवडीचे स्वातत्र्य, विश्रांतीचा, शिक्षणाचा, आरोग्यरक्षणाचा हक्क, वैयक्तिक मालमत्ता बाळगण्याचा आणि ती आपल्या वारसांना देण्याचा हक्क घटनेंत समाविष्ट करण्यात आलेला आहे. वैयक्तिक मालमत्ता बाळगण्याचा हक्क दिला याचा अर्थ नफ्याच्या आणि पिळणुकीच्या उद्देशाने खासगी मालमत्ता करायला परवानगी दिली असा नव्हे. त्या अर्थाने खाजगी मालमत्तेला बदी आहच. वैयक्तिक मालमत्तेमध्ये स्वत:च्या श्रमाने मिळविलेल्या पैशातून केलेली बचत, घर, फ्लॅट, दैनदिन उपयोगाच्या व सोयीच्या वस्तू बाळगणे याचा समावेश आहे. सरकारने किंवा सामुदायिक शेतानी दिलेल्या प्लॉटस्चाही उपयोग नागरिकांना करता येईल- वैयक्तिक मालमत्ता आणि सामुदायिक माल. मत्ता याबाबत रशियन नागरिकाचा दृष्टिकोन साठ वर्षांत कितपत बदलत गेला आहे हा याच अनुषगाने विचार करण्यासारखा प्रश्न आहे. रशियन शेतकरी सामुदायिक शेतावर जेवढे उत्पादन करतो त्यापेक्षा अधिक उत्पादन स्वत:च्या मालकीच्या शेतात काढतो असे या संदर्भात केलेल्या पाहणीत आढळून आलेले आहे रशियन शेतकऱ्याच्या मनावर सामुदायिक जीवनपद्धतीपेक्षा वैयक्तिक जीवनाचाच अधिक पगडा आहे असाच याचा अर्थ होतो व्यवसायनिवडीच्या स्वातंत्र्याचा हक्क घटनेत दिला असला तरी समाजवादी नियोजनाशी त्याची सांगड घालताना एक तर त्या हक्कावर तरी निर्बंध येतील किंवा समाजवादी नियोजनाला तरी मुरड पडेल. यापैकी दुसऱ्या शक्यतेपेक्षा पहिली शक्यताच अधिक. खेड्याकडून शहराकडे ओघ भांडवलदारी राष्ट्राप्रमाणेच रशियातही आहे. खेड्यांत जायला तरुण नाखूष असतात व त्यांना सक्तीने पाठविले जावे असे पाश्चात्य निरीक्षकाना आढळून आले आहे.

'प्रत्येकाकडून त्याच्या कुवतीप्रमाणे आणि प्रत्येकास त्याच्या गरजेप्रमाणे' हे कम्युनिस्ट समाजरचनेचे एक तत्व मानले जाते. साठ वर्षांनंतरही रशियाला ते अजून साध्य करता आलेले नाही व घटनेत त्याचा समावेश केलेला नाही. त्याऐवजी प्रत्येकाकडून त्याच्या कुवतीप्रमाणे व प्रत्येकास त्याच्या कामाप्रमाणे हे तत्व समाविष्ट करण्यात आले आहे कम्युनिस्ट समाजरचनेचे अंतिम उद्दिष्ट अजून दूर आहे असाच याचा अर्थ आहे.

भाषणस्वातंत्र्य, वृत्तपत्रस्वातंत्र्य, सघटनास्वातत्र्य वगैरे मूलभूत हक्क घटनेने दिलेले आहेत. त्याच्या जोडीला नागरिकांना तक्रारी करण्याचा आणि अधिकाऱ्याच्या बेकायदा कृत्याविरुद्ध कोर्टात जाण्याचा हक्क दिलेला आहे। पण समाजपद्धतीला घातक

होईल अशा प्रकारे या हक्काचा व स्वातंत्र्याचा वापर करावयाचा नाही अशी अट घालण्यात आली आहे आणि समाजपद्धतीला घातक काय ते सत्ताधारीच ठरविणार. सरकारच्या प्रस्थापित धोरणाविरुद्ध मतप्रदर्शन केले तर ते समाजपद्धतीला घातक ठरवून सरकार त्यावर निर्बंध घालणार रशियात प्रस्थापित धोरणाविरुद्ध मत व्यक्त करणाराची आज गळचेपी होत आहे सरकारला विरोध म्हणजे समाजवादी राज्यपद्धतीला विरोध नव्हे सरकारची धोरणे, निर्णय चुकू शकतात त्यावर खुली टीका करण्याचा हक्क नागरिकाना असला पाहिजे. तसेच कम्युनिस्ट पक्षाशिवाय इतर राजकीय पक्ष सघटित करण्याचाही हक्क त्याना मिळायला हवा. समाजवादी पद्धतोला धक्का न लावता रशियात अधिक लोकशाही कशी आणता येईल या दृष्टीने यापुढे प्रयत्न हवेत, रशियाची नवी घटना त्या दृष्टीने पुढे पाऊल टाकणारी आहे असे म्हणता येणार नाही. □

---

## चक्रमचक्री ( १६ )

दीर्घस्मृती विश्वनाथ

# एका रुपयाची किमया

'विश्ववाणी मराठीतले हे अखिल–विश्व–वार्तापत्र मगळग्रहावरून सादर करण्यात येत आहे. सारे विश्व मनुष्यजातीच्या सामायिक मालकीचे आहे, ही क्रातिकारी घोषणा केल्यापासून पतप्रधानाच्या निवासस्थानासमोर लोक प्रचड सख्येने जमा होत आहेत. पतप्रधानाच्या जयजयकाराच्या घोषणा जनसमुदायाकडून दिल्या जात आहेत. दूरदूरच्या आकाशगगातील वसाहतीकडूनही अभिनवाणाचे ओघ पतप्रधानाच्या घराकडे लोटत आहेत अखिल विश्व कम्युनिस्ट पक्ष (मॉस्को गट), अखिल विश्व ट्रॉट्स्काइट गट (डावे), वैश्विक क्रातिवादी पक्ष, फॉरवर्ड ब्लॉक आणि समाजवादी पक्ष या नावाने वावरणारे एक कोटी, त्रेपन्न लाख, सदसष्ट हजार, सातशे बावीस गट इतक्या सर्वांनी पतप्रधानाच्या घोषणेचे मन:पूर्वक स्वागत केले आहे. उजव्या प्रतिक्रातिवाद्याच्या कारवायाचे समूळ उच्चाटण करणाऱ्या आणि मानवी इतिहासाला नवे वळण देणाऱ्या या अभूतपूर्व निर्णयाबद्दल सर्व समाजसत्तावादी जनतेने पतप्रधानाचे हार्दिक अभिनदन केले आहे '

'या ऐतिहासिक घटनेची पार्श्वभूमी विशद करणारे एक वार्तापत्र आज रात्री दहा वाजता (दक्षिण पूर्व पृथ्वीची वेळ) प्रक्षेपित करण्यात येईल. नामवत गणितज्ज्ञ, इतिहासविशारद आणि ख्यातनाम राजकारणपडित याच्या एकत्र विचाराने हा कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.'

'दक्षिण-पूर्व पृथ्वीच्या प्रमाणवेळेनुसार रात्री १०। वाजता, म्हणजे वरील कार्यक्रमानतर लगेचच विश्वससदेच्या आजच्या कामकाजाचा वृत्तान्त ऐकविण्यात येईल '

'आता इतर बातम्या...'

### अभूतपूर्व निर्णयाची पार्श्वभूमी

'विश्ववाणी रात्रीचे दहा वाजत आऽहेत आता थोड्याच वेळात ऐका समाजवादी क्रातीची पार्श्वभूमी समजावून सागणारा खास कार्यक्रम 'तीस हजार वर्षांपूर्वी !'

'तीस हजार वर्षांपूर्वी म्हणजे ९ ऑगस्ट १९७७या दिवशी तत्कालीन भारत देशातील पुणे शहरात काही समाजवादी कार्यकर्ते एकत्र जमले होते असे दिसते की, या पथाचे कार्यकर्ते दर वर्षी या दिवशी एकत्र जमत असत त्याच्या ठिकाणाचा पत्ताही मिळाला आहे तथापि, त्यावरून काही बोध होत नाही.'

'या बैठकीत हे कार्यकर्ते आपणाकडून घडलेल्या एका घोर चकीची उत्तरीय तपासणी करीत होते सदर वर्षाच्या मार्च महिन्यात सार्वत्रिक निवडणुका झाल्या होत्या. त्या वेळी सत्तारूढ असलेला पक्ष अतिशय प्रगतिशील, सुधारणावादी आणि समाजसत्ताक राज्यपद्धतीचा पुरस्कर्ता होता. तथापि, उजव्या प्रतिक्रातिवादी पक्षाच्या प्रचाराने भुलून प्रस्तुत समाजवादी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यानी सत्तारूढ पक्षाचा पतप्रधान हुकूमशहा आहेत, असा स्वत.चा समज करून घेतला आणि निवडणुकात उजव्या प्रतिगामी आणि समाज सुधारणाविरोधी पक्षाशी हातमिळवणी केली. परिणामी सत्तारूढ पक्षाचा पराभव होऊन उजव्या प्रतिगामी पक्षाचे वर्चस्व असलेली विरोधी आघाडी अधिकारावर आली. आपल्या सहाय्याने उजवे प्रतिगामी पक्ष पुन: प्रतिष्ठा पावले, समाजाची सुधारणा, अधश्रद्धेवरील हल्ले, विषमतेचे निर्मूलन या गोष्टी मागे पडल्या, सरकार समाजवादी नाही याची कबुली वरिष्ठ नेते उघडपणे देऊ लागले या सर्व परिस्थितीने खतावलेले कार्यकर्ते एकत्र आले होते. निवडणुकापासून चार–पाच महिन्यातच त्याच्या मनात हा पश्चात्ताप निर्माण झाला यावरून ते किती सवेदनाशील होते, हे कळून येते.'

'या बैठकीत काय झाले याची माहिती बैठकीला हजर असलेल्या व्यक्तीच्या डायऱ्यामधून आणि त्या वेळच्या वृत्तपत्रातील बातम्यावरून कळते. बैठकीत असलेल्या सर्वांचे, अधिकारारूढ विरोधी आघाडी समाजवादाला वचनबद्ध नाही आणि तिच्यात सामील झाल्याने समाजवादी पक्षाने स्वत.च्या तत्त्वाशी प्रतारणा केली आहे, या विचारावर एकमत होते, परतु या आघाडीतील आपल्या उपस्थितीने उजव्या, उच्चवर्णीय, कर्मठ व प्रतिगामी पक्षाना प्रतिष्ठा मिळते, याचे त्याना दुःख अधिक तीव्रतेने वाटत होते. कोणी म्हणाले, जनता आघाडी सत्यनारायणावर बंदी घालू शकणार नाही, कोणी म्हणाले, मुजीचे सोहाळे तडाखेबद रीतीने चालू होतील, तिसरे कोणी सागू लागले की, बँकाच्या राष्ट्रीयीकरणाला विरोध करणाऱ्याच्या आणि सस्थानिकाचे तनखे चालले पाहिजेत, असे म्हणणाऱ्याच्या पक्तीला आपल्या वरिष्ठ नेत्यानी बसावे, हे चीड आणणारे आहे, आणखी कोणी मत माडले की, प्रतिगामी आणि पुनरुज्जीवनवादी पक्षाशी हातमिळवणी केल्याने समाजवादाचे पाऊल पचवीस वर्षांनी मागे पडले आहे.'

'या सगळ्या मतमतातराचा नक्की अर्थ काय हे आज कळणे कठीण आहे यासबधी अधिक सशोधन होणे आवश्यक आहे.'

'अशी ही बैठक बराच वेळ चालल्यानतर एक नवाच गट स्थापन करावा असे ठरविण्यात आले. तत्कालीन वर्तमानपत्रावरून असे दिसते की, समाजवादी पक्षातील एकापेक्षा जास्त माणसे एकत्र आली की नेहमीच एखादा गट स्थापन होत असे गटाचे नाव 'जनतान्तर्गत समाजवादी पक्ष (लोहियेतर उपपक्ष) वामतम राष्ट्रवादा

गट ' असे ठेवण्यात आले. त्यानंतर नवजात गटाचे धोरण निश्चित करताना एक चाणाक्ष-बुद्धी म्हणाले की, 'भाडवलशाही स्वत च्या वजनाच्या दडपणाखालीच चिरडली जाते असे आपण ऐकत आलो तेव्हा याचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे आपण सगळे मिळन थोरट्या सावकारीचा बादशहा जो जव्हेरीमल कालाचंद यान्याकडे एक रुपया व्याजी लावण्यासाठी देऊ. तो ६० टक्के व्याजाने कर्ज देतो. तेव्हा आपल्याला २५ टक्के व्याज तो देईलच देईल ' दुसरे कोण-तेच धोरण न सुचल्याने ही सूचना अंमलात आली '

## रुपया आणि इतिहास यांची साथसंगत

'इतिहासाचा प्रवाह अखेर समाजवादाच्या समुद्रालाच जाऊन मिळावयाचा, मग खासगी संपत्तीचा पुरस्कार करणारे प्रतिगामी कितीही अडथळे आणोत ! ९ ऑगस्ट १९७७ या क्रातिदीप्त दिनी व्याजी लावलेल्या रुपयाचा इतिहास हीच गोष्ट सिद्ध करीत आहे वरवर पाहता व्याजी लावलेल्या रुपयाच्या नासक्या भांडवलशाही बीजातून मानव-सत्ताक-विश्वाचा अश्वत्थ उभा राहील हे भविष्य कोणालाही विचित्र वाटले असते वाढणारे व्याज आणि समाजवादाकडे झपा-ट्याने पावले टाकणारा प्रगतिशील इतिहास हे प्रवाह परस्परविरुद्ध आहेत, असेच कोणीही म्हणेल; पण आपल्या विद्यमान पतप्रधाना-सारखे प्रतिभाशाली नेते नव्हत्याचे होते करून दाखवितात; सावकारी रुपयातून समाजवादाचे स्वप्न साकार करतात '

'तुम्हाला माहीतच असेल की, एक रुपया २५ टक्के चक्रवाढ व्याजाने लावला तर 'न' वर्षात त्याची रास $(१\ २५)^{न}$ इतकी होते. तीस हजार वर्षांपूर्वी पुण्यातील एका अधेऱ्या खोलीत जमलेल्या समाजवाद्यानी १ रु. पचवीस टक्के व्याजाने लावला त्याचे आज $(१\cdot२५)^{३०'०००}$ इतके रुपये झालेले आहेत ही रक्कम जवळपास १ वर २९०७ शून्ये इतकी प्रचंड होते.'

'अर्थात, ही सगळी वाढ सुरळीत झालेली नाही. ज्या जव्हेरीमल कालाचंद या साव-काराकडे ही रक्कम मुळात होती, तो १९९३ या वर्षीच वारला. त्याचा धदा त्याच्या वशजाकडे २०१५ या वर्षापर्यंत होता. नतर हा सर्व व्यवहार एका सहकारी बँकेकडे आला. या बँकेने हे पैसे २०५० या वर्षा-पर्यंत साभाळले. त्या वेळी मूळच्या एका रुपयाची $(१\cdot२५)^{७३} = ११८५००००$ इतके रुपये रास झाली होती. त्या वेळी ही सर्व रक्कम तत्कालीन भारतातील स्टेट बँकेकडे देण्यात आली.'

'सन ३००० मध्ये पृथ्वीवरील सर्व देशानी एकत्र येऊन एक राज्य स्थापन केले व जागतिक संघराज्याची मध्य-वर्ती बँक स्थापन करण्यात आली त्या वेळी मूळच्या एका रुपयाचे $(१\cdot२५१०२३) = १३४५$ (वर ९६ शून्ये) एवढे रुपये झाले होते त्यानतर ही रक्कम भराभर वाढतच गेली गेली पाचशे वर्षे विश्व-बँकेकडे फुगत जाणाऱ्या या रकमेचे काय करावयाचे हा मोठाच प्रश्न सर्व मानवजातीला सतावत होता बँकेकडील ठेवीच्या प्रमाणात वापरा-तील पैसा वाढत असल्याने भाववाढही फार मोठ्या प्रमाणात होत होती.'

'गेल्या मार्चमधील वैश्विक निवडणुका-नतर स्थापन झालेल्या पंतप्रधान रॉबर्ट इद्रवदन चुआग याच्या नेतृत्वाखालील सर-कारने प्रथम या प्रश्नाचा उलगडा करण्याचे ठरविले- पतप्रधान रॉबर्ट, त्याच्या पत्नी गृहमत्री फराया चुआग आणि त्याचे सुपुत्र व विश्वशासनाचे अर्थमंत्री डेव्हिड याच्या समितीने आपला अहवाल सरकारला परवा सादर केला. त्या अहवालात म्हटले होते की, ९–८–१९७७ रोजी दहा मनुष्यानी जव्हेरी-मल कालाचद याचेकडे व्याजी लावलेल्या एक रुपयाचे आता १ वर २९०७ शून्ये इतके रुपये झाले आहेत विश्वात अस्तित्वात अस-लेल्या पदार्थमात्राची किमत इतके रुपये होते असे समजून ही रक्कम खर्ची टाकावी आणि विश्वातील पदार्थमात्र वैश्विक सर-कारच्या म्हणजेच सपूर्ण मानवजातीच्या मालकीचे झाले आहे, असे जाहीर करावे '

'वरील आशयाचा ठराव ससदेच्या दोन्ही सभागृहानी काल मजूर केला अशा रीतीने पृथ्वीच्या पाठीवर पहिला मानव अवतरला तेव्हापासून मानवजातीने हृदयाशी बाळग-लेले, बुद्धीने सशोधिलेले. स्वश्रमानी प्रत्यक्षात आणण्याची अपेक्षा ठेवलेले स्वप्न साकार झालेले आहे आपले पतप्रधान व त्याचे कुल यानी पिढ्यानुपिढ्या या दिवसासाठी केलेले प्रयत्न फळाला आलेले आहेत.'

## संसदेचे आजचे कामकाज

'आज संसदेची बैठक सुरू झाली तीच उत्साहाच्या वातावरणात उजवे प्रतिगामी विरोधी पक्षीय गैरहजर असल्याने सभा-पतीच्या डावीकडील बाके रिकामीच होती. सरकार पक्षीय सभासदात मात्र आज काही विशेष घडणार अशी जाणीव ओथबून राहिली होती. पतप्रधान चुआग हे आपली पत्नी व सुपुत्र यांचे समवेत सभागृहात आले त्या वेळी सर्व सभासदानी उत्स्फूर्तपणे उभे राहून त्याना अभिवादन केले आणि त्याच्या जयजयकाराच्या घोषणा दिल्या '

'त्यानंतर कामकाजपत्रिकेतील काम बाजूला ठेवून फिडेल गुप्त यानी माडलेला ठराव चर्चेला घेण्यात आला ठरावात म्हटले होते की, विश्वातील सर्व पदार्थमात्र मानव-जातीच्या सामायिक मालकीचा करण्याचा धाडसी, पुरोगामी आणि समाजातील दुर्बल घटकांना प्रतिष्ठा देणारा निर्णय घेऊन पतप्रधान चुआग व त्याचे कुटुब यानी मानवी इतिहासाचे सुवर्णाक्षरानी युक्त असे नवे पान उलगडले आहे खाजगी मालमत्ता हा शब्दप्रयोग आता इतिहासजमा झाला आहे पंतप्रधान चुआग व त्याचे कुटुबीय याचे ही ससद अभिनदन करीत आहे '

'त्यानतर फेलिक्स योशिदा यानी घटना-दुरुस्तीचा दुसरा ठराव माडला त्यात असे म्हटले आहे की, मानव-सत्ताक विश्वाच्या इतिहासातील नवे युग आजपासून सुरू होत आहे शोषणमुक्त युगातील मानवजातीची पहिली पावले योग्य मार्गाने पडावीत यासाठी तिला बळकट आधार आणि दीर्घदृष्टी असलेला पथदर्शक मिळणे जरूर आहे. यासाठी विद्यमान पतप्रधान चुआग हे तह हयात पतप्रधान राहावेत आणि त्याचेमागून पतप्रधानपद त्यांचे कुटुबियांतच चालत रहावे असे ठरविण्यात येत आहे '

'वरील दोन्ही ठराव एकमताने मजूर झाल्यानंतर पतप्रधान चुआग यानी स्वत खालील ठराव माडला . ज्या दहा सत्पुरुषानी ९ ऑगस्ट १९७७ या शुभदिनी एक रुपया व्याजी लावून शोषणमुक्त मानवसमाजाचा पाया घातला त्यांना ही संसद विश्वमानव-जातीच्या वतीने कृतज्ञतापूर्वक श्रद्धाजली अर्पण करीत आहे त्या थोर मानवपुत्राचे खरे स्मारक शोषणमुक्त मानव हेच आहे तथापी, त्याचे प्रतीकात्मक स्मारक कशा प्रकारे उभारावे याचा विचार करण्यासाठी ससद सदस्याची एक समिती नेमण्यात यावी '

'ससदेचे आजचे काम सपत आले असता सभापतीनी वरील स्मारकासाठी एका त्रिसदस्य मडळाची निवड केली हे सभासद असे पतप्रधान चुआग, अध्यक्ष श्रीमती चुआग, सदस्य आणि अर्थमत्री डेव्हिड, पत-प्रधानाचे सुपुत्र, सरचिटणीस.'

'ससदेच्या आजच्या कामकाजाचे समा-लोचन समाप्त होत आहे ' □

(मध्यवर्ती कल्पना परकीय)

# अवती–भवती

शरद कृष्णन्

## खानदानी मंत्री–विद्याचरण शुक्ला

हम कोई ऐसे वैसे नही–खानदानी मत्री है,–मेरे पिताजी मुख्य मंत्री थे, मेरे भाई मुख्य मत्री है, मै केंद्रीय मंत्रिमडल का सदस्य हूँ और मेरे बालबच्चे भी मंत्री ही बनेंगे...हम तो खानदानी मत्री है... एखाद्या हिंदी चित्रपटामध्ये अचूक बसतील अशी ही मुक्ताफळे माजी केंद्रीय मंत्री विद्याचरण शुक्ला यानी ऐकविली होती. आज सत्ता गेली. रायपूरमधील अबाधित दादागिरीला सुरुग लागले पक्षाने दोषाचा ठपका ठेवून बदनाम केले. चारित्र्यहननाचे प्रक र तर सुरूच आहेत मस्तवालपणे सत्ता उपभोगणाऱ्या या माणसाला आज काय वाटत असेल ? आज तो कसा राहतो ? आणीबाणीबाबत आता त्याला काय वाटते ? त्याच्या भावी योजना काय? अति बदनाम झालेल्या माणसाच्या भवितव्याबाबतही उत्कठा असतेच की. तशीच तो त्याच्याही बाबतीत आहे. त्याच्याबरोबर झडलेली सवाल–जबाबाची मैफिल या सर्व प्रश्नाची उत्तरे देणारच आहे.

प्रश्न : पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटमध्ये ही जी विजयाकुमारी आली ती तुमच्या मेहेरबानीमुळेच ना ? आम्ही तर असे ऐकतो की तिची चाचणी वगैरेही घेतली नाही–भरपूर गुणवत्ता असलेल्या माणसालाही जिथे विलक्षण स्पर्धा आणि असख्य अडचणी याना तोड देऊनच पुढे जावे लागते त्या इन्स्टिटयूटमध्ये ही पोरगी चुटकीसरशी घुसली कशी ?

शुक्लाजो . झाल तुमच, आता तुम्हाला सागतो. विजयाकुमारीसाठी मी काहीही केले नाही प्रसिद्ध निर्माते आणि इन्स्टिटयूटच्या नियत्रणमडळाचे उपाध्यक्ष श्री जी. पी. सिप्पी यानी कदाचित तिचा पुरस्कार केला असेल. मात्र त्यासाठी व्यवस्थापकीय नियम बदलण्यात आले असे म्हणणे आचरटपणाचे आहे.

प्रश्न : या सपप्रसिद्ध विजयाकुमारी ऊर्फ कॅन्डी याची व तुमची कधी गाठ पडली होती का ?

शुक्लाजो : मी जी. पी. सिप्पी यानी दिलेल्या एका पार्टीमध्ये तिला प्रथम पाहिले तिथे अनेक निर्माते, कलाकार वगैरे होते. कॅन्डी सिप्पीच्या घरची पाहुणी होती.

प्रश्न : मत्री म्हणून तुम्ही असख्य कलाकाराना, तत्रज्ञाना भेटतच होता. या भेटीगाठीमध्ये ही सामान्य मुलगी तुमच्या कशी काय बरोबर लक्षात राहिली ?

शुक्लाजी एक तर माझी स्मरणशक्ती फार तिखट आहे आणि दुसरे म्हणजे ती सामान्य नव्हती. एकदा पाहूनही लक्षात रहावे असे व्यक्तिमत्त्व तिच्याजवळ खचितच आहे. देखणो म्हणण्याइतके रूप तिच्याजवळ नक्कीच आहे.

प्रश्न ती म्हणे नृत्याचे शिक्षण...

शुक्लाजी तिला नृत्याची चागली जाण आहे. मला आजही आठवते की पुण्याला फिल्म इन्स्टिटयूटच्या पदवीदानसमारभासाठी मी गेलो होतो त्या वेळी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये तिने नृत्य सादर केले होते. मला नृत्याची चागली जाण आहे आणि मला तिचे नृत्य आवडले. मुबई दूरदर्शनकेंद्राच्या छायालेखकाने ते चित्रितही केले होते

प्रश्न : तुमची-तिची त्यानंतर गाठ पडली काय ?

शुक्लाजी नाही, परतु दिल्ली चित्रपट महोत्सवाच्या वेळी ती दिल्लीमध्ये होती तिचे छायाचित्र पाहिल्याचे मला स्मरते. तथापि त्या वेळी मी इतका कार्यमग्न होतो की भेटीचा प्रश्नच सभवत नव्हता.

प्रश्न . केवळ तुमच्या आणि तिच्या बाबतच नव्हे तर.. एकदरीत तुमच्या भानगडीबद्दल सध्या जी चर्चा चालू आहे, त्यामुळे तुमची एक वेगळीच प्रतिमा तयार झाली आहे

शुक्लाजी शक्य आहे, एक तर मी वैभवात राहतो माझ्या कपडयाबाबतही विशेष काळजी घेतो. माझ्या जनमानसातील प्रतिमेची जाणीव मला आणीबाणीनंतर माझ्याबद्दल जो गलिच्छ मजकूर प्रसिद्ध झाला त्यानंतरच आली. माझ्या अगदी जवळच्या मित्रानीही याबाबत माझ्याशी कधी चर्चा केली नाही. एक तुम्हाला सागतो–माझे वैवाहिक आयुष्य अगदी सुखासमाधानाचे आहे. त्यामुळेच मला या गोष्टीचा खूप त्रास होतो, पण मग मी विचार करतो, ही असली गरळ महात्मा गाधी, पडित नेहरू, जगजीवनराम, बहुगुणा यांच्या बाबतीतही ओकली गेली होती. आता त्यांच्या तुलनेत मी अगदीच नगण्य. मग आता तुमचा प्रश्न असणार की या प्रकरणी मी पुढे काय करणार ? मी सरळ हे सगळेच प्रकरण न्यायालयामध्ये नेणार आहे.

प्रश्न : युवक काँग्रेसनेते प्रियरजन दास मुन्शी यानीही तशीच सूचना केली होती ना ?

शुक्लाजी : त्यांचे नका हो सागू. त्याना माझ्याबद्दल खरच काही वाटत असते तर त्यानी सरळ मलाच लिहिले असते. निदान पत्रकारपरिषदेनतर तरी मला पत्र लिहिले असते, पण त्याना माझ्या बचावापेक्षा पक्षाच्या बदनामीचीच काळजी असावी ! ! अर्थात माझ्याशी मतभेद असलेल्या माणसाकडून या वेळी यापेक्षा दुसरी अपेक्षा करता येणार नाही. मी काय करावे हे त्याने सागण्याची गरज नाही. मला ते समजते.

प्रश्न . तुमची रहाणी अतिखर्चिक असल्याच्या तक्रारी केल्या जातात. त्याबाबत तुमचे काय म्हणणे आहे ?

शुक्लाजी : मी चागल्या जीवनाचा चाहता आहे. जीवन जग-

पृष्ठ २५ वर

लेखक स्वतः एका सहकारी साखर कारखान्यात कामगार आहे

# सहकारी क्षेत्रातील कामगारांच्या अडचणी

दिलीप निबाळकर

आजकाल बहुधा तरुणवर्ग हा बँकेच्या नोकरीच्या मागे लागलेला आढळतो वाटेल त्या मार्गाने बँकेतच नोकरी मिळण्याचे प्रयत्न चालू असतात. अर्थातच बँकांतील कर्मचाऱ्यांचे वेतनमान त्यांना मिळणाऱ्या इतर सवलती, भत्ते पाहता हे साहजिकच आहे असे वाटते. या बँकातील नोकऱ्यापाठोपाठ तरुण पसंत करतात, त्या सरकारी नोकऱ्या आणि खाजगी नोकऱ्या. एक तर सरकारी नोकरीतील सुरक्षितता आणि बँकाच्याच तोडीचे वेतन हे सरकारी नोकरीतील आकर्षण तर नामांकित खासगी कंपनीतील लठ्ठ पगार आणि तितक्याच प्रमाणात मिळणाऱ्या सवलती हे यातील प्रमुख आकर्षण, बँक, सरकारी आणि खाजगी (प्रायव्हेट) नामांकित फर्म्समध्ये कर्मचाऱ्यांना भरपूर वेतन, त्यांचे जीवनमान सर्वसामान्य जनतेपेक्षा उंचावणारे असते

या पार्श्वभूमीवर सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाकडे लक्ष देता तुलनेने हे सहकारी क्षेत्रातील कर्मचारी बँक, विमा, खाजगी कंपन्यांतील कर्मचाऱ्यांपेक्षा किती तरी मागे असलेले दिसून येतात सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या वेतनात आणि या उपरोल्लेखित कर्मचाऱ्यांच्या वेतनात काही शेकड्याचा फरक आढळून येतो ही स्थिती वेतनाबाबत इतर सवलती आणि भत्ते याबाबत तर ही तफावत कमालीची आढळून येतो सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तिनंतर पेन्शन असतेच, तर बँककर्मचाऱ्यांना त्यांच्या सर्व्हिसकाळातच ते भविष्यनिधीची तरतूद करू शकतील असे वेतन असते. मात्र सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना अशी कोणत्याही प्रकारची सुरक्षितता नसते. एक तर मुळातच वेतन कमी आणि पेन्शनची सोय नाही सहकारी क्षेत्रात वारवार ऐकू येणाऱ्या भ्रष्टाचार–प्रकारामागील हेही एक मूळ कारण असू शकते, याचा आजवर कोणीही विचारच केलेला नाही.

वेतनाबाबत जी स्थिती तीच इतर भत्ते आणि सवलतीबाबत आहे. सरकारी आणि बँक–कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या भत्त्यांचे प्रकारच मुळी डझनावारी असतात. सिटी अलौन्स, एका शाखेतून दुसऱ्या शाखेत बदली, कामगार (रिलिव्हर) म्हणून जाण्याबाबत मिळणारा भत्ता, प्रवासभत्ता, कॅशअलौन्स या प्रकारचे अनेक भत्ते या कर्मचाऱ्यांना मिळत असतात. याउलट सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मिळणारे भत्ते अतिशय अपुरे असतात. बाहेरगावी जाण्यासाठी मिळणारा पी. ए इतका अपुरा असतो की या कर्मचाऱ्याला बाहेरगावी जाणे देखील नको वाटावे–दोन वेळचे जेवणाचा खर्च देखील भागणार नाही इतके हे अपुरे भत्ते.

इतर सवलतीबाबत पहाता सहकारी कर्मचाऱ्याइतका दुर्दैवी कर्मचारी कोणताही नसेल असे खेदाने म्हणावे लागते. सरकारी कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळते, तर बँक आणि खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मोठ्या पगारामुळे निवृत्त होताना भरपूर ग्रॅच्युइटी आणि प्रॉ फंड मिळतो. सहकारी क्षेत्रातील कर्मचारी हा निवृत्त होताना जवळजवळ कफल्लकच असतो. प्रॉ. फंड आणि ग्रॅच्युइटीही जेमतेमच मिळते.

बऱ्याच ठिकाणी सरकारी आणि बँक-कर्मचाऱ्यांना (ऑफिसर्सना का होईना) राहण्याची सोय असते. जर अशी सोय नसेल तर त्याबद्दल भत्ता मिळतो. सहकारी क्षेत्रातील फक्त साखरकारखाने सोडले तर इतर कोणत्याही संस्थातील कर्मचाऱ्यांपुढे राहण्याच्या जागेचा प्रश्न असतो सहकारी साखरकारखान्यातील कर्मचाऱ्यांना देखील सर्वच कर्मचाऱ्यांना खोल्या मिळतात असे नाही. कारण तेथेही अपुरे बांधकामच जादा असते.

वेतनाबाबत सहकारी कर्मचाऱ्याच्या प्रश्नाकडे आजपर्यंत खूपच दुर्लक्ष झाल्याचे जाणवते सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्याचे वेतनमान निश्चित करण्यासाठी सरकारने वेतनमंडळ नेमले आहे, परंतु या वेतनमंडळाने नेमून दिलेले, ठरवून दिलेले वेतन सहकारी कर्मचाऱ्यांना मिळतेच असे नाही. बहुधा सहकारी संस्थात या वेतनमंडळाच्या शिफारशीची अंमलबजावणी कधीकाळी झालीच तर ती इतक्या दीर्घकाळाने होते की, शिफारशीचा मूळ हेतू कधी साध्यच होत नाही. तिसऱ्या वेतनमंडळाचा अहवाल बाहेर येण्याची वेळ आली असली तरी अद्याप पहिल्या वेतनमंडळाचीच अंमलबजावणी झालेली नाही असे दिसून येईल.

बऱ्याच वेळा ही अंमलबजावणी सोइस्कररीत्या फक्त अनुकूल कर्मचाऱ्यांनाच लागू होते आणि इतर प्रामाणिक सचोटीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मात्र या अंमलबजावणीकडे वर्षानुवर्षे डोळे लावून बसावे लागते. कारण मॅनेजमेंटविरुद्ध भांडण्याची ताकद (आर्थिक) व इतर स्वरूपात त्याच्यात नसते.

बँक–कर्मचाऱ्यांना त्याच्या बँकांतून असणाऱ्या परीक्षाद्वारे गुणवत्ता

प्रकट करण्याची आणि पर्यायाने आर्थिक कार्यक्षमता दाखवून बढती मिळविता येते. स्वत चा आर्थिक आणि अनुभवाचा लाभ करून घेता येतो. सहकारी क्षेत्रात सहसा या प्रकाराची जाणीवच नसते, अस्तित्वच नसते. सहकारी क्षेत्रातील परीक्षा असतात त्याचा उपयोग या आर्थिक प्रगतीसाठी होतोच असे नाही. कारण अशा परीक्षा उत्तीर्ण झाल्या तरी त्याचा विचार केला जातोच असे नाही. कारण अशा परीक्षा पास झाल्या तरी त्याचा विचार करावयाचा की नाही ते शेवटी संचालकमंडळाच्या हातातच असते. अर्थातच अशा शासकीय परीक्षांतील निकालाच्या विचारापेक्षा संचालकमंडळाच्या परीक्षेला कोण उतरतो याचाच विचार केला जातो. म्हणजे सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्याची आर्थिक उन्नती करून घेण्याचा हा मार्गदेखील बंदच असतो. कोणत्याही कर्मचाऱ्याने त्याच्या कामात अधिक लक्ष घालून कार्यक्षमता वाढविली तरी त्याचे चीज होईलच असे नाही. त्यामुळे आज सहकारी क्षेत्रातील कामगार उदासीन राहतो आणि स्वतःच्या कामातील कार्यक्षमता वाढविण्यापेक्षा संचालकमंडळाच्या पुढे पुढे करून आर्थिक फायदा करून घेण्यात मग्न झालेला दिसतो. ज्याना हे साधत नाही, ते अक्षरशः कुजले जातात. सहकारी क्षेत्रातील सर्वच कामे निवडणुकांवर लक्ष ठेवून केली जातात. त्यामुळे जे कर्मचारी ज्या सहकारी संस्थाचे मतदारदेखील असतात त्याना मात्र कोणत्याही शिफारसी–मंडळाच्या आदेशाची वाट न पाहता वेतनवाढ मिळत असते. सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्याच्या वार्षिक वेतनातील वाढ पाहता ( इन्क्रिमेंट ) वेतनमंडळाने केलेल्या शिफारसी पाहता, या शिफारशी या शतकातच केल्या आहेत का अशी शंका येते. ही वार्षिक वेतनवाढ इतकी छोटीशी असते की, त्यातून कर्मचाऱ्याला ही वेतनवाढ झाल्याची जाणीवही होऊ नये याची काळजी घेतली आहे असे वाटते सर्वसाधारण क्लार्कला वार्षिक वेतनात ३ ते ६ रु. पर्यंत जास्तीत जास्त वाढ मिळते. आजच्या महागाईच्या काळात ही वार्षिक वेतनवाढ म्हणजे कर्मचाऱ्यांची थट्टाच आहे असे न वाटल्यास नवल ही वार्षिक वेतनवाढ क्लार्कची आहे हे बाहेर कोणाला सांगितल्यास ते खरेही वाटणार नाही. शिपायाची वार्षिक वेतनवाढ याहूनही केविलवाणी आहे शिपायाला वार्षिक वेतनवाढ आहे १ रु. वर्षाकाठी कोटयवधी रु ची उलाढाल करणाऱ्या संस्थेकडून ही वेतनवाढ घेताना कर्मचाऱ्यानाच लाज वाटते आणि मग 'राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला' या म्हणीची आठवण येते. या तुलनेत बँक, विमा आणि खाजगी कर्मचाऱ्याच्या वार्षिक वेतनवाढी डोळे विस्फारायला लावणाऱ्या आहेत

सर्वसाधारणपणे महागाई निर्देशांक–वाढीनुसार मिळते. निर्देशांकवाढ झाल्यावरोबर तावडतोब महागाईभत्त्यात वाढ होत असते; परंतु सहकारी साखरकारखान्यांत ही निर्देशांकानुसार होणारी महागाईवाढ वर्षातून एकदाच मिळत असे. जगभर निर्देशांकवाढीशी महागाईवाढ निगडित झाली असताना सहकारी साखरकारखान्याच्या बाबतीत मात्र हा नियम का डावलला गेला होता काही समजत नाही. सुदैवाने गेल्या वर्षी महाराष्ट्राचे मजूरमंत्री श्री. शंकरराव पाटील यानी याबाबत लक्ष घालून इंडेक्सनंबरशी महागाई निगडित केली आणि वर्षातून दोनदा निर्देशांकानुसार महागाईभत्त्यात फरक होऊ लागला आहे; परंतु यातही सहकारी क्षेत्रात एक मेख आहेच. ही अशी निर्देशांकानुसार मिळणारी वेतनातील वाढ ही तावडतोब कधीच दिली जात नाही.

मोठ्या अनिच्छेनेच ही फरकाची रक्कम देताना शक्यतो कमीत कमी रक्कम कर्मचाऱ्याच्या हातात कशी पडेल याची संचालकमंडळ काळजी घेत असते. कोणाचे हॉस्पिटल तर कोणत्या तरी फंडाची रक्कम बहुधा सहकारी कर्मचाऱ्याच्या वेतनावरच आधारित असते सहकारी क्षेत्रातील नेतेमंडळी सार्वजनिक क्षेत्रात भरघोस देणग्याचे आकडे भसाभस जाहीर करीत असतात यामागचे गुपित हे असे आहे अर्थातच कर्मचाऱ्याची संमती पैसे कापून घेतल्यानंतरच घेतली जाते. मुकी बिचारी कुणी हाका ! ग्रामीण भागात एक म्हण आहे. 'फुकटची कढी धावु धावु वाढी.' याबाबतीत या वाढपात सहकार-नेते मोठ्या हौसेने सहभागी होतात.

जी अवस्था वेतनाबाबत तीच अवस्था रजेबाबतही आहे. विमा आणि बँक–कर्मचाऱ्याना तसेच सरकारी कर्मचाऱ्याना सार्वत्रिक सुट्याच इतक्या भरपूर आहेत की, बहुधा महिन्यातून किमान १ असे सुटीचे प्रमाण पडते.

सहकारी क्षेत्रात या सुट्यातदेखील काटकसरच केली जाते. सहकारी साखरकारखान्यात हे सुट्या देणे प्रत्यक्ष उत्पादनव्यवसाय असल्याने क्षम्य ठरले तरी रजेबाबतही जेव्हा कजूषपणा केला जातो तेव्हा यास पिळवणूक हेच एक नाव राहाते. बँक–विमा सरकारी कर्मचाऱ्यापेक्षा सहकारी क्षेत्रातील कर्मचाऱ्याना किमान १० ते १४ दिवसापर्यंत रजा कमी आहेत.

पेमेंट ऑफ वेजिस ॲक्ट १९३६ नुसार, कायद्याच्या बंधनानुसार प्रत्येक महिन्याच्या सात तारखेपर्यंत त्या महिन्याचा पगार करावाच लागतो, पण सरकार भले कामगाराच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी कायदे करीत असेल, पण राबविणारे तर आम्ही आहोत, या गुर्मीत हे सहकारनेते सरळ सरळ सरकारच्या डोळ्यात धूळफेक करीत असतात फक्त सहकारी बँकामधूनच बहुधा वेळेवर पगार होतो. इतर सहकारी क्षेत्रातील खरेदी–विक्री–संघ, साखरकारखाने याचे पगार ह्या मासिक पगाराच्या महिन्यातील सात तारखेपासून दुसऱ्या महिन्यातील सात तारखेपर्यंत केव्हाही होतात. हे वाचताना इतराना अतिशयोक्ती वाटेल; पण या संबंधित मान्यवराना ही वस्तुस्थिती माहीत आहेच. याबाबत हे सहकार–महर्षी इतके जागरूक असतात की, सात तारखेपूर्वीच हे पगार खर्ची टाकले जातात. अकौंटसबुकला तशी नोंद असते आणि कोणत्याही कामगारास पगारपत्रकावर सही करताना तारीख टाकण्याची बंदी असते हा अलिखित कायदा मात्र काटेकोरपणे पाळला जातो. महाराष्ट्रात कृष्णा स. सा. का. लि. सारखे सन्माननीय अपवाद आहेत.

आर्थिक स्वरूपाच्या या पिळवणुकीबाबत बोलावे तेवढे थोडेच आहे. प्रमुख बाबीचा येथे ऊहापोह केला आहे. इतर सवलतीत पाहताही हीच रड कायम आहे. सहकारी साखरकारखान्याना केवळ सक्ती केल्याने नाइलाजास्तव मेडिकल ऑफिसर नेमतात. बहुधा असे मेडिकल ऑफिसर पार्ट–टाइम नेमले जातात. त्यामुळे कारखाना साइटवर हे डॉक्टर असतातच असे नाही. सहकारक्षेत्रातल्या नेत्याना कामगाराच्या सुखदुःखाशी घेणे–देणे नसतेच; त्याना फक्त उत्पादनाशी कामगार निगडित हवा असतो

येथे सहकारी साखरकारखाने किंवा इतर संघ ( स. वि. स. ) मार्फत कामगारांना निवासस्थानाची सोय करून देण्यात येते. त्या निवासस्थानाच्या खोल्याची स्थिती इतकी दयनीय असते की त्याना निवासस्थाने का म्हणतात असा प्रश्न पडतो. अशा कारखान्यांतून वरिष्ठ श्रेणीच्या अधिकाऱ्यानाच वेल फर्निश्ड असे बंगले मिळतात. हे योग्यही आहे. असे बंगले त्याना मिळावेत याबाबत कुणाचेही दुमत होणार नाही; परंतु कनिष्ठ दर्जाच्या कर्मचाऱ्याना जेव्हा या तुलनेने मिळणाऱ्या खोल्या नावाचे कोंडवाडे मिळतात इंडस्ट्रियल हौसिंग स्कीमप्रमाणे तेव्हा मात्र उद्वेगाने, तिरस्काराने मन विषण्ण होते आणि हे सहकारनेते झारशाहीसारखा तिचा शेवट होण्याची वाट का पाहात आहेत याचे आश्चर्य वाटते. साध्या साध्या गृह-निर्माण शास्त्रीय नियमांना सरळ फाटे मिळतात आणि केवळ चार भिंती आणि एक चौकट उभी केली की सहकारी क्षेत्रातील कामगाराचे ' निवासस्थान ' तयार होते. हवा नावाची चीज खोलीबाहेर येऊनच अनुभवावयाची असते. उजेड व हवा या अत्यावश्यक गोष्टींचा अजीबात विचारच केला जात नाही. कायम कामगाराचे घराबाबत हे हाल, तर हंगामी कामगाराबाबत विचार करणे देखील नकोसे वाटते. हंगामी कामगार हा बहुधा त्या त्या कारखान्याच्या परिसरातलाच असतो. त्याची राहण्याची सोय असते, पण जेव्हा सिझन चालू असतो तेव्हा रात्रपाळी आणि पहाटेपाळीस कामावर येणाऱ्या कामगारास झोपण्यासाठी कारखान्याने सोय करणे ही नैतिक जबाबदारी देखील कारखान्याकडून टाळली जाते. विश्रांतिगृह ही कल्पना जेवढे सत्य चित्र डोळ्यापुढे उभे करते ते चित्र आणि सहकारी कारखान्यातील प्रत्यक्ष अस्तित्वात असणारी विश्रांतिगृहे यात महदंतर असते. खाजगी कारखाने व निरनिराळ्या कंपन्यातील विश्रांतिगृहे पाहिल्यानंतर या सहकारी कारखान्यातील विश्रांतिगृहे पाहता येथील कामगाराना आमच्या कारखान्यात विश्रांतिगृहच नाही असे नाइलाजाने सांगावेसे वाटते.

जी गोष्ट विश्रांतिगृहाची तीच कथा कॅन्टिनबाबत. पुण्यामुंबईतील खासगी कंपन्याच्या कॅन्टिनच्या तुलनेने सहकारी साखरकारखान्यातील कॅन्टिन्स ही केवळ झोपडपट्ट्यातील चहाची दुकाने म्हणावी लागतील. दराबाबत विचार करता खाजगी कंपन्याना जर कामगाराना सबलत म्हणून कमी दरात पदार्थ, जेवण पुरविणे परवडते तर सहकार क्षेत्रातील या कारखान्याना ते पुरविणे का जड जावे हा प्रश्न सर्वांनाच पडतो. खासगी कारखान्यात कॅन्टिन ही एक महत्त्वाची सेवा मानली जाते. त्यामुळे अर्थातच त्याकडे तितक्याच काळजीपूर्वकरीत्या पाहिले जाते. अशा कारखान्यातून कामगाराचीच एक कमिटी नेमली जाऊन त्याद्वारे वारंवार अशा कॅन्टिनच्या पदार्थांचे दरात या स्वच्छतेबाबत चौकशी होत असते. खाजगी कारखान्यातील कॅन्टिनची स्वच्छता आणि कामगाराचे आरोग्य याची सांगड विचारणीय मानली जाते. दुर्दैवाने सहकारी कारखान्यातील या सेवेला कामगार पारखा झाला आहे. कॅन्टिन ही अत्यावश्यक सेवा आहे हा विचारच या क्षेत्रातील नेत्याना पटलेला नाही. सहकारी कारखान्यातील कॅन्टिन्सही अत्यंत अस्वच्छ आणि कारखान्यातील कोणत्या तरी एका कोपऱ्यातील खोलीत सामावलेली असतात अर्थातच कॅन्टिन–कॉन्ट्रॅक्टर मॅनेजमेंटच्या या उदासीनतेचा फायदा उठवून जास्तीत जास्त स्वस्तातले पण आरोग्यास हानिकारक पदार्थ भरमसाठ भावाने कामगारांच्या पोटी टाकीत असतात फॅक्टरी अॅक्ट १९४८ च्या कायद्यानुसार वेल्फेअर सवलती देण्यात येत नाहीत.

कामगाराच्या अत्यावश्यक गरजाबाबत ही उदासीन अवस्था तर करमणूक, इतर मैदानी किंवा बैठे खेळ या बाबतीत एकदर परिस्थिती याहीपेक्षा खराब आहे. खाजगी कंपन्या, सरकारी आणि राष्ट्रीयीकृत बँकाकडून विशेष कौशल्य दाखविणाऱ्या ( सर्व प्रकारच्या ) खेळाडूना सतत प्रोत्साहन दिले जाते. आर्थिक मदत, पगारी रजा, सामन्याच्या वेळी प्रवास व इतर खर्च खेळाडूना मिळतो. यामुळेच राष्ट्रीय पातळीवरच्या आणि क्रिकेटसारख्या बऱ्याच मोठ्या प्रमाणावर खेळल्या जाणाऱ्या खेळास या वरील क्षेत्राकडून उत्तम असे खेळाडू पुरविले गेले आहेत, पण सहकारी क्षेत्रात खेळाना, इतर कलाना प्रोत्साहन देणे हे कामगाराचे फाजील लाड करणे असे मानले जाते महाराष्ट्रात प्रवरा आणि वारणा सह सा कारखान्याचा अपवाद वगळता इतर कोणत्याही सहकारी संस्थानी प्रातास अथवा राष्ट्रास सास्कृतिकदृष्टचा खेळाडू व कलाकार अजिबात दिलेले नाहीत. याचा अर्थ असा नव्हे की सहकारक्षेत्रातील कामगार खेळतच नाहीत. बहुसंख्य सहकारी संस्था या ग्रामीण भागात असल्याने तेथील कामगार क्रिकेटसारखे खेळ फारसे खेळतच नाहीत महाराष्ट्रातील बहुतेक सर्वच सह. सा. कारखान्यावर व्हॉलिबॉल खेळला जातो, पण यास कारखान्याकडून अजिबात सहाय्य मिळत नाही कामगार आपआपसात वर्गणी गोळा करून हे व्हॉलिबॉल क्लब्ज चालवीत असतात नगर जिल्ह्यातील असे कामगाराचे व्हॉलिबॉल क्लब्ज चालविले जातात. नगर जिल्ह्यातील असे कामगाराचे व्हॉलिबॉल क्लब्ज राष्ट्रीय पातळीवरील सामन्यात चमकण्याइतपत दर्जेदार खेळ खेळतात, पण बहुधा बिकट आर्थिक परिस्थिती आणि नोकरीत सवलती मिळत नसल्याने त्याना खेळ सोडून सर्वस्वी नोकरीकडेच लक्ष केंद्रित करावे लागते

या खेळाडूना योग्य मार्गदर्शन मिळाले, खेळाच्या सीझनमध्ये काही सवलती मिळाल्या तर महाराष्ट्राला यातून काही राष्ट्रीय पारितोषिकविजेते मिळू शकतील जे या खेळाबाबत तेच इतर सास्कृतिक अंगाबाबत. मागे सागितल्याप्रमाणे बहुतेक सह संस्था या ग्रामीण भागातच असल्याने चागली नाटके आणि फिल्मस् याना कामगार वचितच झालेला असतो कामगाराच्या वर्गणीतूनच सह. सा. कारखान्यातील गणेशोत्सवातून होणाऱ्या अफाट गर्दीवरून कामगार व इतर जवळपासच्या भागातील लोक हे नाटक आणि चागल्या पिक्चर्सचे किती भुकेले असतात हे कळून येते, पण हे सुख त्याना वर्षातून फार तर ९ ते १० दिवसच मिळते बाकी वर्ष या १० दिवसाच्या आठवणीवरच काढावे लागते. सह. सा. का. आणि इतर सह. संस्थाना आठवड्यातून एक एक पिक्चर दाखविणे फारसे जड जाणार नाही.

□

# कलकत्ता दिनांक

तारा पंडित

## मार्क्सवादी नेत्यांची भूमिका

डाव्या गटाना खूप वाटत असेल की सध्या हवा आपल्याच दिशेने वाहात आहे, तरी त्याचे नेते जनता पक्षाचे बळ नाकारू शकत नाहीत. त्याच्या मते खरी लढत डावे गट आणि काँग्रेस पक्ष याच्यामध्येच होणार आहे.

ज्योती बसु व प्रमोद दासगुप्ता हे दोघेही सध्या प्रचार-सभा घेण्यात गढलेले आहेत. त्यासाठी संपूर्ण पश्चिम बंगालचा दौरा ते करीत आहेत. एकूण १०० सभामध्ये भाषणे करण्याचा त्याचा इरादा आहे. आपल्या भाषणात ते प्रामुख्याने काँग्रेसच्याच दोषाचे चर्विच्चरण करीत असतात. शिवाय ते असे प्रतिपादन करतात की सध्याच्या राजकीय परिस्थितीत जनता-डावे गट युती ही पश्चिम बगालमध्ये अगदी अत्यावश्यक आहे. जनता पक्ष हा तडजोड करायलाच राजी होत नाही एवढा एकच दोष सोडला तर, जनता पक्षाविरुद्ध मार्क्सवादी नेत्याची काहीही तक्रार नाही.

मार्क्सवादी गटाचे आणखी एक नेते सरोज मुखर्जी म्हणाले की प्रफुल्लचद्र सेन ह्याच्या मनाचा गोधळ झालेला दिसतो. केंद्र-सत्तेप्रमाणेच राज्यसत्तेची उभारणी व्हावी असे ते मानतात हे बरोबर नाही. त्यांनी फक्त पश्चिम बगालच्या समस्याच्या दृष्टीनेच विचार केला तर उभयपक्षाच्या युतीचे महत्त्व त्याना नक्कीच पटल. ज्योती बसूना सत्ता गिळकृत करण्याची हाव आहे असा त्याचा आक्षेप पूर्णत. चुकीचा अ हे.

मुखर्जींच्या मते डाव्या गटाना जनमत सदैव अनुकूलच राहिलेले आहे. १९६७ मध्ये किंवा १९७२ मध्येही निवडणुकाचे वेळी लबाडीचे व्यवहार अवलबिण्यात आले असूनही जनमत डाव्या बाजूचेच होते. आत काँग्रेसचा प्रभाव कमी होणे याचा अर्थ सारा जनमतप्रवाह जनतापार्टीच्या दिशेनेच वळेल असे मुळीच नाही. डाव्या पक्षाचाही त्यात हिस्सा आहे हे विसरता येणार नाही.

मार्क्सवाद्याना मुख्य काळजी वाटते ती निराळीच. ते म्हणतात की, त्याच्या कार्यकर्त्यांना गुडाकरवी धाकदपटशा दाखविण्याचे प्रकार सुरू झाले आहेत व त्यामुळे त्याना मतदारसंघापर्यंत पोचण्यात अडथळे निर्माण होत आहेत. ह्या गुडगिरीला राज्ययत्रणेकडून आळा घालण्यात यश आलेले नाही.

मिदनापूरच्या सभेत ज्योती बसु म्हणाले—खरे तर अजूनही जनता-डावे पक्ष याच्यात युती होणे शक्य आहे. कारण त्यामुळे अनेक प्रश्न सोडविणे सोयीचे होणार आहे उलट दोन्ही पक्षामध्ये स्पर्धा निर्माण झाली तर टपून बसलेल्या काँग्रेसच्या ते पथ्यावर पडेल. ते म्हणाले, खरे तर जनता पक्षालाच आमचा पूर्ण पाठिबा होता. पूर्वीचे अपयश मनाला बोचू लागले की त्याचेही परिमार्जन करण्याच्या दृष्टीने त्याचे तोडून उद्गार निघतात. ते म्हणतात, पूर्वी देखील हरताळ आणि घेराव व्हावेत असे आमच्या पक्षाला कधीही वाटले नव्हते, पण आम्हाला नाइलाजास्तव त्याचा अवलब करणे भाग पडले. कारण मिलमालकानी मजुराच्या मागण्या पुरवण्याबाबत कधीही सहकार्य दिले नाही. ◻

## काँग्रेस–नेत्यांची भूमिका

विधानसभेच्या निवडणुका निर्भय आणि न्याय्य होतील किंवा नाही याची काँग्रेस-नेत्यांना शकाच वाटते. कारण निवडणुका तोडाशी आल्या असताना खून आणि दहशतीचे प्रकार राज्यात घडत आहेत असे ते म्हणतात. डॉ. डी. पी. चट्टोपाध्याय, नित्यानंद डे, प्रियरजनदास मुन्शी आदी मडळीनी याचे प्रमाण दाखवून दिले आहे. काँग्रेस पक्षाच्या चार तरुणाचे अनुक्रमे सिलीगुरी, दुर्गापूर, मिदनापूर व अलीपूरद्वार येथे खून पाडण्यात आले आहेत. म्हणून ते म्हणतात, ह्या प्रकरणाची चौकशी करणे हे सरकारचे काम नव्हे काय? आता प्रत्यक्ष मतदानाचे वेळीही असल्या हिंसक मार्गाचा अवलब होणार असेल तर असल्या निवडणुकावर बहिष्कार टाकणेच अधिक योग्य होय.

चरणसिंग याच्या 'Socialism and Democracy were as unmixable as Nehru and Gandhi' ह्या विधानावर कडक टीका करताना डॉ. चट्टोपाध्याय म्हणाले,—असे बोलणे हे तत्त्वाला सोडून आहे, ऐतिहासिक परंपरेला नि उच्च आदर्शांना काळिमा लावणारे आहे.

परवापरवापर्यंत काँग्रेसमध्ये असणाऱ्या चरणसिंगसारख्या माणसाने लोकशाही आणि समाजवादावर आधारलेल्या स्वातंत्र्यचळवळीचा इतिहासच जणु पुसण्याचा प्रयत्न केला आहे असे डॉ. चट्टोपाध्याय याचे म्हणणे आहे. त्याना सर्वांत आश्चर्य वाटले ते एका गोष्टीचे. जनता पक्षात पडद्याआड भानगडी चालू असतानासुद्धा C P M सारख्या पक्षाने उभय पक्षात युती घडवून आणण्यासाठी जनता पक्षाकडे भीक का मागावी? याचा अर्थ C P I (M) पक्ष सधिसाधू आहे असेच म्हटले पाहिजे, असे त्याचे मत. ◻

## हावरा–सीन

हावरा आणि कलकत्ता ... गगेच्या पाण्याने जोडलेली ही दोन ठिकाणे, पण दोहोत फार फरक! कलकत्ता भले मोठे विस्तीर्ण शहर, हावरा त्या मानाने छोटे गाव. कलकत्ता सुधारलल, हावरा मागासलले. कलकत्त्यात श्रीमत लोक, हावऱ्यात गरीब माणसे; पण म्हणून त्याचा सबध नाही असे नाही. उलट कलकत्ता नि हावरा याच एकमेकावाचून चालत नाही. कलकत्ता मोठे शहर असले तरी त्याचे धागेदोरे हावऱ्यात अडकलले आहेत. कलकत्त्याचे कारखाने हावऱ्यात आहत. मजूरवग सारा हावऱ्याचा. मोठमोठ्या व्यापाचो गोडाउन्स् हावऱ्यात आहेत, तेथे त्याचे जाणेयेणे सतत असते. वस्तूमध्ये भेसळ करायाच धदेहा तिकडेच चालतात. तिकडे मजुरी स्वस्त आहे. ह्या सर्व सोयीमुळे हावरा कधी सुधारू नय, स्वच्छ होऊ नये, तेथाल लोक असच दारिद्र्यात खितपत पडावेत अशी कलकत्त्यातल्या उद्योगपताची इच्छा असत आणि खरच, हावरा कधी सुधारलच नाही, गलिच्छ होते तसेच आजही आहे.

अशा ह्या हावऱ्यात निवडणुकीचे वारे खेळते आहे किंवा नाही? ह्यापूर्वीच्या निवडणुकाकडे उदासीन वृत्तीने पाहणारी हावऱ्याची जनता ह्या वेळी निवडणुकाबद्दल बोलताना आढळते आहे. वरवर पाहता निवडणूक जवळ आल्याची चिन्हे फारशी दिसत नाहीत, पण काही ठिकाणी डाव्या गटाची पोस्टर्स आहेत. निरनिराळ्या पक्षाच्या कार्यालयावर त्याची त्याची निशाणे झळकताना दिसतात, पण आतमध्ये स्वयसेवक

फारसे नसतातच. जे असतात ते अंबंबट झोपेत – जणु निवडणुका फार लाब असाव्यात असा आविर्भाव तरीपण मतदारसंघामध्ये उत्साह जरूर आहे एवढेच नव्हे; निवडणुकाविषयी फार कमी बोलणारी ही मंडळी आता जाणीवपूर्वक मतदान करणार आहेत असे भासते.

जनता-पार्टीच्या ऑफिसमध्ये पोत्यावर बसून मतदाराची यादी तयार करणे सुरू आहे. पोस्टर्स छापून आलेले नाहीत. ध्वनियंत्रांचा पत्ताच नाही वेळेवर धावपळ करून काही तरी सोय होईलच.

काँग्रेस-पार्टीच्या ऑफिसमध्ये स्वयंसेवकांचाच तुडवडा आहे म्हणतात आपल्या पदरात नाही तरी अपयशच पडणार आहे ह्या भावनेनेच त्याची मंद हालचाल सुरू आहे

त्यातल्या त्यात उत्साह दिसून येतो तो मार्क्सवादी कम्युनिस्टांसह डाव्या गटामध्ये त्यांची पोस्टर्स यथार आहेत. काही भिंतीवर जाहिराती लिहिलेल्या आहेत ऑफिसमध्ये चारपाच कार्यकर्ते बसलेले असतात. त्याच्या मते हवेऱ्यात सध्या एकच 'वेव्ह' आहे आणि ती म्हणजे 'लेफ्ट वेव्ह!' आपल्या यशाची त्याना खात्री आहे. 'इलेक्शन टेम्पो'चा काहीही उपयोग नसल्याने त्याना फारसा प्रचार करण्याची इच्छा नाही. कारण मतदारसघ केवळ हुलकावण्या देऊन वळविणे शक्य नाही, असे त्याना निश्चित वाटते. त्यांच्यासाठी खरेच काही तरी करणे आवश्यक आहे-निदान गरजेच्या वस्तूचे भाव आटोक्यात आणणे हे अत्यावश्यक आहे त्याच्यासाठी हे कोण करील ?

सर्वदूर बोलणी चालतात ती निवडणुकाची नव्हे, वस्तूचे दर भरमसाठ का वाढले ह्याबद्दलच. नंतर त्या सभाषणाचा ओघ निवडणुकीकडे वळतो येथील सामान्य जनाना दिलासा देणारा, त्याचे जीवन सुसह्य करणारा, त्याच्या भावना जाणणारा 'माणूस' हवा आहे, मग तो कोणत्याही पक्षाचा का असेना ! □

## बरद्वान जिल्ह्याचे चित्र

बरद्वान जिल्ह्यात जनता पक्षाचे पाय नीट रोवले गेले नसल्याने खरी लढत फक्त जुन्या प्रतिस्पर्ध्यांमध्ये-काँग्रेस व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षामध्ये होणार असल्याची चिन्हे दिसताहेत. तिथे देखील जनमानसाची हवा बाहात असेलच तर ती डाव्यांना अनुकूल अशी आहे. काँग्रेस नेते भवितव्याबाबत साशंक आहेत. काहीना तर डाव्याचे यश खात्रीलायक वाटते अशावर विसबून प्रचार करता-करताच ते अर्धअधिक नामोहरम होत आहेत मनातल्या मनात पूर्वीच्या अपराधाची जाणीवही त्यांना पोखरून काढीत आहे

याउलट मार्क्सवाद्याना जास्तच जोर चढलेला दिसत आहे. जनसाधारण त्याचे स्वागत करीत आहे हे पाहून एका काँग्रेसवाद्याने म्हटले-केवळ क्षमायाचनानी मतदारसंघ विरघळणार नाही. आम्हाला आमच्या पापाची फार मोठी किंमत द्यावी लागणार आहे.

मार्क्सवाद्याच्या प्रचारसभा व मिरवणुकाना ऊत येत असताना काँग्रेसवाले मात्र थंडपणे बसले आहेत 'तुम्हाला लोकाना सामोरे जाण्याची भीती वाटते का ?' असे विचारले असता सागण्यात आले की-आम्हाला भीती मुळीच वाटत नाही; पण गेल्या लोकसभेच्या निवडणुकीचे वेळी भरमसाठ पोस्टर्स छापली होती व शेकडो सभा घेतल्या होत्या; पण हे मार्ग मतदाराना जिंकण्यास असमर्थ असल्याकारणाने आम्ही या वेळी निराळ्या मार्गाचा अवलब करीत आहोत. आता आमची माणसे घरोघरी जाऊन मतदाराशी आपले सबध नव्याने प्रस्थापित करीत आहेत.

बरद्वानमध्ये ठिकठिकाणी मार्क्सवाद्याची पोस्टर्स आढळतात. काही थोडी पोस्टर्स काँग्रेसचीही दिसतात, पण त्यावर चुकूनसुद्धा इंदिरा गाधी वा ब्रह्मानद रेड्डी याची नावे अगर फोटो दिसत नाहीत एक काँग्रेस तरुण म्हणाला-या वेळी गाय व तिचा बछडा यांना स्वत ची सोय स्वत च करून घ्यावी लागणार आहे.

बरद्वानमध्ये मार्क्सवाद्याना स्वत च्या यशाबद्दल १०० टक्के खात्री असावी आणि काँग्रेसचा आत्मविश्वास पुरतेपणी ढळलेला असावा असे चित्र का दिसते ? याचे एक कारण असे सागता येईल की दोघेही समान पातळीवरून मतदारसघाकडे पाहात आहेत. पश्चिम बंगालमध्ये प्रथमच अशी निवडणूक होणार आहे ज्या वेळी केंद्रस्थानी किंवा प. बंगाल राज्याच्या सत्तास्थानी काँग्रेस नाही. तेव्हा अप्रत्यक्ष पाठिंबा मिळण्याचीही शक्यता नाहीच.

दुसरे कारण असे की काँग्रेस पक्षातच दुमत झाल्याने प्रदीप भट्टाचारी व नुरुल इस्लाम ह्याच्या नेतृत्वाखाली दोन वेगळे गट स्थापन झाले. हे दोन्हीही परस्पराचे वाभाडे काढतात. परिणामतः बरद्वान येथील काँग्रेसभवन अगदी ओस पडल्यागत झाले आहे. श्रीमती गांधीचा फोटो असलेले पोस्टर्स भवनाच्या अगणातील एका कोपऱ्यात एकावर एक रचून धूळ खात पडले आहेत.

उलट मार्क्सवाद्यानी आता आपला चागलाच जम बसविला आहे. असनसोल-दुर्गापूर ह्या औद्योगिक पट्ट्यातील कामकरीवर्ग-भूमिहीन शेतमजूर यावर त्याचा खूप प्रभाव आहे. आणीबाणीच्या काळात काँग्रेसमध्ये घुसलेले अनेक कार्यकर्ते आता परत मार्क्सवादी पक्षात सामील झाले आहेत.

मार्क्सवाद्याचा जबरदस्त प्रभाव आणि काँग्रेसचा डळमळीत आत्मविश्वास दिसत असतानाच जनतापक्ष अगदी सतुष्ट दिसत आहे. त्याची लोकसभेच्या यशाची धुंदी अजून उतरलेली नाही. बरद्वानमध्ये लोकसभा निवडणुकीच्या वेळचे यश हे केवळ मार्क्सवाद्याच्या प्रभावामुळे प्राप्त झालेले आहे हे ते विसरलेले दिसतात.

काँग्रेस व जनता पक्ष दोघाचाही टीकेचा रोख मार्क्सवाद्यावर आहे. सयुक्त आघाडीचे वेळी जे काय घडले त्याचा ते आवर्जून उल्लेख करतात व त्याबद्दल मार्क्सवाद्याना जबाबदार धरतात.

डाव्या आघाडीचा सगळा रोष काँग्रेसवर. तेही आणीबाणीच्या काळातील काँग्रेसच्या गैरवर्तणुकीचा पाढा वाचतात. मात्र जनता पक्षाविषयी तेवढ्या कठोरपणे बोलत नाहीत. त्यानी आमच्याबरोबर 'सीट्स् अॅडजस्टमेंट्स्' केल्या नाहीत हाच त्याचा मुख्यत जनता पक्षावर आरोप आहे मार्क्सवाद्याना असे वाटते की त्याच्याविरुद्ध पडलेल्या मताची जनतापक्ष आणि काँग्रेसमध्ये विभागणी होईल व त्यामुळे त्याना जास्तीत जास्त जागा मिळण्याची शक्यता निर्माण होईल

काँग्रेस पक्षाला वाटते की पडत्या काळात जनमत हाच आपला एकमेव आधार आहे म्हणून सामान्यजनाने आम्हाला झिडकारू नये. शेतमालकाकडे ते मताची भिक्षा मागतात तेव्हा हे पटवून सागण्याचा प्रयत्न करतात, की जर मार्क्सवाद्याच्या हातात सत्ता गेली तर तुमच्या जमिनीवरच गदा येईल. तसेच जनता पक्षाला वस्तूच्या वाढत्या किमतीना आळा घालणे अजूनही शक्य झाले नाही. तेव्हा त्यानाही तुम्ही मत देणे योग्य नाही. तुमची मते आम्हालाच-काँग्रेसलाच मिळायला हवीत. □

–६ जून

कथा

# मी हरलो – मी जिंकलो

उल्हास जोशी

शेवटी मी माझ्या आयुष्यातला अत्यंत दुर्दैवी निर्णय घेतला आहे! माझे आयुष्य कायमचे संपवायचा निर्णय–आत्महत्या करायचा निर्णय! दुर्दैवाने परिस्थिती एवढी गंभीर झाली आहे की, आत्महत्या करूनच या साऱ्यातून माझी सुटका होणार आहे!

आज माझ्या आयुष्यातील शेवटचा दिवस–ही माझ्या आयुष्यातील शेवटची संध्याकाळ! रात्री ११ वाजता ड्यूटी संपवून मी घरी जाऊन झोपणार तो कायमचाच. माझ्या पँटच्या खिशात एक छोटी बाटली आहे. त्या बाटलीत फक्त तीन गोळ्या आहेत. अमेरिकेत नवीनच बाजारात आलेल्या या अगदी स्ट्राँग अशा झोपेच्या गोळ्या आहेत. माझ्या एका पायलट मित्राने या गोळ्या मला आणून दिल्या आहेत रात्री झोपण्यापूर्वी मी या तीन गोळ्या घेणार आहे आणि मग मला अगदी गाढ झोप लागणार आहे. झोपेतच केव्हा तरी माझे प्राणोत्क्रमण होणार आहे–अगदी कसलाही त्रास किंवा जाणीव न होता! मला अगदी सुखावह मरण येणार आहे. उद्या सकाळी माझे प्रेतच लोकांना सापडणार आहे. मग माझ्या प्रेताचे काय धिंडवडे व्हायचे असतील ते होवोत; पण माझ्या आयुष्यातील झालेल्या धिंडवड्यांपासून मी मात्र कायमची सुटका करून घेणार आहे.

हे भयाण आयुष्य मी गेली तीन वर्षे जगतो आहे. प्रचंड मानसिक दडपणाखाली मी गेली तीन वर्षे वावरतो आहे. त्यातून नंदाच्या, माझ्या पत्नीच्या, वागणुकीने माझ्या अंत:करणाला चांगलीच ठेच लागली आहे. गेली तीन वर्षे मी एकामागून एक येणाऱ्या निराशेच्या प्रचंड लाटांना एकटाच तोंड देत आहे. आता माझ्यातील ताकद संपुष्टात आली आहे! आता मी जिवंत राहिलो तर मला वेड लागेल! नंदाने तर मला वेडा, खुळा ठरवलेच आहे वेडा म्हणून जगण्यापेक्षा आत्महत्या परवडली! माझ्या आत्महत्येमुळे बरेच प्रॉब्लेम्स सुटणार आहेत नंदाला तिचे आयुष्य तिच्या पद्धतीनें जगायचे पूर्ण स्वातंत्र्य मिळणार आहे, पण माझ्या आयुष्याचे वैराण वाळवंट बनवायला नंदाच्या वागणुकीपेक्षाही तीन वर्षांपूर्वी घडलेला तो प्रसंगच जास्त कारणीभूत आहे. अजूनही त्या प्रसंगाची आठवण झाली की, अंगावर शहारे येतात.

इतरांना माझे आयुष्य सुखावह वाटेल मुंबईच्या सांताक्रूझ विमानतळावरील कंट्रोल टॉवरमध्ये रडार वॉच सुपरवायझर म्हणून मी नोकरी करतो आहे मला चांगला पगार आहे. मुंबईत एअरपोर्टजवळच माझा फ्लॅट आहे. घरात सर्व आधुनिक सुखसोयी आहेत नंदासारख्या एके काळी अत्यंत गाजलेल्या चित्रपट अभिनेत्रीशी माझा प्रेमविवाह झाला आहे. नंदाशी विवाह करायला उत्सुक असलेल्या अनेक बड्या–बड्या आसामींना बाजूला सारून नंदाने माझ्याच गळ्यात वरमाला घातली आहे. मी आणि नंदा एकत्र कसे आलो, हे कोडे अजून आम्हाला सुटलेले नाही.

निराशेच्या लाटांना आणि मानसिक दडपणाला मी आजपर्यंत अनेक वेळा तोंड दिले आहे. माझ्या नोकरीत प्रचंड मानसिक दडपण आणणारे, कधीकधी घाम फुटायला लावणारे प्रसंग अनेक वेळा येतात; पण विवाहानंतर नंदाच्या वागणुकीने या अशा प्रसंगात भरच पडली. लग्नानंतर थोड्याच दिवसात माझ्या लक्षात आले की, नंदा वाटते तेवढ्या सरळ स्वभावाची नाही. लग्नापूर्वी तिने मुक्त आयुष्य उपभोगले आहे; पण लग्नानंतर ती आपल्या पूर्वीच्या आयुष्यात कसलाच बदल करू इच्छित नाही. पत्नीचे पातिव्रत्य टिकवायची इच्छा तिच्या मनात विशेष प्रखर नाही. माझ्या संसाराचे तारू शेवटी फुटकेच निघाले! पण मी निराश झालो नाही. नंदाचे मन वळवण्याचा प्रयत्न करीत मी माझ्या संसाराच्या तारूची डागडुजी करावयास लागलो कारण नंदा ही माझ्या आयुष्यातील अशी एकमेव व्यक्ती आहे की, जिच्यावर मी मनापासून प्रेम केले व करतो आहे, पण तीन वर्षांपूर्वीच्या त्या प्रसंगाने एवढे प्रचंड वादळ निर्माण केले की, आमच्या संसाराचे तारू कोठल्या कोठे भरकटत गेले, त्याचे फुटून तुकडे झाले, मी आणि नंदा कोठल्या कोठे फेकलो गेलो!

हवेतून उडणारी विमाने सर्वांनाच दिसतात; पण या विमानांवर जमिनीवरून नियंत्रण ठेवणारे एअर ट्रॅफिक कंट्रोलर्स मात्र फारच थोड्या लोकांना ठाऊक असतात. सांताक्रूझ एअरपोर्टच्या कंट्रोल टॉवरच्या वरच्या भागात असलेली रडार कंट्रोल रूम बऱ्याच लोकांना ठाऊक नसेल मंद प्रकाशाने उजळलेली संपूर्ण बंदिस्त अशी ही रूम साऱ्या जगापासूनच अलिप्त असते. या रूममध्ये असलेली गुंतागुंतीची नाजुक यंत्रसामुग्री सदैव कार्यक्षम राहावी म्हणून ही रूम एअर कंडिशन्ड केलेली असून त्या रूमचे तपमान एका विशिष्ट पातळीत ठेवलेले असते. सायकलच्या चाकाच्या आकाराएवढे व शेवाळी रंगाचे चार रडार स्क्रीन्स त्या रूममध्ये चार निरनिराळ्या टेबलावर ठेवलेले आहेत. मुंबईपासून दोनशे मैलांच्या त्रिज्येत व जमिनीपासून पन्नास हजार फूट किंवा त्यापेक्षा कमी उंचीवरून उडणारी सर्व विमाने या रडार स्क्रीन्सवर दिसतात. पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या चार दिशांसाठी हे चार रडार स्क्रीन्स आहेत जेव्हा एखादे विमान

रडारच्या कक्षेत प्रवेश करते तेव्हा एक छोटासा, चांदणीसारखा दिसणारा प्रखर दिवा रडार स्क्रीनवर दिसू लागतो विमानाच्या गतीप्रमाणे व दिशेप्रमाणे हा दिवाही रडार स्क्रीनवर हालत असतो या रडार स्क्रीनवरून दिसणाऱ्या विमानाच्या हालचालींचे निरीक्षण करण्यासाठी व विमानाना योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी या स्क्रीनजवळ ट्रॅफिक कंट्रोलर्स बसलेले असतात. एखाद्या परक्या माणसाला मंद प्रकाशात वावरणारे हे एअर ट्रॅफिक कंट्रोलर्स भुतासारखे वाटतील या रडार स्क्रीनवरून विमान कोणत्या जातीचे आहे, ते किती उंचीवरून उडत आहे, विमानाचा वेग किती, विमानाची दिशा कोणती वगैरे सर्व माहिती समजते प्रत्येक रडार स्क्रीनजवळ एक-एक माइक्रोफोन व फ्रीक्वन्सी सिलेक्टर ठेवलेला असून त्याच्या साहाय्याने कंट्रोलरला रेडिओ-द्वारे विमानाच्या पायलटशी संपर्क साधता येतो.

विमाने जरी पायलटस् व नॅव्हिगेटर्स चालवीत असले तरी विमानाच्या आजुबाजूच्या परिस्थितीची त्याना पूर्ण कल्पना असतेच असे नाही. जर दोन उडणारी विमाने एकमेकाच्या अगदी जवळ आली तर त्याची कल्पना पायलटस्ना असतेच असे नाही, पण अशी परिस्थिती रडार स्क्रीनवर लगेच दिसते. पायलटस्ना ताबडतोब परिस्थितीची कल्पना देऊन त्याना योग्य मार्गदर्शन द्यायची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी कंट्रोलरवर पडते. जर ही परिस्थिती कंट्रोलरच्या लक्षात येण्यास उशीर झाला किंवा सूचना देण्यात थोडी जरी चूक झाली किंवा पायलटने पण कंट्रोलर्सच्या सूचना नीट समजावून घेऊन पाळल्या नाहीत तर त्या दोन्ही विमानाची हवेतच टक्कर व्हायची दाट शक्यता असते आणि जर ही विमाने बोइंग ७०७ वा बोइंग ७४७ सारखी प्रचंड पॅसेंजर एअर लाइनर्स असतील तर प्रचंड अपघात होऊन शेकडो माणसे मृत्युमुखी पडायची व लक्षावधी रुपयाचे नुकसान होण्याची शक्यता असते. आंतरराष्ट्रीय नियमाप्रमाणे दोन उडणाऱ्या विमानात समपातळीवर कमीत कमी किती अंतर असावयास हवे व दोघाच्या उंचीत कमीत कमी किती अंतर असावयास हवे हे ठरलेले असून वरील नियंत्रणापेक्षा दोन विमाने अधिक जवळ येत नाहीत ना हे डोळ्यात तेल घालून कंट्रोलरला पहावे लागते सांताक्रूझ–विमानतळ नेहमीच विमानाच्या वाहतुकीने गजबजलेला असतो अनेक विमाने येत असतात, अनेक विमाने जात असतात अशा वेळी या विमानावर नियंत्रण ठेवणे कधीकधी खरोखरच अवघड जाते अगदी अनपेक्षितरीत्या दोन विमाने एकमेकाच्या अगदी जवळ येतात घाईघाईने कंट्रोलर्स त्याना एकमेकापासून दूर व्हायची सूचना देतात त्या वेळी कंट्रोलरला घाम फुटलेला असतो त्याच्या मनावर प्रचंड दडपण आलेले असते. पायलटस्नी सूचना ऐकली नाही तर काय होईल या कल्पनेनेच तो विलक्षण अस्वस्थ झालेला असतो आणि अशा या प्रचंड मानसिक दडपणाखाली वावरणाऱ्या कंट्रोलरला मात्र आपला आवाज अगदी शांत आणि संयमी ठेवावा लागतो ही एक तारेवरची कसरतच ! ती दोन विमाने एकमेकापासून योग्य एवढी दूर जाईपर्यंत कंट्रोलरच्या जिवात जीव नसतो. तो देवाचा धावा करीत बसलेला असतो आणि जेव्हा ती दोन विमाने एकमेकापासून दूर जातात तेव्हा कंट्रोलर अक्षरशः सुटकेचा निःश्वास टाकतो कपाळावरील घाम निपटून काढतो केवळ दोन–तीन मिनिटेच पण प्रचंड अशा मानसिक दडपणाला तोंड द्यावे लागल्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर थकवा आलेला असतो विमानाच्या पायलटस्ना, आरामात विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशाना, एअर पोर्टच्या इतर कर्मचाऱ्याना इतकेच नव्हे तर कंट्रोलर्सच्या कुटुंबियाना देखील त्याच्या मनःस्थितीची कल्पना नसते. पावसाळ्यात विमानाचे नियंत्रण करणे आणखी अवघड होऊन बसते त्यातून वादळ असेल तर विचारायलाच नको ! कधी कधी एखादी इमर्जन्सी देखील येते आणि अशी परिस्थिती नेहमीच येते, अनपेक्षितरीत्या येते

मी देखील अशा प्रचंड मानसिक दडपणाला तोंड दिले आहे उन्मळून पडायच्या स्थितीला मी सुद्धा बऱ्याच वेळा गेलो आहे अनेक वेळा वाटले ही नोकरी सोडून द्यावी, पण या क्षेत्रात शिरलेल्या माणसाला दुसऱ्या क्षेत्रात वाव नाही त्याचप्रमाणे कंट्रोलर्स नेहमी बदलत असतात एखादा माणूस या जागेवर जास्त काम करूच शकत नाही. म्हणूनच इतर क्षेत्रातील माणसाना अनेक वर्षे नोकरी केल्यावर रिटायर होता येते, पण आम्ही मात्र दहा वर्षे नोकरी केल्यावर रिटायर होऊ शकतो, पेन्शन मिळवू शकतो तसेच कंट्रोलर्स सारखे बदलत असल्यामुळे अनुभवी कंट्रोलर्सची नेहमीच चणचण भासत असते व त्यामुळे आहेत हे कंट्रोलर्स सहानुभूतीने टिकवून ठेवण्याचे धोरण मॅनेजमेंटला स्वीकारावे लागते नवीन कंट्रोलर्स तयार करणे अवघड, खर्चिक व वेळ घेणारे असते. प्रथम नवीन माणसाची भरती करून त्याना शिकवावे लागते मग अनुभवी कंट्रोलर्सच्या हाताखाली त्याना दोन ते तीन वर्षे ट्रेनिंग द्यावे लागते. मग त्याची चाचणी घेण्यात येते व त्या चाचणीत उत्तीर्ण झाल्यावरच त्याना ट्रॅफिक-कंट्रोलर म्हणून हुद्दा मिळतो

तसा मी कमकुवत मनाचा आहे. कंट्रोलरच्या हुद्द्यासाठी मानसिकदृष्ट्या मी योग्य माणूस नाही. केवळ योगायोगाने मी या क्षेत्रात आलो व टिकलो, पण यासाठी बऱ्याच वेळा मला माझी मन शांती गमवावी लागली माझे कमकुवत मन एके दिवशी माझा घात करणार अशी भीती मला वाटत होती व ती शेवटी खरी ठरली. तीन वर्षांपूर्वीच्या त्या प्रसंगाने माझ्या कमकुवत मनाला प्रचंड हादरा बसला आणि माझ्या संसाराची राखरांगोळी करण्यास, माझी नंदा माझ्यापासून हिरावून घेण्यास, आजचा आत्महत्येचा निर्णय घेण्यास माझे हे कमकुवत मनच जबाबदार ठरले.

तीन वर्षांपूर्वीचा तो प्रसंग मला अजून आठवतो. जानेवारी महिन्यातील ती एक सुंदर सकाळ होती. स्वच्छ सूर्यप्रकाशाने आकाश उजळून आले होते एक प्रकारचे उत्साही, आनंदी वातावरण पसरले होते हवेत गोड गारवा होता त्या वेळी सकाळचे नऊ-साडेनऊ वाजले होते कंट्रोलरूममध्ये मी काम करीत होतो, पण माझी मन स्थिती विशेष चांगली नव्हती रात्री माझे व नंदाचे भांडण झाले होते मला न सांगता नंदा दोन दिवस बेपत्ता होती व ती कोठे गेली होती याचा जाब मी विचारला होता आणि त्यावरूनच आमचे भांडण झाले होते सकाळी आठ ते दुपारी चार अशी माझी ड्यूटी होती मी घराबाहेर पडलो तेव्हा नंदा रुसून निजलेलीच होती नंदाला कोणत्या

प्रकारे समजावून सागावे याचाच विचार विमानतळावर येईपर्यंत माझ्या मनात चालला होता, पण मनाला त्रास देणाऱ्या अशा विचारापासून दूर व्हायला काम हा एकच उपाय होता आमच्या कामात अतिशय कॉन्सन्ट्रेशन लागते मी कट्रोलरूममध्ये पाय ठेवला आणि नंदाला जवळजवळ विसरूनच गेलो माझ्या कामाशी मी पूर्णपणे एकरूप होऊन गेलो

मी त्या दिवशी पश्चिमेकडील रडारवर बसलो होतो. सर्व रडार्समध्ये पश्चिमेकडील रडार जास्त ट्रॅफिक–कट्रोल करीत असतो कारण पश्चिमेकडून मुबईला येणाऱ्या व मुबईहून पश्चिमेकडे जाणाऱ्या विमानाची सख्या जास्त असते सतीश नावाचा एक ट्रेनी त्या दिवशी माझ्या हाताखाली काम करीत होता सतीशला कामाला लागून सहा महिने झाले होते सतीश तेवीस-चोवीस वर्षांचा एक तरुण, स्मार्ट मुलगा होता सतीश व त्याचा स्वभाव मला फार आवडला होता. काम शिकण्याची त्याची जिद्द बाखाणण्यासारखी होती नुकतीच मी एक तीन नबरची इमर्जन्सी हाताळली होती आमच्या इथे इमर्जन्सीचे तीन प्रकार केलेले आहेत. तीन नबरची इमर्जन्सी म्हणजे विशेष गभीर नसलेली इमर्जन्सी, दोन नबरची इमर्जन्सी म्हणजे थोडीशी गभीर इमर्जन्सी व एक नबरची इमर्जन्सी म्हणजे अत्यत गभीर इमर्जन्सी दोन व एक नबरची इमर्जन्सी कधीच येऊ नये अशी प्रत्येक ट्रॅफिक-कट्रोलरची नेहमीच प्रार्थना असते. माझ्या नोकरीत दोन नंबरची इमर्जन्सी सहा वेळा व एक नबरची इमर्जन्सी फक्त दोनदाच आली होती. तीन नंबरची इमर्जन्सी कैक वेळा आली होती या वेळची इमर्जन्सी भारतीय हवाईदलाच्या एका नॅट विमानामुळे आली होती. विमानाचा कपास बिघडल्यामुळे त्याची दिशा चुकली होती शेवटी रडारवर मार्गदर्शन करून ते विमान साताक्रूझवर उतरून घेतले होते

आता मला थोडा वेळ विश्रांतीची आवश्यकता होती. आमचे विश्रांती घ्यायचे ठिकाण म्हणजे कट्रोलरूमला लागून असलेली लॅव्हॅटरी कट्रोलरूममध्ये काम करणाऱ्या लोकानी कामाच्या कडिशन्स लक्षात घेऊन एक अलिखित नियम केला होता की, कट्रोलर्सनी पाच मिनिटांपेक्षा जास्त वेळ लॅव्हॅटरीत जाऊ नये व आम्ही सर्वजण त्या नियमाचे काटेकोरपणे पालन करीत होतो. दोन रडार–स्क्रीन्ससाठी एक सुपरव्हायझर असे दोन सुपरव्हायझर्स रोज कामावर असतात, पण त्या दिवशी एक सुपरव्हायझर रजेवर गेला होता त्यामुळे कामावर असलेल्या एका सुपरव्हायझरलाच चारही स्क्रीन्सवर लक्ष ठेवावे लागत होते त्यातून जर तो एखाद्या कट्रोलरच्या हाताखाली एखादा ट्रेनी काम करीत असेल तर तो कट्रोलर बाजूला गेल्यावर त्या ट्रेनीवर लक्ष ठेवण्याचे काम सुपरव्हायझरलाच करावे लागते अशा परिस्थितीत मी बाजूला जायला नको होते, तरी मी विश्रांती घ्यायचे ठरविले होते.

मी लॅव्हॅटरीत जात असल्याचे सुपरव्हायझरला सांगितले. त्याने पुढे केलेल्या लॉगवर सकाळचे नऊ वाजून अठ्ठेचाळीस मिनिटांनी रडार – स्क्रीन सोडल्याची नोंद केली व सतीशवर लक्ष ठेवण्यास सागून मी लॅव्हॅटरीकडे निघालो.

सिगरेट ओढायची लहर आली म्हणून एक सिगरेट पेटवून लव्हॅटरीच्या उघड्या खिडकीजवळ उभा राहिलो या खिडकीतूनच बाहेरच्या जगाचे काय ते दर्शन होत होते. थडगार वाऱ्याची झुळुक अगावर आली आणि बरे वाटले सिगरेटचा आस्वाद घेत मी नदाविषयीच्या विचारात गढून गेलो नदाला कोणत्या भाषेत समजावून सागावे याचा मी विचार करू लागलो. सिगरेट सपून गेली पाच मिनिटे केव्हा होऊन गेली हेही मला समजले नाही भानावर येऊन जेव्हा मी घड्याळाकडे नजर टाकली तेव्हा नऊ वाजून अठ्ठावन्न मिनिटे झाली होती जवळजवळ दहा मिनिटे मी स्क्रीनपासून दूर होतो हे योग्य नव्हते पाच मिनिटातच मी परत जायला हवे होते

मी घाईघाईने बाहेर पडलो स्क्रीनकडे जाण्यापूर्वी नऊ वाजून एकूणसाठ मिनिटांनी स्क्रीनचा ताबा घेतल्याची मी लॉगमध्ये नोंद केली व पश्चिमेकडील स्क्रीनसमोर जाऊन उभा राहिलो.

एका विमानाला सूचना देण्यात सतीश गढून गेला होता उत्तरेकडील स्क्रीनवर बसलेल्या कट्रोलरबरोबर सुपरवायझर कसला तरी विचारविनिमय करीत होता नेहमीसारखे शातपणे कट्रोलरूममधील काम चालले होते

आणि अचानकपणे मला ही गोष्ट दिसली पश्चिमेकडील स्क्रीनच्या एका कोपऱ्यात दोन चमचम करणाऱ्या चादण्या एकमेकींच्या अगदी जवळ आल्या होत्या कोठे तरी दोन विमाने एकमेकाच्या अगदी जवळ आली होती आणि ही गोष्ट दुर्दैवाने सतीशच्या लक्षात आली नव्हती तावडतोब ती दोन विमाने एकमेकापासून दूर करणे अत्यत आवश्यक होते

'लुक आउट ! सतीश लुक आउट ! ' मी जवळजवळ ओरडलो माझ्या ओरडण्याने जणु काही कट्रोलरूममध्ये वीज पडल्यासारखे झाले जो तो माझ्याकडे पाहू लागला उत्तरेकडील स्क्रीनजवळ उभा असलेला सुपरवायझर धावत पश्चिमेकडील स्क्रीनजवळ आला त्यालाही ती गोष्ट दिसली सतीशलाही ती गोष्ट दिसली मला दरदरून घाम फुटला सुपरवायझरचा चेहेरा पण घामाने निथळत होता. त्याच्या नजरेतील भीती स्पष्ट दिसत होती सतीशचा चेहेरा पाढराफटक पडला होता अत्यत नर्व्हस नजरेने तो स्क्रीनकडे पहात होता. काय करावे हे त्याला समजत नव्हते कट्रोल रूममध्ये अक्षरशः पिनड्रॉप सायलेन्स पसरला होता पुढे काय होणार याची उत्सुकता व चिंता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर पसरली होती.

मी घाईघाईने पुढे सरकलो सतीशच्या हातातील माईक खेचून घेतला 'आयडेन्टिफाय द प्लेन्स ! ' मी सतीशला सांगितले 'वन इज इडियन एअरफोर्स हटर, टूक ऑफ फ्रॉम पूना हाफ् अॅन अवर अॅगो.' सतीश मला सागू लागला त्याचा आवाज खोल गेला होता 'गोइग ओव्हर टू ए सी फॉर प्रॅक्टिस ! आल्टिट्यूड टेन थाउजड फीट, स्पीड फाइव्ह हड्रेड थर्टी नॉटस् अॅन अवर ! कोर्स फ्रीक्वन्सी . .

'अॅन्ड द अदर वन् ? ' हटरची फ्रीक्वन्सी अड्जेस्ट करता करता मी विचारले ' ' नॉट आयडेन्टिफाईड सो फार ! ' ' मग्गळलेल्या आवाजात सतीशने सांगितले

मी स्क्रीनकडे पाहिले दोन चादण्या एकमेकींच्या अगदी जवळ आल्या होत्या 'हॅलो हटर ! धिस् इज सांताक्रूझ स्पीकिंग ! आयडेन्टिफाय युअरसेल्फ ' मी म्हणालो

'धिस इज हंटर स्पीकिंग ' हंटरच्या पायलटचा आवाज मला ऐकू आला.

'गो टू फिप्टीन थाउजंड फीट इमीजिएटली ! ! आय् रिपीट इमीजिएटली ! ' मी म्हणालो.

'ओ. के ' हंटरच्या पायलटने उत्तर दिले. काही क्षणातच दोन चांदण्यापैकी एक चादणी हलू लागली. तरीदेखील त्या दोन चांदण्या एकमेकींच्या अगदी जवळ होत्या.

'हॅलो, धिस् इज् सांताक्रूझ स्पीकिंग ! आयडेन्टिफाय युअरसेल्फ ! प्लीज आयडेन्टिफाय युअरसेल्फ इमीजिएटली ! धिस इज् व्हेरी इंपॉर्टन्ट ! ' या वेळी मी जनरल फ्रीक्वन्सीवर बोलत होतो दुसरे विमान कोणाचे आहे, त्याचा पायलट कोण आहे मला काहीच माहीत नव्हते एक-एक क्षण युगायुगासारखा वाटत होता पायलटच्या उत्तराची मी अत्यंत उत्कटतेने वाट पहात होतो.

'ओह् ए हेल ! सांताक्रूझ व्हॉट डू यू वॉन्ट ? ' थोडेसे रागीट, थोडेसे उर्मट शब्द माझ्या कानांवर आले.

'आयडेन्टिफाय युअरसेल्फ इमिजिएटली ' मी पुन्हा एकदा विनती केली. 'व्हाय ?' पुन्हा तेच उर्मट शब्द माझ्या कानावर आले कुठलाही पायलट ट्रॅफिक – कंट्रोलरचा असा उपमर्द कधीच करीत नसतो. हा कोणी तरी नवखा पायलट होता. विमान पण सरावातले नव्हते. पायलटचे हे उर्मट शब्द ऐकून माझ्याही रागाचा पारा चढला होता, पण आम्हाला असे रागावता येत नव्हते. शक्यतो आवाज शांत ठेवून मी त्याला सांगितले,

'प्लीज टर्न इमिजिएटली टू राइट बाय थर्टी डिग्रीज ! टिड्यूस युअर अल्टिट्यूड टू अेट थाउजंड फीट ! आय रिपीट थर्टी डिग्रीज टू राइट अॅन्ड अल्टिट्यूड अेट थाउजंट फीट इमिजिएटली ! अॅक्नॉलेज अॅन्ड कन्फर्म !'

'ओह् नॉन्सेन्स ! व्हाय शॅल् आय् ओबे युअर ऑर्डर्स ? धिस् प्लेन बिलॉंग्ज टू ए प्रायव्हेट फ्लाइंग क्लब; नॉट कमिंग अंडर युअर कन्ट्रोल !' पायलटचे उर्मट उत्तर मला ऐकू आले

मी कपाळावर हात मारून घेतला त्या विमानाला मी वाचवायचा प्रयत्न करीत होतो आणि त्या विमानाचा पायलट माझे ऐकत नव्हता. शेवटचा प्रयत्न म्हणून मी पायलटला सांगू लागलो. 'यस् आय् नो ! बट वन् अेअर फोर्स प्लेन इज डेंजरस्ली क्लोज्ड् बिहाइंड यू अॅन्ड ..'

पण मला माझे वाक्य पूर्ण करता आले नाही जे होऊ नये ते घडले. रडार स्क्रीनवर दोन चांदण्या एकत्र आल्या आणि हवेत त्या दोन विमानांची टक्कर झाली ! माझ्या सूचनेप्रमाणे हंटरच्या पायलटने पंधरा हजार फुटावर जायला सुरुवात केली आणि त्याच वेळी त्या दोन विमानांची टक्कर झाली. हंटरच्या पायलटला कल्पनाही नव्हती, पण त्याच्या विमानाच्या शेपटाकडील भागाने दुसऱ्या विमानाच्या पंखाला धडक मारली. दुसऱ्या विमानाचा एक पंख त्यामुळे तुटला व ते विमान खाली कोसळू लागले

खाली कोसळत असलेल्या विमानाचा रेडियो धक्क्याने बंद पडला आणि थोड्या वेळाने अचानक परत सुरू होऊन मला शब्द ऐकू आले 'ओह् गॉड ) हेल्प मी–हेल्प मी ! ! देवा, मला वाचव रे ! आमचे विमान समुद्रात कोसळून पडले आहे ! कोणी तरी वाचवा हो वाचवा ! ' जिवाच्या आकांताने उच्चारलेले पायलटचे शब्द माझ्या कानावर पडले आणि अगदी अनपेक्षितरीत्या एका पाच–सहा वर्षांच्या कोवळ्या मुलीचे कोवळे शब्द माझ्या कानावर आदळले, 'बाबा बाबा, मला वाचवा ! बाबा, मला एवढ्यात मरायचे नाही ! देवा, मी तुझी करुणा भाकते, तुझ्याकडे भीक मागते ! मला एवढ्यात मारू नकोस ! मला खूप जगायचे आहे ! देवा, मला वाचव रे देवा !'

त्या विमानातील प्रवाशाचे मी ऐकलेले हे शेवटचे शब्द, त्यानंतर रेडियो बंद पडला आणि ती चांदणीही स्क्रीनवरून दिसेनाशी झाली. विमान समुद्रात कोसळले !

नंतर मला त्या विमानाची अधिक माहिती मिळाली. एका खाजगी फ्लाइंग क्लबचे ते एक छोटे, सिक्स सीटर, पायपर विमान होते श्री सुब्रह्मण्यम हे मुंबईचे एक प्रख्यात बिल्डिंगकॉन्ट्रॅक्टर त्यांच्या पत्नीसह व बारा आणि सहा वर्षांच्या त्यांच्या दोन मुलींसह अपघात झालेल्या विमानात होते श्री सुब्रह्मण्यम यांना विमान चालवण्याची आवड होती व त्यांच्याकडे पायलटचे लायसन्सपण होते. अपघात घडला तेव्हा श्री सुब्रह्मण्यम स्वत विमान चालवीत होते. ते आपल्या कुटुंबियांना घेऊन मजेची सहल करायला म्हणून गेले होते. अपघात मुंबईपासून शंभर मैल उत्तरेकडे व बारा मैल समुद्रात घडला होता. अपघात झाल्यावर तांबडतोब शोधायला सुरुवात झाली, पण विमानाचे अवशेष सापडायला व प्रेते मिळायला तीन दिवस लागले ! त्यांच्या सहा वर्षांच्या मुलीचे, जिचा कोवळा आवाज मी शेवटच्या घटकेला ऐकला होता;– प्रेत शेवटपर्यंत मिळाले नाही समुद्रातील माशांनी श्री सुब्रह्मण्यम यांच्या प्रेताची अगदी दुर्दशा करून टाकली होती.

मुंबईजवळ अशा प्रकारे घडलेला हा पहिलाच अपघात होता या अपघाताने चांगलीच खळबळ उडाली सरकारने तांबडतोब अेअर फोर्समधील एक उच्च अधिकारी, अेअर इंडियाचे एक निवृत्त पायलट व एक निवृत्त न्यायाधीश अशा तिघांची एक चौकशीसमिती नेमली त्यानंतर बरेच दिवस या समितीची चौकशी चालू होती. अनेक साक्षीपुरावे गोळा करण्यात आले. सर्व पुराव्यांची कसून छाननी केल्यावर हा अपघात पायलटने कंट्रोलर्सच्या सूचना न पाळल्यामुळे झाला असल्याचा निष्कर्ष समितीने काढला, पण त्याचप्रमाणे योग्य वेळी हालचाल केली असती तर कंट्रोलर्सना हा अपघात जरूर टाळता आला असता असाही निष्कर्ष समितीने काढला. योग्य वेळी हालचाल न केल्यामुळे कंट्रोलर्सवर हलगर्जीपणाचा आरोप ठेवून त्यानापण या अपघाताबद्दल दोषी ठरविण्यात आले

जेव्हा कंट्रोलर्स पायलटशी बोलत असतात तेव्हा त्यांचे बोलणे आपोआप टेप होत असते. अपघातावेळचे माझेही बोलणे टेप झाले होते. तो टेप अनेक वेळा पुन्हा पुन्हा ऐकून समितीने मला निर्दोष ठरविले व हलगर्जीपणाबद्दल सतीश व त्या वेळचे सुपरवायझर यांना दोषी ठरविले उलट शेवटच्या क्षणापर्यंत अपघात टाळण्याचा प्रयत्न केल्याबद्दल माझे मात्र चौकशी समितीने खास कौतुक केले

दोषी ठरविण्यात आलेल्या सुपरव्हाझरला तांबडतोब सक्तीने निवृत्त करण्यात आले व सतीशला नोकरीवरून काढून टाकण्यात आले बिचारा सतीश ! नुकतेच कुठे त्याचे आयुष्य घडायला सुरुवात झाली होती तोच

त्याचे आयुष्य उध्वस्त झाले ! सतीश जेव्हा निरोप घ्यायला आला तेव्हा आम्हा सर्वांनाच खूप वाईट वाटले. त्यानंतर मला सतीश-विषयी एक-एक दुःखदायक बातम्या समजू लागल्या. एका सुंदर मुलीशी सतीशचा विवाह ठरला होता, त्याचा साखरपुडा पण झाला होता; पण नंतर त्या मुलीने सतीशशी विवाह करायला नकार दिला सतीशला दुसरीकडे कोठे नोकरी पण मिळेनाशी झाली पुढे कळले की, झालेल्या मनस्तापामुळे सतीशला वेड लागले त्याला ठाण्याच्या इस्पितळात ठेवण्यात आले आणि एके दिवशी 'मी खुनी आहे ! मी चार निरपराध माणसे मारली ! मी खुनी आहे !' असे म्हणत सतीशने आत्महत्या केली ! त्या अपघातानंतर सहा महिन्यांच्या आतच सतीशची जीवनयात्रा संपुष्टात आली

पण या प्रसंगाचा माझ्या जीवनावर खोल-वर, दूरगामी परिणाम झाला मी दहा मिनिटाऐवजी पाच मिनिटातच परतलो असतो किंवा एखादुसरे मिनिट लवकर जरी परतलो असतो तरी तो अपघात टळला असता, पुढील सर्व शोकांतिका टळली असती. पुराव्याअभावी जरी मी निर्दोष सुटलो असलो तरी या अपघाताची संपूर्ण नैतिक जबाबदारी माझ्यावरच होती. माझ्या हल-गर्जीपणामुळेच हा अपघात घडला होता ! माझ्या हलगर्जीपणामुळेच सुब्रह्मण्यम-कुटुंब व सतीश बळी पडले होते त्यांचा काहीही दोष नसताना !

माझे मन मला खाऊ लागले ! श्री सुब्रह्मण्यम् यांच्या सहा वर्षांच्या मुलीचे दीनवाणेपणाने उच्चारलेले ते शेवटचे शब्द माझ्या कानात घुमू लागले सतीशचा दीन-वाणा चेहरा माझ्या नजरेसमोर उभा राहू लागला. एके रात्री मला स्वप्न पडले श्री सुब्रह्मण्यम्, त्यांची न पाहिलेली सहा वर्षांची निष्पाप मुलगी आणि सतीश माझ्या पुढे उभे राहिले अगदी व्याकूळ नजरेने डोळ्यात पाणी आणून मला विचारू लागले, 'आम्ही तुझा काय अपराध केला होता की ही भयंकर शिक्षा तू आम्हाला दिलीस ? बोल, आमची काय चूक होती ? आम्ही तुझे काय वाकडे केले होते ? बोल ! बोल !!' मी दचकून जागा झालो मला घाम फुटला होता माझे हृदय धडधडत होते ! त्या रात्री मला झोप आली नाही. पुढे हे स्वप्न मला वारंवार पडू लागले माझी झोप उडाली माझे मन किती दुबळे आहे याची खात्री त्या वेळी मला पटली

माझ्या वागणुकीत फार फरक पडला मी कामाशिवाय कोणाशी बोलेनासा झालो एकांतात मी अगदी घुम्यासारखा बसून राहू लागलो कधीकधी असंबद्ध बडबड लागलो मला निद्रानाशाचा विकार जडला. एरवी मी स्वतःला घरात कोंडून घेऊ लागलो माझे केस या वयातच पांढरे पडू लागले. नंदाला माझी सहानुभूती आधीच वाटत नव्हती. माझ्या मानसिक असहाय्यतेचा पुरा-पुरा गैरफायदा तिने उठवला ! तिने मला वेडा-खुळा ठरविले त्यातल्या त्यात सुदैव एवढेच की, याचा काही वाईट परिणाम माझ्या नोकरीवर अजूनपर्यंत तरी झालेला नाही माझी नोकरी अबाधित आहे

माझ्या दुबळ्या मनाने या परिस्थितीशी टक्कर द्यायचा गेली तीन वर्षे मी प्रयत्न केला आहे यात माझा पूर्ण पराभव झालेला आहे गेली तीन वर्षे अशा या भयाण परिस्थितीत मी जगतो आहे आत्महत्या हाच या परि-स्थितीवर उत्तम तोडगा आहे आणि मी हेच करायचे ठरविले आहे !

## : २ :

मी ड्यूटीवर जाण्यासाठी घराबाहेर पडलो तेव्हा आकाश ढगाळलेले होते. मनस्वी उकडत होते वातावरण उदास झाले होते एअरपोर्टवर पोचेपर्यंत पाऊस पडू लागला. माझ्या आयुष्यातील ही शेवटची सध्याकाळ अशी उदासवाणी जावी याचे मला किंचित वाईट वाटले

मी कंट्रोलरूममध्ये पाय ठेवला तेव्हा मुसळधार पाऊस कोसळू लागला अर्थात ते पावसाळ्याचेच दिवस होते म्हणा आणि त्यातून मुंबईचा पाऊस ! मी कंट्रोलरूममध्ये शिरलो आणि नेहमीप्रमाणे साऱ्या वाता-वरणापासून अलिप्त-वेगळा झालो.

घड्याळाचे काटे फिरत होते मिनिटे, तास निघून जात होते माझ्या आयुष्याचा अंत जवळ-जवळ येत होता रात्रीचे नऊ वाजून गेले काही तासावरच माझ्या आयु-ष्याचा अंत येऊन ठेपला होता खिशातील झोपेच्या गोळ्यांच्या बाटलीची अधूनमधून तीव्रतेने जाणीव होऊ लागली

कंट्रोलरूमच्या कोपऱ्यात ठेवलेला लाल रंगाचा इंटरकॉम वाजला तेव्हा मला थोडे आश्चर्य वाटले ! या इंटरकॉमवरून एकच व्यक्ती बोलू शकत होती ती म्हणजे आमचे बॉस, चीफ कंट्रोलर तसेच काही खास गोष्ट असल्याशिवाय आमचे बॉस सहसा इंटरकॉमचा वापर करीत नसत

मी इंटरकॉमचा लाल रंगाचा रिसीव्हर उचलला 'तू काय करतो आहेस ?' बॉसने विचारले बॉसचा प्रश्न ऐकून मी थोडा बुचकळ्यात पडलो मी करीत असलेल्या कामाची त्यांना थोडक्यात कल्पना दिली 'गो ओव्हर टू द वेस्टर्न स्क्रीन अ‍ॅन्ड टेक चार्ज ऑफ इट ! आय अ‍ॅम कमिंग देअर.' बॉस म्हणाले व इंटरकॉम बंद झाला. बॉसच्या बोलण्यात एक प्रकारची अर्जन्सी होती

काही खास कारण किंवा कठीण समस्या असल्याशिवाय सुपरवायझर्सना कंट्रोलर्सकडून रडार-स्क्रीनचा ताबा घ्यावयास सहसा सांगत नाहीत. ज्या अर्थी मला पश्चिमेकडील रडारचा ताबा घ्यायला सांगितले होते त्या अर्थी काही खास कारण असले पाहिजे.

मी लगेच पश्चिमेकडील स्क्रीनचा ताबा घेतला स्क्रीनजवळ बसलेल्या कंट्रोलरच्या गोंधळलेल्या व प्रश्नांकित चेहऱ्याला मी मख्ख चेहऱ्याने उत्तर दिले कारण मला स्वतःलाच काय भानगड आहे ते ठाऊक नव्हते

कंट्रोलरूमचा दरवाजा उघडला गेला व आमचे बॉस आत आले. ते सरळ माझ्या-जवळ येऊन उभे राहिले कमलरा तरी काळ-जीची छाया त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती 'तू चार्ज घेतलास ? ठीक आहे !'

**तीन वर्षे अशा भयाण परिस्थितीत मी जगतो आहे. आत्महत्या....हा एकच उपाय !**

बॉस म्हणाले, 'तयार रहा! इमर्जन्सी नंबर वन इज कमिंग!'

माझ्या हृदयाचा ठोका चुकल्यासारखे झाले इमर्जन्सी नंबर वन– अत्यंत कठीण इमर्जन्सी!! मला एकदम भीती वाटू लागली माझ्या आयुष्यातील शेवटच्या वेळी माझ्यावर फार मोठी जबाबदारी टाकण्यात येत होती काय मी ती जबाबदारी पेलू शकेन? माझी मलाच खात्री वाटत नव्हती. क्षणभर वाटले की बॉसना सरळ नाही म्हणून टाकावे, पण त्याच्या भेदक नजरेने मला गप्प बसविले

या वेळची इमर्जन्सी पॅन-अमेरिकन विमानकंपनीच्या एका बोइंग ७०७ विमानामुळे उद्भवली होती हे विमान लंडनहून बेरुत, कुवेत व कोलंबोमार्गे सिंगापूरकडे चालले होते दुर्दैवाने या विमानाच्या चार एन्जिन्सपैकी एका एन्जिनला आग लागली व ते एन्जिन बंद पडले आता ते विमान तीन एन्जिन्सवरच उडत होते, पण त्या विमानाला अशा प्रकारे फार वेळ उडता येणार नव्हते विमानाला ताबडतोब लँन्डिंग करणे अत्यंत आवश्यक होते. विमानात १०८ प्रवासी व ५ कर्मचारी मिळून एकूण ११३ लोक होते या सर्वांचे प्राण धोक्यात होते. या दुर्दैवी विमानाला लँन्डिंग करायला सर्वांत जवळचा आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणजे मुंबईचा सांताक्रूझ विमानतळच होता विमानाच्या कॅप्टनने पाठवलेला एस्. ओ. एस्. संदेश काही वेळापूर्वीच आमच्या बॉसना त्याच्या केबिनमध्ये असलेल्या खास यंत्रणेमार्फत मिळाला होता. त्या संदेशाप्रमाणे विमानाच्या कॅप्टनने विमान सांताक्रूझवर उतरवायचा निर्णय घेतला होता व त्याप्रमाणे कारवाईला सुरुवात पण केली होती. आता ते दुर्दैवी विमान सांताक्रूझवर सुखरूप उतरवून घ्यायची फार मोठी जबाबदारी आमच्यावर होती व त्यासाठी योग्य ती तजवीज करण्यासाठी आमचे बॉस जातीने उपस्थित होते

पण वरील विमान सांताक्रूझवर उतरवून घेणे फार कठीण जाणार होते. निसर्ग जवळजवळ आमच्या विरुद्ध गेला होता. बाहेर मुसळधार पाऊस पडत होता नुकत्याच आलेल्या 'वेदर रिपोर्टस्'प्रमाणे मुंबईला काळ्याकुट्ट ढगानी वेढले होते. वाऱ्याचा वेगही काळजी करण्याइतपत वाढला होता व बंदरातून वादळी बावटे लावण्यात आले होते असेच हवामान जर बराच वेळ राहिले तर आम्हाला पण एअरपोर्ट काही तासांनी बंद करावा लागणार होता अशा हवेत धडधाकट विमानानादेखील उतरणे कठीण जात होते, तर अपघातग्रस्त विमानाला उतरणे फारच कठीण जाणार होते तरीदेखील ११३ लोकांचे प्राण वाचवायचे आव्हान आमच्या बॉसने स्वीकारले होते. या कठीण परिस्थितीत ट्रॅफिक–कंट्रोलरवर अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पडणार होती अपघातग्रस्त विमान व बाकीचे सर्व जग याच्यामधील तो एकमेव दुवा ठरणार होता 'ही इमर्जन्सी तूच उत्तम प्रकारे हाताळू शकशील अशी मला खात्री वाटते आणि म्हणूनच मी तुला रडार-स्क्रीनचा ताबा घ्यायला सांगितले आहे. आता कोणत्याही क्षणी विमान रडार-स्क्रीनवर दिसू लागेल त्याला उत्तम मार्गदर्शन करून ते विमान सुखरूप उतरविण्याची जबाबदारी आता तुझी आहे!' माझ्या पाठीवर हळुवारपणे थोपटीत बॉस म्हणाले

क्षणभर माझ्या मनात नकार दर्शविण्याची जबरदस्त इच्छा निर्माण झाली वाटले की बॉसला सरळ सांगून टाकावे की ही जबाबदारी माझ्यावर टाकू नका! आयुष्याच्या शेवटच्या घटकेला ही जबाबदारी माझ्याच्याने पेलवणार नाही जर माझ्या हातून एखादी चूक झाली आणि त्यामुळे त्या विमानाला अपघात झाला तर? माझे मन इतके हळवे, दुबळे बनले होते की तो अपघात सहन करण्याची ताकदच माझ्यात नव्हती मला धड सुखाने मरता पण येणार नव्हते, पण त्याच वेळी माझे दुसरे मन मला म्हणाले, 'आयुष्याच्या शेवटच्या क्षणी का होईना पण एक सत्कृत्य करायची संधी तुला मिळत असताना तू ती का स्वीकारीत नाहीस? नाही तरी तू आत्महत्या करणारच आहेस! तेव्हा ही संधी घ्यावयास काय हरकत आहे?'

मी आजूबाजूला पाहिले बॉस केव्हाच निघून गेले होते खिन्न नजरेने मी स्क्रीनकडे पाहिले आणि त्याच क्षणी चमचम करणारी एक भली मोठी चांदणी स्क्रीनच्या एका कोपऱ्यात दिसू लागली. हेच ते अपघातग्रस्त विमान होते विमानाने रेडियोद्वारे डेंजर सिग्नल द्यायला सुरुवात केली होती. त्यामुळेच ते विमान दर्शविणारी रडार-स्क्रीनवरची चांदणी अगदी उठून दिसत होती इतर सर्व विमानापासून कंट्रोलरचे लक्ष अपघातग्रस्त विमानाकडे जावे म्हणून ही योजना मुद्दाम केलेली होती

मी घाईघाईने विमानाची फ्रीक्वन्सी अडजेस्ट केली व विमानाच्या कॅप्टनशी संपर्क साधला

'हॅलो! धिस् इज् सांताक्रूझ स्पीकिंग! प्लीज अॅक्नालेज!' मी म्हणालो

'हॅलो सांताक्रूझ! धिस् इज् पॅन अमेरिकन फ्लाइट न स्पीकिंग!' विमानाच्या कप्तानाचा धीरगंभीर आवाज मला ऐकू आला माझा आवाज ऐकल्यामुळे कॅप्टनच्या आवाजात एक प्रकारचा रिलीफ आला होता 'वुई आर इन ग्रेट डेंजर! आम्हाला ताबडतोब सांताक्रूझवर लॅन्डिंग करायचे आहे!' कॅप्टनचे शब्द मला ऐकू आले

'प्लीज डू नाट वरी! आम्ही सर्वतोपरी तयार आहोत फक्त तुमच्यावरील संकटाची आम्हाला पूर्ण माहिती द्या!' मी म्हणालो

कुवेतला रिफ्यूएलिंगनंतर विमानाने उड्डाण केल्यावर थोड्या वेळातच विमानाच्या एका इंजिनमध्ये काही तरी बिघाड असल्याचे प्रथम को – पायलटच्या लक्षात आले, पण तोपर्यंत विमान कुवेतपासून बरेच दूर गेले होते विमान कुवेतहून सरळ कोलंबोला थांबणार होते, पण एका एंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे पायलट्सनी ते विमान कराचीकडे वळविले. कराचीला विमानाची संपूर्ण तपासणी करण्यात येऊन एंजिनमधील दोष काढून टाकण्यात आला व विमानाने कराचीहून उड्डाण केले, पण त्याचे दुर्दैव एवढ्यात संपले नव्हते कराचीहून उड्डाण केल्यावर काही वेळ विमानाने विनासायास उड्डाण केले, पण त्यानंतर विमानाच्या दुसऱ्या एंजिनमधून प्रथम धूर येऊ लागला व नंतर ज्वाला दिसू लागल्या त्यानंतर काही वेळानेच ते एंजिन बंद पडले त्या वेळी विमान मुंबईपासून ३७५ मैल उत्तर–पश्चिमेकडे समुद्रावर होते कॅप्टनने लगेच एस्. ओ एस् संदेश पाठवायला सुरुवात केली व त्याचा तिसरा संदेश आम्हाला मिळाला विमानाच्या एका एंजिनने पेट घेतल्याची व ते बंद पडल्याची

जाणीव बऱ्याच प्रवाशाना झाली व त्यामुळे घाबरून जाऊन त्यानी गोंधळ करायला सुरुवात केली शेवटी विमानाच्या कर्मचाऱ्यानी मोठ्या मेटाकुटीने सर्व प्रवाशाना गप्प बसविले एक एंजिन बंद पडल्यामुळे विमानाचा तोल जाऊन ते एका बाजूला कलते होऊन उडू लागले ताबडतोब कॅप्टनने ३५ हजार फुटावरून उडणारे विमान हळूहळू १० हजार फुटावर आणले. तसेच विमानातील शक्य तेवढे सामान फेकून देऊन विमानाचे वजन कमी करण्यात आले. मी ज्या वेळी विमानाशी संपर्क साधला त्या वेळी एअर होस्टेजेसच्या सहाय्याने सर्व प्रवाशाना लाइफ जॅकेटस् चढविण्यात येत होती. एक एंजिन बंद पडल्यामुळे विमानाचा वेग पण बराच कमी झाला होता व विमान ताशी २२० मैल वेगाने उडत होते आणि अशा या परिस्थितीत विमान मुंबईपर्यंत पोचेल किंवा नाही याची आम्हा सर्वांनाच काळजी वाटत होती. शेवटी आपल्या धीरगंभीर आवाजात कॅप्टन म्हणाला, 'कंट्रोलर! व्हूएव्हर यु आर! पण लक्षात ठेव की आम्हा सर्वांचे प्राण तुझ्या हातात आहेत! डोन्ट वरी अबाउट द प्लेन! मी विमान उडते ठेवण्याच्या प्रयत्नाची शिकस्त करीन पण लँडिंगच्या वेळी मात्र मी पूर्णपणे तुझ्यावर अवलंबून असणार आहे!'

मी चेहऱ्यावरील घाम निपटून काढला व आजुबाजूला नजर टाकली. माझे बॉस व एअरपोर्टचे जनरल मॅनेजर माझ्याजवळ उभे होते चिंताग्रस्त चेहऱ्याने ते माझ्याकडे पहात होते मी माईक बंद केला व कॅप्टनशी झालेल्या संभाषणाची थोडक्यात माहिती त्याना सांगितली विमानाची गती, विमानाची दिशा, वाऱ्याची गती व दिशा याचा काळजीपूर्वक विचार करून विमानाला सांताक्रूझवर पोचायला आणखी ४० ते ४५ मिनिटे लागतील असा मी हिशोब केला या वेळात आम्हाला खूपच गोष्टी करायच्या होत्या

आम्ही झटपट हालचालींना सुरुवात केली बॉस भराभर कंट्रोलरूममधील फोनची डायल फिरवू लागले ते कोठे कोठे फोन करीत आहेत याची पूर्ण कल्पना मला होती प्रथम ते ॲम्ब्युलन्स व फायर-ब्रिगेड याना ताबडतोब रनवेवर जायची सूचना देणार होते. नतर सर्व आतरराष्ट्रीय विमान कपन्या व इंडियन एअरलाइन्सला सर्व विमानाची उड्डाणे पुढे ढकलल्याचे सांगणार होते त्या कपन्यांच्या फक्त प्रमुख व्यक्तींनाच उड्डाण पुढे ढकलल्याचे खरे कारण कळणार होते. पॅन-अमेरिकन कपनीच्या मुंबईतील प्रतिनिधीला फोन करून ताबडतोब विमानतळावर यायची विनती ते करणार होते जवळच्या एअर फोर्स स्टेशनला फोन करून अपघातग्रस्त विमानाला सोबत करायला एअर फोर्सची विमाने पाठविण्याची विनती करणार होते तसेच भारतीय नौदलाच्या मुंबई येथील प्रमुख कचेरीस फोन करून मदत लागली तर तयार रहाण्याचे आदेश ते देणार होते शात आणि धीरगंभीर आवाजात जरी बॉस बोलत होते तरी दुसऱ्या टोकाला फोन ऐकणाऱ्या व्यक्तीला छोटासा शॉक बसल्यासारखे होणार होते

मी पण भराभर हालचालींना सुरुवात केली त्या क्षणापासून १० ते १५ मिनिटाच्या आत जी विमाने सांताक्रूझवर उतरण्याच्या स्थितीत असतील तेवढीच विमाने उतरवून घेण्याचे आदेश मी इतर कंट्रोलर्सना दिले त्यानतर विमानतळ अपघातग्रस्त विमान उतरेपर्यंत इतर सर्व विमानाना बंद करण्यात येणार होता त्याचप्रमाणे उतरण्याची वाट बघत विमानतळावर घिरट्या घालीत असलेल्या विमानानी १० हजार फूट वा त्याहून कमी उंचीवरून उडू नये, तसेच ज्या विशिष्ट फ्रीक्वेन्सीवर मी अपघातग्रस्त विमानाच्या कॅप्टनशी बोलत होतो ती फ्रीक्वेन्सी इतर कोणीही वापरू नये असे आदेश मी दिले

फोन करून बॉस माझ्याजवळ आले व म्हणाले, 'हवाईदलाची दोन विमाने ताबडतोब उड्डाण करीत असून ती संकटग्रस्त विमानाला सोबत करतील त्याचप्रमाणे गरज पडली तर दोन हेलिकॉप्टर्स पण तयार ठेवण्यात येत आहेत सुदैवाने भारतीय नौदलाचे आय एन. एस निलगिरी हे जहाज विमानाच्या जवळपासच समुद्रात संचार करीत असून त्याला संकटग्रस्त विमानाच्या मदतीसाठी तयार रहाण्याचे आदेश देण्यात आले आहेत आता आपण विमानाचा ठावठिकाणा मिनिटामिनिटाने निलगिरीस कळवायचा!'

मी विमानाच्या कॅप्टनशी परत संपर्क प्रस्थापित करून त्याला आम्ही केलेल्या तयारीची पूर्ण कल्पना दिली आणि शेवटी म्हणालो, 'माय ब्रदर! वुई ऑल आर इन्व्हॉल्व्हड् मेटली अॅज मच अॅज यू आर! हवाईदलाची विमाने तुम्हाला हवेत व आय. एन एस निलगिरी समुद्रावरून तुम्हाला सोबत करीत आहेत!'

माझी खात्री होती की माझ्या या शब्दानी कॅप्टनला बरे वाटणार होते किती झाले तरी कॅप्टन हा एक माणूसच होता संकटात आपल्याला कोणी तरी सोबत करते आहे या कल्पनेनेच माणसाला एक प्रकारचा हुरूप येतो, उत्साह येतो माझा अंदाज खरा ठरला. कॅप्टनचा आवाज अधिक स्वच्छ, मोकळा येऊ लागला त्याच्या आवाजातील मळवट दूर झाले.

मी माझे डोळे रडारस्क्रीनवर जणू काही रुतवून बसलो. मिनिटा-मिनिटाला विमानाचा ठावठिकाणा कळवू लागलो थोड्याच वेळात हवाईदलाच्या विमानाचे संदेश यावयास सुरुवात झाली. त्याना संकटग्रस्त विमान सापडले होते. विमानाच्या स्टारबोर्ड साईडच्या एका एंजिनाने पेट घेतला असून त्याच्या ज्वाळा स्पष्ट दिसत असल्याचे हवाईदलाच्या एका पायलटने सांगितले विमान जवळजवळ ३० ते ३५ अंशानी एका बाजूला कलते होऊन उडत असल्याचेही त्याने सांगितले. सुदैवाने विमानाच्या आसपासचे वातावरण स्वच्छ होते, हवेत ढग नव्हते.

हळूहळू विमान मुंबईच्या जवळ-जवळ येत होते एक-एक मिनिट आम्हाला युगा-युगासारखे वाटत होते. आम्ही सर्वांनीच मनातल्या मनात देवाचा धावा करायला सुरुवात केली होती विमानाला मुंबईला पोचायला जवळजवळ ३५ मिनिटाचा अवधी होता

आणि विमानाच्या कॅप्टनने आमच्यावर आणखी एक जबरदस्त बाँबगोळा टाकला.

## कंट्रोलर! पण लक्षात ठेव की आम्हा सर्वांचे प्राण तुझ्या हातात आहेत!

त्यामुळे आम्ही सर्वजण चांगलेच हादरून गेलो. अचानक मला कॅप्टनचे 'ओह् जिझज्! व्हॉट शॅल आय डू!' असे शब्द ऐकू आले त्या शब्दांतील भीती आणि निराशा स्पष्टपणे कळत होती. 'व्हॉट्स् द मॅटर?' मी लगेच विचारले आणि कॅप्टनने जे सांगितले ते ऐकून आम्ही सर्वजण घाबरून गेलो. कराचीला दुरुस्त केलेल्या विमानाच्या एंजिनने ऐनवेळी दगा द्यायला सुरुवात केली त्या एंजिनमध्ये अचानक बिघाड होऊन ते एंजिन मधेच बंद पडू लागले. शेवटी कॅप्टनला ते एंजिन बंद ठेवावे लागले. आता हजारो टन वजनाचे ते प्रचंड जेट विमान ११३ प्रवाशासह फक्त दोन एंजिन्सवर उडू लागले. आता विमानाने समुद्र जवळजवळ पार केला होता व कोणत्याही क्षणी विमान जमिनीवरून उडू लागणार होते. विमान जमिनीवर कोसळले तर आतील प्रवासी वाचायची सुतराम शक्यता नव्हती त्यामुळे विमानाची दिशा बदलून विमान जास्तीत जास्त समुद्रावरून उडत ठेवणे अत्यंत आवश्यक होते. त्याचप्रमाणे विमानाला अजून एका संकटाला तोंड द्यावे लागणार होते. विमानाच्या कॅप्टनला याची कल्पना नव्हती पण मला होती! थोड्याच वेळात विमान मुंबईच्या वादळी हवेत, काळ्याकुट्ट ढगात प्रवेश करणार होते. अशा परिस्थितीत विमान वाचणे जवळजवळ अशक्यप्राय होते

मी माईक बंद केला! इअरफोन ओरबाडून काढून टाकला आणि उभा राहून बॉसला म्हणालो, 'सॉरी सर! एक्स्क्यूज मी! बट् आय् कान्ट हॅन्डल धिस्! आय् कान्ट हॅन्डल धिस्!' 'वॉटस् द मॅटर?' बॉस ओरडले. त्यांच्या आवाजात चीड होती, संताप होता. अत्यंत रागावलेल्या नजरेने ते माझ्याकडे पाहत होते.

'विमानाचे आणखी एक एंजिन बिघडले आहे. विमानाला अजून मुंबईच्या वादळी हवेला तोंड द्यायचे आहे! विमान वाचविणे माझ्या ताकदीपलीकडचे आहे! मला हे हाताळणे शक्य नाही सर! कृपा करून दुसऱ्या कंट्रोलरकडे याचा चार्ज द्या! मला घरी जाऊ द्या!' मी म्हणालो. बॉस क्षणभर आपल्या भेदक नजरेने माझ्याकडे पाहत राहिले आणि मग शांत पण निश्चयी स्वरात म्हणाले, 'यू आर बाऊंड टू हॅन्डल धिस! ही इमर्जन्सी तुलाच हाताळावी लागेल. कारण तुझ्याशिवाय दुसरे कोणीही, अगदी मीसुद्धा, ही इमर्जन्सी हाताळू शकणार नाही! लक्षात ठेव, ११३ लोकांच्या जीवन-मृत्यूचा हा प्रश्न आहे. दुर्दैवाने विमान समुद्रात कोसळले तर त्याला कोणाचाच इलाज नाही तरीदेखील विमान वाचवायचे प्रयत्न आपल्याला करायला हवेत. आम्ही सर्वजण खंबीरपणे तुझ्या पाठीशी उभे आहोत! आणि एक लक्षात ठेव! तुझी माघार म्हणजे आम्हा सर्वांचा पराभव आणि विमानातील लोकांच्या जगण्याच्या आशेचा शेवट आहे! तू फारच चांगल्या रीतीने ही इमर्जन्सी हाताळतो आहेस! कमॉन्, गो अहेड ॲन्ड टॅकल् इट्!'

मी क्षणभर उभा राहिलो. माझ्या मनात विचारकल्लोळ माजला होता. मी जर या क्षणी माघार घेतली तर? मी शांतपणे पण दृढ निश्चयाने खाली बसलो, इअरफोन कानावर चढवला व माईकचा स्विच ऑन केला.

'हॅलो, सांताक्रूझ! आर् यू देअर?' विमानाच्या कॅप्टनचे शब्द माझ्या कानावर आले.

'येस्! आय् ॲम् व्हेरिमच हिअर!' मी उत्तर दिले.

'थँक गॉड! तुझा आवाज येईना तेव्हा मी भयंकर घाबरलो! वाटलं रेडिओ बंद पडला की काय?' कॅप्टन म्हणाला.

'आता परिस्थिती कशी आहे?' मी विचारले.

'पहिल्यापेक्षा आणखी खराब!' कॅप्टन म्हणाला, 'दोन एन्जिन्सवर कसेबसे विमान उडत ठेवले आहे! आणखी एक एंजिन बंद पडल्यामुळे विमानाचे ॲल्टिट्यूड १० हजार फुटावरून ५६ हजार फुटावर आली आहे विमानाचा वेग ताशी १९० मैल एवढा कमी झाला आहे आणि त्यातून आणखी एक संकट निर्माण झाले आहे. आम्हाला काळ्याकुट्ट ढगांनी वेढले आहे. आजुबाजूचे अक्षरशः काही दिसत नाही. तुम्ही पाठवलेली एअरफोर्सची विमाने पण ढगात गुप्त झाली आहेत. आता आमचे विमान मुंबईपर्यंत पोचेल किंवा नाही शंकाच आहे!' विमानाने मुंबईच्या वादळी हवेत प्रवेश केला होता तर?

'डोन्ट वरी! देवावर भरवसा ठेवा! तुम्ही फक्त ५० मैल मुंबईपासून दूर आहात. आणखी फक्त २० मिनिटात तुम्ही लँडिंग करणार आहात. तोपर्यंत वेळ काढा फक्त! थोड्याच वेळात मी लँडिंग इन्स्ट्रक्शन्स् द्यायला सुरुवात करणार आहे!' मी शांत आवाजात जरी बोलत होतो तरी माझे हातपाय थरथर कापत होते आता मला अत्यंत अवघड गोष्टीला तोंड द्यायचे होते आता माझ्या खऱ्या कसोटीची वेळ होती आणि या वेळची क्षुल्लक चूक सुद्धा अनेक लोकांच्या प्राणावर नक्कीच बेतणार होती.

विमान जास्तीत जास्त वेळ समुद्रावरून न्यायचे असल्यामुळे मी विमानाची दिशा बदलली होती. आता परत विमानाची दिशा बदलून मला विमान मुंबईकडे वळवून घ्यावे लागणार होते. ढगांमुळे पायलटस्‌ना काहीच दिसत नव्हते. त्यामुळे लॅन्डिंगच्या वेळी त्यांना पूर्णपणे माझ्यावरच अवलंबून रहावे लागणार होते सर्व परिस्थितीचा अभ्यास करून विमानाला योग्य तो लॅन्डिंग ॲंगल देणे जरुरीचे होते तसेच विमानाने किती वेगाने खाली यायला हवे हे पण ठरवायचे होते त्यामुळे लॅन्डिंग इन्स्ट्रक्शन्स्‌मध्ये थोडी सुद्धा चूक होऊ देता उपयोगाची नव्हती. नाही तर विमान रनवेच्या अलीकडेच उतरण्याची वा रनवेवर खूप पुढे उतरून ओव्हर शूट व्हायची दाट शक्यता होती. कदाचित पश्चिमेकडून येणारे हे संकटग्रस्त विमान जुहू, विलेपार्ले, सांताक्रूझ या मुंबईच्या दाट लोकवस्ती असलेल्या उपनगरात कोसळून फार मोठा अपघात व्हायची शक्यता होती.

मनातल्या मनात देवाचा धावा करीत मी स्लाइड रूल, नुकतेच आलेले वेदर चार्टस् व वेदर रिपोर्टस् जवळ ओढले व विमानाचा लॅन्डिंग ॲंगल शोधू लागलो. ही पाच मिनिटे मी गुतागुंतीची आकडेमोड करण्यात गुंतून गेलो होतो

'ओके! यू नाऊ लोअर लॅन्डिंग गिअर्स' मी कॅप्टनला सांगितले.

'यू कॅन स्टार्ट रिड्यूसिंग युअर ॲल्टिट्यूड! पण मिनिटाला शंभर फुटापेक्षा जास्त वेगाने खाली यायचे नाही. ॲन्ड कीप लेव्हल फ्लाइंग ॲट ऑल ॲल्टिट्यूडस्!'

'ओके!' कॅप्टनने उत्तर दिले. 'हिअर वुई गो!' पण मी सांगितलेल्या वेगापेक्षा अधिक वेगाने विमान खाली येऊ लागले.

प्रत्येक ॲल्टिटयूडला लेव्हल फ्लाइंग सांगि‐तले असताना विमान २२ अंशांचा कोन करून खाली येऊ लागले या प्रकारे विमान खाली आले तर मुंबईच्या उपनगरात ते कोसळल्याशिवाय रहाणार नव्हते. 'यू आर लूझिंग ॲल्टिटयूड टू फास्ट! फॉर गॉडस् सेक कीप लेव्हल फ्लाइंग!' मी ओरडलो.

'ओह! आय् कान्ट कंट्रोल इट! शी इज् नॉट रिस्पॉन्डिंग मी ॲटऑल!' कॅप्टनचे शब्द मला ऐकू आले आणि थोडया वेळाने कॅप्टनचे शब्द परत ऐकू आले 'ओके, शी हॅज रिस्पॉन्डेड! मी आता लेव्हल फ्लाईंग करीत आहे. पण खाली यायचा वेग मला काही कमी करता येणार नाही!'

ज्या पद्धतीने विमान उतरायला हवे होते त्याप्रमाणे विमान उतरणार नव्हते, पण मध्ये लेव्हल फ्लाइंग केल्यामुळे विमानाचा चुकलेला कोर्स बरोबर झाला होता व विमान आता रनवेवर उतरेल अशी माझी खात्री झाली होती

मी विमानाच्या ॲल्टिटयूड मोजू लागलो अजून ढगांतून कॅप्टनला काहीच दिसत नव्हते. विमानाने १ हजार फुटाची उंची गाठली. मी काउंट करू लागलो, 'नाइन हंड्रेड फीट, एट हंड्रेड फीट; सेव्हन हंड्रेड फीट ---- फोर हंड्रेड फीट' विमानाच्या पायलटस्ना विमानतळावरचे दिवे अंधुक-अंधुक दिसू लागले 'थ्री हंड्रेड फीट;---- टू हंड्रेड फीट, वन् हंड्रेड फीट ---' आणि थोडयाच वेळात विमानाची चाके जमिनीवर टेकली, पण जवळजवळ एक तृतियांश रनवे मागे सोडून विमान उतरले होते. विमानाला धावायला फारच अपुरा रनवे मिळाला होता. त्या रनवेवरून सुसाट वेगाने विमान धावत होते. जवळजवळ निम्मा रनवे संपला तरी विमानाचा वेग थोडासुद्धा कमी झाला नव्हता

'स्टॉप इट्! फॉर गॉडस् सेक स्टॉप इट! तुम्ही फार वेगाने धावता आहात! रनवे संपत आला आहे विमानाचे सगळे ब्रेक्स लावून विमान आटोक्यात आणा! अदर-वाईज यू विल ओव्हरशूट!' माइकमधून मी जीव घेऊन ओरडत होतो, पण त्याचा काहीच परिणाम विमानावर होत नव्हता. शेवटी महत्प्रयासाने उतरवलेले हे विमान वाचणार नव्हतेच!

विलक्षण निराश मनाने मी मान माझ्या-समोरील टेबलावर टाकली. माझ्या अंगातील सर्व प्राण निघून गेले होते. मी थकून-गळून गलो होतो. डोळयांतून येणारे अश्रू मोठ्या कष्टाने आवरीत होतो. माझ्या कानांवरील इयरफोन जणु काही मेला होता.

आणि अचानक इअरफोन जागा झाला. 'वुई हॅव स्टॉप्ड्! वुई हॅव सर्व्हाइव्हड्!' विमानाच्या कॅप्टनचे शब्द माझ्या कानावर आले 'आम्ही संकटातून वाचलो! थॅंक गॉड! थॅंक जिझस्!' कॅप्टनच्या आवाजात आनंद, खुषी अगदी काठोकाठ भरली होती. अचानक‐पणे विमानाचे इमर्जन्सी ब्रेक्स लागले व रनवेच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या कंपाउंड‐पासून काही फुटांवरच विमान थांबले.

मी भानावर आलो बॉस शांतपणे माझी पाठ थोपटीत होते. एअरपोर्टचे जनरल मॅनेजर त्यांच्या शेजारी उभे होते. 'वेल डन् माय बॉय! वेल् डन्!' बॉसच्या आवाजात पण खुषी होती, आनंद होता! 'दे वॉन्ट यू डाउन!' बॉस म्हणाले. 'दे? हू?' मी आश्चर्याने विचारले, 'विमानाचे कॅप्टन! विमानातले प्रवासी! तुला खाली बोलावीत आहेत! आपण एका मोठ्या संकटातून वाचल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ ते एक छोटीशी पार्टी ॲरेंज करीत आहेत. तुला पार्टीचे अगदी अगत्याचे आमंत्रण आहे! तू केलेल्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळेच विमान सुखरूप उतरू शकले! सर्वांना तुझे आभार मानायचे आहेत.' बॉस म्हणाले.

त्यानंतरचा तो एक तास माझ्या आयुष्या‐तील एक रोमांचकारी अनुभव होता. पार्टीच्या ठिकाणी बॉसबरोबर प्रवेश केल्या‐वर सर्वांच्या नजरा माझ्याकडे वळल्या. लांब कोपऱ्यात उभा असलेला कॅप्टन लग‐बगीने माझ्याकडे आला सव्वासहा फूट उंचीच्या त्या स्मार्ट अमेरिकन पायलटला मी आयुष्यात प्रथमच पहात होतो. प्रेमभराने त्याने माझ्याशी हस्तांदोलन केले त्याच्या स्पर्शात एक प्रकारची कृतज्ञता काठोकाठ भरली होती.

'आपले सर्वांचे प्राण वाचवायला ज्यांनी उत्कृष्ट मदत केली ते एअर ट्रॅफिक कंट्रोलर या पार्टीत उपस्थित आहेत. आपण सर्वजण त्यांचे मनःपूर्वक स्वागत करू या!' कॅप्टन बोलू लागले, 'आपले विमान वाचविण्याचे श्रेय माझ्यापेक्षा यानांच जास्त आहे. एक वेळ अशी होती की मी काहीच करू शकत नव्हतो. त्या वेळी यांनी आम्हाला उत्कृष्ट मार्गदर्शन केले. आम्ही सर्व आपले अत्यंत कृतज्ञ आहोत. आता मी अभिमानाने सांगेन की भारतात जागतिक दर्जाचेच नव्हेत तर सर्वोत्कृष्ट एअर ट्रॅफिक कंट्रोलर्स आहेत!'

त्यानंतर पार्टी रंगली! जो तो माझ्या‐जवळ येऊन, हातात हात मिळवून माझे आभार मानीत होता, कृतज्ञता व्यक्त करीत होता! मी मात्र लाजून अबोल बनलो होतो! पण कसल्या तरी अनामिक समाधानाने माझे हृदय व्यापले होते

समाधानाच्या या धुंदीत मी सर्वांचा निरोप घेऊन घरी जावयास निघालो कार‐कडे जात असताना माझा हात पॅंटच्या खिशात गेला आणि झोपेच्या गोळयाची बाटली हाताला लागली क्षणभर मी थब‐कलो आणि कसल्या तरी निश्चयाने ती बाटली खिशातून काढली आणि अंधारात दूरवर फेकून दिली.

आता मला आत्महत्या करायची गरज नव्हती! ११३ लोकांचे प्राण वाचवून तीन वर्षांपूर्वीच्या त्या प्रसंगाचा मी बदला घेतला होता. आज रात्री मला सुखाची झोप लाग‐णार होती. जगण्याची एक नवीन उमेद माझ्या मनात भरून आली! कसल्याही संकटाला तोंड द्यायची एक नवीनच ताकद माझ्यात निर्माण झाली. आता नदाला सुता‐सारखे सरळ करून माझ्या संसाराचे भर‐कटलेले तारू, ठिकाणावर आणण्याचा दृढ निश्चय करीत मी कारचा दरवाजा उघडला.

कारच्या दिव्याच्या प्रकाशात मी घडया‐ळाकडे नजर टाकली. रात्रीचे १२ वाजून ३ मिनिटे झाली होती. माझ्या आयुष्यातील नवीन दिवस उगवला होता. हा दिवस इतर दिवसांपेक्षा अगदी वेगळा, माझ्या आयुष्याला महत्त्वपूर्ण कलाटणी देणारा होता. मी कार सुरू केली आज ही कार मला फक्त एअर‐पोर्टवरून घराकडेच घेऊन जात नव्हती तर निराशेच्या अंधःकारातून आशेच्या प्रकाशा‐कडे, आत्महत्येच्या निश्चयापासून जग‐ण्याच्या उमेदीकडे, कालच्या निराशामय‐उदास भूतकाळातून उद्याच्या उज्ज्वल-आशा‐दायी-उत्साही भविष्यकाळाकडे नेत होती.

माझी नजर सभोवार फिरली, पाऊस थांबला होता. सुखद, मंद वारे वाहात होते. आकाशात तुरळक, विरळ ढग संचार करीत होते चंद्राचे शीतल चांदणे पृथ्वी‐तलावर अमृतवर्षाव करीत होते. माझ्या आयुष्यातील निराशेचे वादळ संपल्याचे तर निसर्ग सूचित करीत नव्हता ना? □

# ‘ललित’

## वसंत सरवटे गौरवांक

### एक अनुकरणीय उपक्रम

शिरीष सहस्रबुद्धे

ठणठणपाळ, विजय तेंडुलकर, श्री. दा. पानवलकर, शि. द. फडणीस, रमेश मंत्री, विद्याधर पुंडलीक, श्याम जोशी, उमाकांत ठोमरे, आनंद साधले, माधव मनोहर, बाळ सामंत, वसंत सबनीस, बाळ गाडगीळ, शंकर सारडा, ह. मो. मराठे–‘ललित’च्या मे १९७७ च्या चित्रकार वसंत सरवटे गौरवांकातील लेखकांची नामावळी पाहिली म्हणजे अंकाच्या एकंदर रंगरूपाविषयी आणि आकार–वजनाविषयी आपण काही आडाखे बांधतो, अंदाज करतो आणि अंक वाचून संपविल्यावर ते फारसे चुकलेत असं वाटत नाही. भरपूर मजकूर आणि भरपूर व्यंगचित्रं यांनी अंक प्रेक्षणीय बनविला आहे.

श्री. वसंत सरवटे हे मराठीतले एक आघाडीचे चित्र–व्यंगचित्रकार. किमान तीन दशके व्यंगचित्रे आणि सजावटचित्रे काढताना ‘ललित’ मासिकाचा आणि त्याचा जो ऋणानुबंध जुळून आला त्यातून या अंकाचा जन्म झाला आहे. स्वत: सरवटयांनीच (स्वत:चा समावेश असलेले) व्यंगचित्रात्मक मुखपृष्ठ या अंकासाठी काढलंय. अंक वाचून पुरा केल्यानंतर त्याचा जो पहिला गुणविशेष जाणवतो, तो निष्ठेचा. एका व्यंगचित्रकारावर विशेषांक काढायची ही जी कल्पना निघाली तिच्यापासून रेसभरही न ढळता आणि विषयाशी इमान राखून अंकाचा प्रपंच मांडला गेला आहे. याचा अर्थ अंकातले सर्व लेख वसंत सरवटयासंबंधी आहेत एवढाच नव्हे तर चित्रकाराबरोबरच चित्रकलेवरही एक महत्त्वाचं ( medium of communication ) संपर्कमाध्यम म्हणून श्रद्धा ठेवली गेली आहे असा होतो. उदाहरणार्थ ‘माझ्या ध्यानात राहिलेले व्यंगचित्र’ अशी एक स्पर्धा संपादकांनी या अंकासाठी जाहीर केली होती, तिचा निकाल आणि पारितोषिकपात्र लेख या अंकात दिले आहेत. ही व्यंगचित्रं काही संगळीच सरवटयांची नव्हेत.

मुळात एखाद्या चित्र / व्यंगचित्रकाराच्या गौरवार्थ विशेषांक काढण्याची कल्पनाच एवढी मोहक आहे की त्यासाठी इतर काहीही गुन्हा माफ करायची तयारी दाखवावी. मोहक अशासाठी की चित्रकाराला अशी स्वतंत्र प्रतिष्ठा मिळवून देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न मराठीत तर फारच क्वचित केला गेलेला आहे. मराठीत–महाराष्ट्रात चांगले चित्रकार, सजावटकार काही कमी होऊन गेले नाहीत; परंतु चित्रकलेला किंवा मासिक / पुस्तकांची मांडणी–सजावट करण्याच्या कलेला दुय्यम दर्जाचे स्थानसुद्धा कधी मिळू शकलेलं नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा पार्श्वभूमीवर ‘ललित’शी स्थापनेपासून संलग्न असलेल्या या गुणी व्यंगचित्रकाराचा गौरव विशेषांक काढण्याची कृतज्ञभावना ललितने व केशवराव कोठावळे यांनी दाखवावी याबद्दल उभयतांना धन्यवाद दिले पाहिजेत.

अंकात लेख भरपूर आहेत आणि त्याचे स्थूलमानाने चार प्रकारे वर्गीकरण करता येईल. एक सरवटयांच्या कलेसंबंधी रसग्रहणात्मक लेख, दोन : वसंत सरवटे या माणसाविषयीचे (बहुधा दोस्त किंवा फॅन लेव्हलवर लिहिलेले) लेख. तीन : मुलाखती आणि चार : एका व्यंगचित्राचे रसग्रहण (वगैरे) करणारे लघु लेख. सख्या सुमारे तेरा. अर्थात हे वर्गीकरण ढोबळ व अंकाच्या साधारण स्वरूपाची कल्पना येण्यापुरतेच आहे.

‘वसंत सरवटे यांची रेषा’ (विजय तेंडुलकर) आणि ‘सरवटयांची तरुण रेषा’ (शाम जोशी), सरवटे यांची ग्रंथसजावट (अरुण घाटे) हे तीन उल्लेखनीय लेख. पहिला रसिकाचा आणि दुसरा तज्ज्ञाचा आहे हा फरक ‘वरवर’ सारख्या व शीर्षकापासूनच पुनरावृत्तियुक्त वाटणाऱ्या लेखात लेख पूर्ण वाचल्यानंतर जाणवतो. प्रकार दोनमध्ये लेखांची संख्या बरीच असली तरी ‘एक अभ्यंग मित्र’ (रमेश मंत्री) आणि खाजगीतले वसंतराव ( उमाकांत ठोमरे ) हे दोनच उल्लेखनीय वाटतात. या प्रकारात लेखन करणाऱ्या अनेक मंडळींनी सरवटयांबद्दल लिहिता लिहिता अभावितपणे स्वत:विषयीही बऱ्यापैकी लिहून जागा अडविली आहे.

अंकात दोन मुलाखती आहेत आणि दोन्ही सरवटयांच्याच आहेत पैकी पहिली लांबलचक मुलाखत रमेश मंत्री, विद्याधर पुंडलीक, शाम जोशी आणि केशवराव कोठावळे अशा चौघांनी मिळून घेतलेली आहे. वीस छापील पानांची ही अवाढव्य मुलाखत सरवटयांच्या आयुष्याची– विशेषत: कलाजीवनाची– अगदी कानाकोपऱ्यातली अगोपागेसुद्धा तपशीलवार खोलून दाखवते आणि मी आजपर्यंत वाचलेल्या काही सर्वोत्तम मुलाखतीपैकी ही एक ठरावी. दुसरी मुलाखत बाळ सामंत यांनी घेतलेली आहे आणि ‘ललित’मुखपृष्ठे . एक संवाद असा तिचा विषय आहे. ही मुलाखत जवळजवळ दुर्बोध असल्याने मला शेवटपर्यंत वाचवली नाही. ही एवढी अगम्य चर्चा ज्यांच्यावर केली गेली आहे ती ‘ललित’ची मुखपृष्ठेही तिच्यापुढे बरीच सुगम वाटतात. अशा लेखांमुळे अंकाला वजन, भरीवपणा वगैरे येत असावा. एका व्यंगचित्राचं रसग्रहण, कवितेसारखं करायची योजनाही सफल म्हणता येईल. मात्र या प्रकारचे तेरा एक लेख असल्याने तोचतोपणा ‘अपरिहार्यपणे खटकतो. किंबहुना पुनरावृत्ती हा या संपूर्ण अंकाचाच एक (की एकमेव ?) ठळक दोष आहे. बहुधा संपादकांनी विषय, मुद्यापेक्षा लेखक जास्त गोळा केल्यामुळे हा दोष उद्‌भवला असावा. उदाहरणार्थ सरवटयांचं व्यक्तिचित्रण करणारे सुमारे अर्धा डझन लेख असल्यामुळे नाविन्य– वेगळेपणा राखणं दुरापास्तच. ठणठणपाळाच्या खास शैलीमुळे त्याचा लेख अर्थातच इतर प्रकारापासून वेगळा पडतो.

आनंद साधले, माधव मनोहर आणि चंद्रशेखर पत्की या तिघांचे लेख या अंकातले सर्वांत गचाळ लेख ठरावेत. पैकी पत्कीच्या लेखाचा उत्तरार्ध आणि पूर्वार्ध पूर्वपश्चिम जर्मनीइतकेच वेगळे पडतात आणि पूर्वार्ध वाचवत नाही इतक्या व्हल्गर शैलीत आहे. माधव मनोहराकडून आम्ही सामान्य वाचक इतक्या सामान्य, पोकळ आणि थातुरमातुर

गप्पागोष्टींची अपेक्षा कधीच करीत नाही. साधले यांच्याही लेखाचा पूर्वार्ध असातसाच आहे. उत्तरार्ध वाचवतो.

अंकाची एकंदर मांडणी आणि उठाव, मुद्रण वगैरे देखणे आहेत चित्र-व्यंगचित्रांचा वापर सढळ हातानं केल्यामुळे चित्रकाराबरोबरच चित्रकलेचाही सक्रिय गौरव करण्याच्या संपादकाच्या निष्ठावंत प्रयत्नांची खूण पटते. शीर्षकात मी याला अनुकरणीय उपक्रम म्हटलं ते याच अर्थानं. ◻

## एक नवे अर्धवार्षिक

# पारिजात

पुण्याच्या वृत्तपत्रव्यवसायातले एक उत्साही तरुण श्री विजय अंबाडे याच्या धडपडीतून 'पारिजात' या नव्या अर्धवार्षिकाचा वासंतिक विशेषांक उगम पावला आहे. संपादकानीच कबुली दिल्याप्रमाणे 'सर्व थरांतील वाचकांचे सर्व प्रकारे मनोरंजन' हा हेतू मनाशी ठेवूनच हा अंक काढला आहे, त्यामुळे हिंदी-मराठी चित्रपट, मराठी नाट्यसृष्टी, चालू राजकारण-समाजकारण यावरील लेखांशिवाय चार कथा व बऱ्याच कवितांनाही अंकात स्थान मिळालेले दिसते. 'अनोखी वळण' (शैला जोशी), 'डोळस' (शरद देशपांडे), 'रेसिप्रोकल' (अरविंद कुलकर्णी) या तीन स्पर्धेतील पारितोषिकपात्र कथा आणि 'तो रखवालदार कोण होता?' (चंद्रकांत अंबाडे) ही कथा या चारही वाचनीय वाटतात. लेखांमध्ये भारतातील सत्तांतराचा अर्थ हा श्री वरुणराज भिडे यांचा लेख, मराठी चित्रपटाविषयीचे श्री. जगदीश भिडे व संजय दिनकर यांचे दोन लेख आणि शशीकपूर व संजीवकुमारच्या अनुक्रमे अरुणा अंतरकर व सुधीर गाडगीळ यांनी घेतलेल्या मुलाखती उल्लेखनीय वाटतात.

दिलीप अभ्यंकरांनी रेखाटलेले अंकाचे तिरंगी मुखपृष्ठ आर्टपेपरवरील चांगल्या छपाईसह देखणे वाटते अंकातील अंतर्गत सजावटही– विशेषत लेख–कथांची शीर्षकेचित्रे– जाणवण्याइतकी सुबक आहे. मधूनमधून पेरलेल्या चौकटीही ठीक. निरनिराळ्या हिंदी चित्रपटकलावंताविषयीचे फुटकळ लेख मात्र परस्परसंबंधाअभावी व ठोस एकसंधपणाअभावी विस्कळित वाटतात. पुण्यातल्या तरुण लेखक-पत्रकारांचे साहित्य हे या अंकाचे वैशिष्टय ठरावे. श्री. विजय अंबाडे व सहसंपादिका मीनाक्षी मेहता यांनी संपादिलेल्या या अंकाची पृष्ठसंख्या सुमारे शंभर असून किंमत पाच रुपये आहे. अंकात जाहिराती भरपूर असल्या तरी मधूनच त्या रंगीत कागदावर छापण्याची योजना फारशी नेत्रसुखद नाही. ◻

## You Can Get There From Here

By Shirley Mac Laine
Bantam Books,
Pages 278, Rs 18–95

याआधी 'माणूस'च्या २४ जुलै १९७६ च्या अंकात शर्ले मॅक्लिनच्या 'Don't Fall off The Mountain' या पुस्तकाचा परिचय करून दिलेला होता.

शर्ले मॅक्लीन ही नटी शाब्दिक कोट्या सुरेख करते. अमेरिकेतील राजकीय परिस्थितीवर ती एकदा म्हणाली होती, 'The political alternatives in America are like putting band-aid on cancer!' आता आपल्या देशातसुद्धा हे शब्द लागू पडतात काय ते बघायचे!

एकदा शर्ले मॅक्लीन न्यूयॉर्कमध्ये पॅलेस थिएटरमध्ये बोलत होती. न्यूयॉर्कला ती मुद्दाम या कार्यक्रमासाठी बाहेरगावाहून आली होती. त्या वेळी ती न्यूयॉर्कला उद्देशून म्हणाली, 'How nice to be back in Karen Quinlan of cities!' कॅरेन क्वीन्लॅन ही बाई कित्येक महिने comatose (बेशुद्ध) होती. ती धड मरतही नव्हती व शुद्धीवरही येत नव्हती. तिच्या पालकांना डॉक्टरांनी सांगितले की, ती शुद्धीवर येणे शक्य नाही. कृत्रिम श्वासोच्छ्वासाच्या यंत्राच्या सहाय्याने ती 'vegetate' होत होती तिच्या पालकांनी मग कोर्टाकडे तिचे कृत्रिम श्वासोच्छ्वास करण्याचे यंत्र काढून घ्यावे व तिला सुखासुखी मरू द्यावे असा अर्ज केला होता. हे प्रकरण USA मध्ये बरेच गाजले होते व शेवटी कोर्टाने तशी परवानगी दिली होती. २ एप्रिल १९७६ च्या टाइम्स ऑफ इंडियामध्ये या कोर्टाने दिलेल्या निर्णयाची हकिकत दिली आहे. पुढे शर्ले मॅक्लीनने सर्वांची माफी मागितली व क्वीनलॅनच्या पालकांना फोन करून दिलगिरी व्यक्त केली.

शर्ले मॅक्लीनच्या आधीच्या पुस्तकामुळे (Don't Fall off The Mountain) माझ्या अपेक्षा उंचावलेल्या होत्या. आता मला एक मनोरंजक प्रवासवर्णन वाचायला मिळेल असे वाटत होते. कारण शर्ले मॅक्लीन हिला प्रवासाचा फार हव्यास आहे आधीच्या पुस्तकात ती कुणी मोटार विकत घेण्यासाठी पैसे वाचवत असेल तर ते पैसे प्रवासासाठी खर्च करा असे आग्रहाने म्हणत असे हे मी आधी सांगितले आहेच, परंतु हे पुस्तक व आधीचे Do Not Fall Off The Mountain यात फारच फरक आहे. आधीचे पुस्तक बरेच मनोरंजक होते तर हे अत्यंत रटाळ व mediocre आहे.

ती हाँगकाँगला जाते तेव्हाचे वर्णन व चीनमध्ये जाते तेथील अनुभव, हे सर्व अगदी सामान्य रीतीने लिहिलेले आहे. तरी पण तिचे हे पुस्तक 'Time' सारख्या बेस्ट सेलर लीस्टवरती यावे त्याचे आश्चर्य वाटले. एखाद्या व्यक्तीचे नाव शर्ले मॅक्लीनसारखे सुप्रसिद्ध झाले की, तसल्या प्रसिद्धीखाली

काय काय खपवता येते याचे हे पुस्तक उत्तम उदाहरण आहे.

अमके पुस्तक कसे आहे असे माझ्या वाचकाने मला जर विचारले तर त्याबद्दल मी नेहमी प्रामाणिक मत देतो. या पुस्तकाबद्दल तसे मत एका वाचकाने मला विचारले असता अर्थात त्याला मी 'अत्यंत रटाळ' आहे असे उत्तर दिले. त्यावर त्या चोखंदळ वाचकाने मला विचारले की, 'हे पुस्तक तुम्ही वाचनालयासाठी खरेदी का केले?' मी त्याला उत्तर दिले, पुस्तकाच्या खरेदी व निवडीसाठी बऱ्याच गोष्टींचा विचार करावा लागतो. एक तर नामांकित व्यक्तीने ते लिहिले व ते बेस्ट-सेलरच्या यादीवर असले तर वाचक त्याची निश्चितच मागणी करणार दुसरे म्हणजे इंग्रजी पुस्तके मिळविण्यासाठी पुण्यामुंबईची बरीच दुकाने पालथी घालावी लागतात पुस्तकविक्रेत्याकडे बेस्ट-सेलर्स एकीकडे, नवीन पुस्तके दुसरीकडे असे वर्गीकरण थोडे अपवाद सोडले तर इतर ठिकाणी नसते आणि ज्यांनी तसे थोडेसे वर्गीकरण केले आहे ते सुद्धा पुस्तक विकत घेणाऱ्याला थिटे पडावे तसे असते. यामुळे नवीन पुस्तकासाठी पुस्तकाच्या दुकानात डोळ्यात तेल घालून चष्मा चढवून प्रत्येक nook मध्ये चागले book बघावे लागते. अर्थात हे सर्व करताना विशेषत मुबईत वेळ फार अपुरा पडतो त्यामुळे पुस्तकाची खरेदी करताना त्या पुस्तकाचा लेखक, मग त्या लेखकाची वाचनालयात असलेली मागणी, पुस्तक बेस्ट-सेलर आहे का नाही, त्या पुस्तकाचा विषय, त्या पुस्तकाबद्दल आधी वाचलेले परीक्षण, पुस्तक क्लासिक आहे किंवा नाही, नंतर पुस्तकाची किमत व वाचनालयाचे बजेट व इतर अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. अर्थात पुस्तक चागल्या तऱ्हेने चाळायलासुद्धा दुकानात वेळ नसतो आणि एखादे बेस्ट सेलर मला जरी आवडले नसले तरी ते काही वाचकाना आवडते. कोणती पुस्तके विकत घ्यायची याची आधी वाचून वाचून माहिती गोळा करणे व नतर ती पुस्तके विक्रेत्याकडे शोधीत बसणे हे एक मोठे कामच होऊन बसते '

अलीकडे अमेरिकेप्रमाणे भारतातसुद्धा ghost writing (नामांकित व्यक्तीनी त्यांच्या नावाखाली 'घदेवाईक' लेखकाकडून पुस्तके लिहून घेणे.) प्रचलित होत आहे एका प्रख्यात क्रिकेटपटूने इंग्रजीत व चित्रपटव्यवसायातील एका व्यक्तीने मराठीत अशीच दुसऱ्याकडून पुस्तके लिहून घेऊन त्याच्या नावाखाली छापली आहेत असे ऐकतो.

शर्ले मॅक्लेनबद्दल म्हणायचे झाल्यास तिच्या दोन पुस्तकाच्या गुणवत्तेत व शैलीत इतका फरक आढळतो की, शेवटी दोन्ही पुस्तके 'भुतानीच' लिहिलेली आहेत असे म्हणावे लागेल!

—परिचय : जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी, पुणे

[ विसाव्या शतकातील सर्वोत्तम लेखक—ही लेखमाला पूर्ण करण्यासाठी आवश्यक ते संदर्भग्रंथ, कात्रणे इ. पूर्वतयारी चालू असल्याने ही लेखमाला पुढे थोडी अनियमित प्रसिद्ध होईल. ]


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | |
|---|---|
| (१) गोवा—(कादबरी)—इंद्रायणी सावकार | रु. ४०/– |
| (२) सागरा अगस्ति आला!—(कादबरी)—वसंत गांगल | रु. २०/– |
| (३) मुक्ता—(लेख)—दुर्गा भागवत | रु. ६/– |
| (४) बुमरॅंग—(कादंबरी)—लक्ष्मीदास बोरकर | रु. १०/– |
| —ENGLISH— | |
| (1) King Kong–Bruce Bahren burg–(Based on the Paramount Film with 50 photos) | Rs 9·60 |
| (2) Dorris Day Her Own Story–(Bestseller–The author who wrote 'Papa Hemingway' describes the chaotic life of the actress) A. E Hotchner | Rs. 18-35 |
| (3) Power! How to Get It, How to Use It–(Bestseller A boon to Successful executive & bussinessman)–Michael Korda | Rs 18 35 |
| (4) The Tomorrow File–(Bestseller–A futuristic sex novel by the author of Anderson Tapes)–Lawrence Sanders | Rs. 18·35 |

दि फिनिक्स लायब्ररी
७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

# अवती–भवती : पृष्ठ ७ वरून

ण्याची माझी एक पद्धत आहे. इतर लोक कुत्री-मांजरी पाळतात मी–वाघ पाळला होता आणि त्याची पूर्ण वाढ होईपर्यंत चांगला सांभाळला होता माझी अभ्यासिका मी स्वच्छ ठेवतो बसण्यासाठी एक उत्तम आराम-खुर्ची वापरतो. दिल्लीमध्ये केस कापून घेण्यासाठी आणि पोहण्यासाठी मी ओबेराय इंटर कॉंटिनेंटलमध्ये जात असे आता या गोष्टी जर कुणाला चैनीच्या वाटत असतील तर त्याला माझा इलाज नाही.

प्रश्न : आता तुमच्या खात्याबाबत काही प्रश्न विचारतो–आणीबाणीच्या कालखंडामध्ये आकाशवाणी व दूरदर्शन यांचे काम समाधानकारक होते काय ?

शुक्लाजी : त्या वेळच्या शासनाची जी धोरणे होती त्याला अनुसरूनच माझे खाते काम करीत होते. शासनाच्या धोरणाचे प्रतिबिंब आकाशवाणी व दूरदर्शनावरील कार्यक्रमांमध्ये दिसले पाहिजे असे मला सांगण्यात आले होते स्वाभाविकपणेच ते दिसेल याची काळजी मला घ्यावी लागली

प्रश्न : वृत्तविभागाचे या कालखंडामधील कामकाज समाधानकारक होते असे आपल्याला वाटते का ?

शुक्लाजी : शासकीय धोरणाचा पुरस्कार करायचा असा निर्णय घेतल्यावर ज्या मर्यादा पडतात त्याचा विचार केला तर वृत्तविभागाची कामगिरी त्या धोरणाला साजेशी ठेवणे, हे खातेप्रमुख म्हणून माझे कामच होते.

प्रश्न : वृत्तपत्रीय नियंत्रणाची अंमलबजावणी करताना सर्व बाबतीत सर्व पातळीवर भ्रष्टाचार व अन्याय झाला असे आता बोलले जाते, याबाबत तुमचे मत काय ?

शुक्लाजी प्रसिद्धिपूर्व नियंत्रणे कडवटपणाखेरीज दुसरे काहीही निर्माण करू शकत नाहीत.

प्रश्न : काही प्रकाशकांना त्यांची वृत्तपत्रे बंद करावी लागली याचे कारण काय ?

शुक्लाजी . माझ्या मंत्रालयाने त्या वेळी कोणाही प्रकाशकावर अशा स्वरूपाचे निर्णय लादले नव्हते. काही प्रकाशनांच्या बाबतीत बंधने जाचक होती आणि त्या बंधनांच्या मर्यादेमध्ये त्यांना काम करणे शक्य नसल्याने त्यांनी आपण होऊन आपली प्रकाशने बंद केली.

प्रश्न : ' किस्सा कुर्सिका ' ही अमृत नाहटा यांची फिल्म जप्त का करण्यात आली ? सध्या ती फिल्म कोठे आहे ?

शुक्लाजी : मी माहिती आणि नभोवाणी मंत्रालयाचा कारभार स्वीकारण्यापूर्वीच ही फिल्म ताब्यात घेण्यात आली होती आणि आणीबाणीपूर्वीच माझ्या आधीच्या मंत्र्यांनी हालचाल सुरू केली. आता या प्रकरणी चौकशी चालू आहे, म्हणून काहीही प्रतिक्रिया व्यक्त करण्याऐवजी या चौकशीच्या निष्कर्षाची वाट पहाणे अधिक योग्य नाही का ? आता याबाबत गप्प बसणेच मला जास्त योग्य वाटते.

प्रश्न काही विशिष्ट वृत्तपत्रांना आपल्याकडून लक्षावधी रुपयांच्या जाहिराती दिल्या गेल्या ? आणि त्या देताना सर्व नियम धाब्यावर बसविले गेले हे खरे आहे काय ?

शुक्लाजी याबाबत के पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जमान्यापासूनचे जे संकेत आहेत ते पाळले गेलेले आहेत नियमाच्या चौकटीमध्ये राहूनही काही गोष्टी आपल्याला अनुकूल अशा प्रकारे राबविता येतात आणि तसे सर्वत्र केले जाते.

प्रश्न : भोपाळ, नागपूर व रायपूर येथून प्रसिद्ध होणाऱ्या आपल्या हितवाद या पत्राला नियमाचे बंधन तोडून फार मोठ्या प्रमाणात जाहिराती दिल्या गेल्या हे खरे आहे काय ?

शुक्लाजी : एका गोष्टीचा प्रथम खुलासा केला पाहिजे हे वृत्तपत्र माझ्या मालकीचे नाही प्रोग्रेसिव्ह रायटर्स अ‍ॅन्ड पब्लिशर्स नावाच्या सोसायटीकडे या वृत्तपत्राची मालकी आहे. प्रारंभी मी या सोसायटीशी संबंधित होतो, परंतु मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर मी माझ्या तेथील पदाचा राजिनामा दिला होता. जाहिरातीबाबत असेच म्हणता येईल, की नियमाचे पालन करूनच त्या देण्यात आल्या होत्या.

प्रश्न मेनका गांधी यांच्या ' सूर्य–इंडिया ' या नवीन प्रकाशनाला एवढ्या मोठ्या प्रमाणात जाहिराती कशा मिळू शकतात ?

शुक्लाजी : ' सूर्य–इंडिया ' या प्रकाशनाला आम्ही शासकीय जाहिराती दिल्या नाहीत. आता खाजगी–जाहिरातदारांनी मोठ्या प्रमाणावर जाहिराती दिल्या तर त्यासाठी मला दोषी धरण्याचे कारण नाही.

प्रश्न : निवडणुकीनंतर कॉंग्रेसची जी अवस्था झाली आहे त्याबाबत आपल्याला काय वाटते ?

शुक्लाजी : अजूनही कॉंग्रेस हा मोठा राजकीय पक्ष असून तो दीर्घकाळ देशसेवा करीत राहील याबाबत माझ्या मनात संदेह नाही आणि माझे व्यक्तिगत मत विचारल, तर इंदिराजी याच पक्षाच्या नेत्या आहेत आणि राहतील

प्रश्न . कॉंग्रेसचा लोकसभा–निवडणुकांमध्ये जो दारुण पराभव झाला त्याची नेमकी कारणे काय ?

शुक्लाजी . अनेक कारणांमुळे हा पराभव झाला, परंतु हा पराभव झाला म्हणजे काही संपले असे नव्हे !

प्रश्न . या पराभवाला संजय गांधी फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत होते असे आपल्याला वाटते का ?

शुक्लाजी : याबाबत काहीही न बोलणे मी पसंत करीन.

प्रश्न . बन्सीलाल यांची पक्षातून जो हकालपट्टी झाली त्याबाबत तुम्हाला काय वाटते ?

शुक्लाजी : काही काळ यासाठी थांबावे लागेल. योग्य वेळी याबाबत माझे मत मी देईन.

प्रश्न : ही योग्य वेळी कधी येईल ?

शुक्लाजी : बघू, आणखी काही काळ जाऊ दे, नवीन विधानसभा

अस्तित्वात येऊ देत. न्यायप्रविष्ट प्रकरणाचे निकाल लागू देत. मग बघता येईल. ◻

## मंत्रीमहोदयांचे . . . चिरंजीव आणि गणगोत

भारतामध्ये—व्यक्तिगत आर्थिक भरभराट होण्यासाठी तुम्ही मुळातच श्रीमत घरामध्ये जन्म घेतला पाहिजे असे मुळीच नाही. तुमचा जन्म झोपडीमध्ये झाला असला, तुमचे शिक्षण बेताचे असले, तरी चालण्यासारखे आहे, पण तुमच्या वडिलांना वारा कोणत्या दिशेने वाहतो आहे हे ओळखून निवडणुकीला उभे राहून निवडून येण्याची किमया करता आली की निम्मे काम झाले. आमदारकीची झूल तुमचा रस्ता मोकळा करते आणि आमदार असलेले हे गृहस्थ नामदार झालेच, तर पिताजीच्या या कर्तृत्वामुळे आर्थिक भरभराटीचे दरवाजे आपोआप उघडले जातात. इतकेच नाही तर बघता बघता तुम्हाला पुढारीपण मिळण्याची आणि आमदारकी–नामदारकीची झूल तुमच्याही अंगावर चढण्याची शक्यता निर्माण होते. आता काही मंत्रीगणाचा इतिहास पाहू–स्वत.ला खानदानी मंत्री म्हणवून घेणाऱ्या विद्याचरण शुक्ला यांच्या खानदानीचेच उदाहरण पहा ना. कै. रविशंकरजी यानी आपल्या कारकीर्दीला शाळामास्तर म्हणून प्रारंभ केला. तथापि राजकारणामध्ये यशस्वी होऊन मुख्य मंत्रीपदाची धुरा सभाळल्यावर...जादूची कांडी फिरावी अशा प्रकारे त्यांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये फरक पडला. निधनसमयी त्यांच्याकडे कित्येक लक्ष रुपयाची मालमत्ता पडून होती. त्यांच्या चिरजिवानी वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून राजकारणामध्ये प्रवेश केला, मंत्रीपद मिळविले आणि वडिलानी ठेवलेल्या सपत्तीमध्ये गडगंज भर घातली. आज त्यांच्या मालमत्तेमध्ये अर्ध्या रायपूरचा समावेश होतो. खेरीज छापखाने, वृत्तपत्रे, वाहतूककंपन्या, पेट्रोलपंप, बांधकाम-कंपन्या आणि अन्य मोठे व्यवसाय यामुळे शुक्ला–बंधूचे एक मोठे आर्थिक साम्राज्यच मध्यप्रदेशामध्ये तयार झाले आहे. याच राज्याचे दुसरे एक मुख्य मंत्री पी. सी सेठी. याना चिरंजीव नाहीत. पण त्यांच्या जावयानी कसर भरून काढली आहे. त्यांचे जावई अशोक पटनी. यांच्या फर्मला अनेकविध सवलती दिल्या गेल्या. 'सीड स्केंडल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रकरणी राज्यशासनाचे किमान सात लक्ष रुपयाचे नुकसान झाले. पुढे कॉंग्रेस आमदारानीही या प्रकरणी ओरड केल्यावर सेठी यानी पटणी कपनीबरोबरचा करार रद्द केला. मुख्य मंत्री असे वागत असताना राज्यपालानी तरी स्वस्थ का बसावे ? राज्यपाल सत्यनारायण सिन्हा याचे नातू भोपाळमधील एका राष्ट्रीय बँकेमध्ये गेले आणि कमी रकमेच्या गाडीभर नोटा घेऊन बाहेर आले. देण्यात आलेली रक्कम होती दोन लाख वीस हजार रुपये ! ! पुढे राज्यपालानी असा खुलासा केला की नातवाला बिहारमध्ये काही उद्योग सुरू करण्यासाठी ही रक्कम हवी होती; पण भारी किमतीच्या नोटा का बदलल्या ? ही रक्कम आली कोठून ?—परतु याबाबतचे खुलासे अथवा चौकशी होण्यापूर्वीच आणीबाणी आली आणि सर्वत्र चिडिचूप झाले.

ओरिसामध्ये विधानसभेची निवडणूक प्राणपणाने लढविणाऱ्या जनतापक्षाच्या वादग्रस्त उमेदवार नंदिनी सत्पथी यांच्या परिवारामधील प्रत्येकाने या बाईच्या महत्त्वपूर्ण स्थानाचा पुरेपूर फायदा घेतला आहे. १९७४ साली त्या पुन्हा राज्याच्या मुख्य मंत्री झाल्या. त्याचे वडील, मुलगा, बहीण, भाऊ आणि मित्र यानी नंदिनीबाईंचे राज्य म्हणजे आपलेच राज्य अशा पद्धतीने वागण्यास प्रारंभ केला आणि बघता बघता इतकी दहशत निर्माण केली की राज्यशासनाला— त्यांच्या इच्छाची परिपूर्तता करणे एवढे एकच महत्त्वाचे काम शिल्लक उरले आणीबाणी आल्यावर तर काय— जवळजवळ राजेशाही पद्धतीनेच राज्यकारभार करण्यात आला. नंदिनीबाईंचे बंधू तुषारपाणिग्रही— यानी राज्यशासनाला मार्गदर्शन करण्यासाठी कचेरी उघडली. सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या, शासनामार्फत दिली जाणारी कॉंट्रॅक्टस् या बाबतचे निर्णय तुषारबाबू घेऊ लागले. बाई सत्तेवर येण्यापूर्वी काही तुषारबाबू मोठे नाव असलेले उद्योगपती नव्हते— परतु बाई सत्तेवर आल्यावर त्याचे धंद्यात नुकसान होत राहूनही ते अधिक अधिक श्रीमंत होत गेले ग्रेटर कटक इम्प्रुवमेन्ट ट्रस्ट या सस्थेची सूत्रे तुषारपाणिग्रही यांच्या हाती होती आणि तेथे त्यानी अनन्वित गोंधळ घातले. विदेशी मद्याच्या विक्रीबाबत कटकमध्ये जे परवाने दिले गेले त्यातून नंदिनीबाईंच्या कुटुंबियांनी बक्कळ पैसा केला. बाईंची पुतणी चंद्रिका महापात्रा बघता बघता प्रदेश कॉंग्रेसच्या महिलाविभागाची नियत्रक झाली. बाईंचे चिरंजीव म्हणजे ओरिसामधील सजय गांधीच होते. धनकेनल येथील मोटार – सायकल फॅक्टरी बेनामी आहे म्हणे ! एवढी मोठी फॅक्टरी बेनामी कशी ? अर्थात ही बेनामी असली तरी तेथील सर्व सत्तासूत्रे तथागत सत्पथी यांच्याच हातात होती. या चिरजिवाचे युवक कॉंग्रेसबरोबर बिनसले. त्यानी माताजीच्या आशीर्वादाने – नॅशनल सोशालिस्ट कॉप्स–नावाची संघटना स्थापन केली. समाजकटकाना एक नवे व्यासपीठ मिळाले. या सघटनेने सामाजिक कामापेक्षा एक दहशतवादी संघटना म्हणून स्वतःची प्रतिमा निर्माण करण्यातच विशेष रस घेतला. कॉंग्रेस आमदार आणि अन्य मंडळी यांची सरकार– दरबारी कामे करून देणे आणि त्या बदल्यात स्वतःचा लाभ करून घेण्याचे पवित्र कार्यही हे चिरंजीव करीत असत.

आंध्रप्रदेशाची सूत्रे पी व्ही. नरसिंहराव यांच्या हाती असावीत अशी बाईंची इच्छा असल्याने ते आंध्रप्रदेशाचे मुख्य मंत्री झाले. त्यांच्या चिरंजिवाना— आपल्या आईच्या स्मरणार्थ एक उत्तम महाविद्यालय काढण्याची इच्छा झाली. बघता बघता सर्व कायदे स्वतःच्या मनाप्रमाणे वेडेवाकडे वाकवून चार हजार विद्यार्थी आणि १०० प्राध्यापक असलेले महाविद्यालय त्यांनी सुरू करून दाखविले. मुख्य मंत्र्याच्या चिरंजिवाचे महाविद्यालय असल्याने राज्यशासनाकडून भरीव सहाय्य मिळाले विद्यापीठ अनुदान मडळाकडूनही मदत मिळविण्यात आली. चिरंजिवानी दादागिरी करून दहा लक्ष रुपयाच्या देणग्या गोळा केल्या. एवढे करून महाविद्यालय व्यवस्थित चालविले असते तर गोष्ट वेगळी होती. प्राध्यापकाचे पगार थकत गेले सस्थेमध्ये भरपूर गैरव्यवस्था माजली आणि पुढे संस्था बद पडली ! चौकशीचे नाटक झाले आणि सारेच प्रकरण दाबून टाकण्यात आले.

काश्मीरमधील प्रत्येक मुख्य मंत्र्याने संस्थानिकासारखाच कारभार केला आहे काश्मीरचा कारभार सुधारण्यासाठी बाईंनी शेख अब्दुल्ला यांच्या हाती सत्तेची सूत्रे दिली चार चागल्या गोष्टी केल्यावर तेही नेहरूंच्या मार्गाने गेले त्यानी आपल्या चिरंजिवाची स्टेट टुरिस्ट डेव्हलपमेन्ट कार्पोरेशनच्या सचालकपदी नियुक्ती करून टाकली पत्नी बेगम अब्दुल्ला या बॅकवर्डक्लास-बोर्डाच्या अध्यक्षा झाल्या तर दुसरे चिरंजीव डॉक्टर फरुक अब्दुल्ला शेर-ए-काश्मीर मेडिकल इन्स्टिटयूटचे प्रमुख झाले. या गणगोतामध्ये सगळ्यात गाजले ते तारिक अब्दुल्ला. त्याच्या कारभाराला कटाळून अनेक अधिकाऱ्यानी राजिनामे दिले. तारिकसाहेबांचा काही फौजदारी गुन्ह्याशीही संबंध होता, पण म्हणून त्याचे अधिकारपद काढून घ्यावे असे कधी शेखसाहेबाना वाटले नाही एप्रिलमध्ये- शेखसाहेबाची खुर्ची हलल्यावर तारिक-अब्दुल्लाही आपल्या अधिकारपदावरून जाणे क्रमप्राप्तच होते. तसे ते गेल्यावर टुरिस्ट डेव्हलपमेन्ट कार्पोरेशनच्या कर्मचाऱ्यानी काय करावे ? त्यानी कार्पोरेशनच्या इमारतीवर विद्युतमाळाची सजावट केली आणि मुक्तिदिन साजरा केला तारिकसाहेबाच्या एकंदर कारभाराची चौकशी करावी यासाठी राज्यपालाकडे जोरदार मागणी करण्यात आली आहे

आपल्याला मंत्रिपद मिळाले की आपल्या कुटुंबाला मुखत्यारपत्र मिळाल्याच्या थाटात राज्यकारभार करण्याची प्रवृत्ती गेल्या काही वर्षांमध्ये कशी झपाट्याने वाढीला लागली आणि भ्रष्टाचाराला कशी प्रतिष्ठा प्राप्त झाली याची कल्पना वरील प्रकारावरून यावी. या सगळ्या मंत्रीमहोदयाच्या गणगोताच्या पार्श्वभूमीवर महात्माजीच्या कुटुंबियांची याद होते. महात्मा गाधीनाही मुले होती,- एक दोन नाही चागली चार! खेरीज १३ नातवंडांचा परिवार होता; पण आपण फार मोठ्या राष्ट्रनेत्याची मुले आहेत याची जाणीव त्यानी सोडली नाही आणि आपल्या वडिलाच्या नावाला अथवा कार्याला-त्रासदायक ठरेल अशी एकही गोष्ट त्यानी केली नाही. स्वतःच्या बुद्धिमत्तेप्रमाणे ते समाजजीवनामध्ये सामावून गेले. राजकारण आणि सत्तास्थाने ही वंशपरंपरा असतात, असे वाटण्याइतका हा प्रकार बोकाळलेल्या भारतीय राजकीय रंगभूमीवरील गाधीजींच्या कुटुंबियांचे,- हे संपूर्ण विरोधी चित्र मात्र चागलेच उठून दिसते. □

---

# बळकट गादी....मजबूत आधार

---

काय वाटेल ते झाले तरी या वेळी गोव्याचे सरकार उलथून पाडायचेच, असा चंग जनता पक्षाने बाधला होता अनेक मातब्बर मंडळी त्यासाठी गोव्यात जाऊन आली. गोव्यातील वंशपरंपरा नष्ट करणार, शशिकलाबाईंना रायबरेलीची याद आणून देणार, अशा घोषणा दिल्या गेल्या. लिना चंदावरकरने आपल्या पतीच्या निधनाची चौकशी व्हावी, अशी जी मागणी केली त्याचा नारा आकाशवाणीवरील अखिल भारतीय वार्तापत्रातून वाजविला गेला. कॉंग्रेसचे धोरण बचावात्मक होते. जनता पक्ष आक्रमक होता. महाराष्ट्रवादी गोमातक झालेली पडझड परतकरून पुन्हा सत्ता मिळविण्याच्या ईर्षेने निवडणूक लढवीत होता. मतदार काय करणार, याचा कुणालाच अदाज नव्हता, म्हणणारे असे म्हणत होते जनता पक्ष व महाराष्ट्रवादी गोमातक याच्या टकरीमध्ये कॉंग्रेसचा फायदा होईल. महाराष्ट्रवादी गोमातक पक्ष पुन्हा सत्तेवर येणार नाही, असेही भाकित केले गेले होते; पण जनसामान्याच्या पाठिंब्यावर कै. भाऊसाहेब बांदोडकर यानी जी बळकट संघटना उभारली आहे ती इतक्या सहजी मोडून पडेल असे वाटत नाही. देशात कसेही वारे वाहिले तरी गोव्यात वाहणाऱ्या वाऱ्याची दिशा वेगळीच असते, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले. इदिरा लाटेवर सारा देश तरगत असताना गोवेकरानी भाऊसाहेबाची साथ सोडली नाही आणि आज जनता पक्षाच्या जोरदार हवेचा गोवेकरावर व्हावा तसा परिणाम होऊ शकला नाही महाराष्ट्रवादी गोमातक पक्षाला तीसपैकी पधरा जागा मिळाल्या आणि दोन पुरस्कृतही निवडून आले याचा अर्थ शशिकलाबाईंना पुन्हा सत्तेची वाट मोकळी झाली. उरलेल्या जागामध्ये कॉंग्रेसचा वरचष्मा असला आणि त्याच्या गोव्यामधील नगण्य स्थानापासून ते प्रमुख विरोधी पक्ष म्हणून बसण्याइतकी ताकद त्यानी वाढविली हे खरे असले, तरी अजून त्याचे हात सत्तेपर्यंत पोचू शकत नाहीत हेच खरे. तथापि तीसजणाच्या सभागृहामध्ये आपले दहा सदस्य आहेत, ही गोष्ट कॉंग्रेस पक्षाला आज निश्चितच दिलासा देणारी वाटेल. शिवाय जनता पक्ष गोव्यात सत्तेवर आला नाही, या वस्तुस्थितीमुळे मिळणारा नकारात्मक आनंदही मोठा आहे जनता पक्ष निकालाला फारसे महत्त्व देण्यास तयार नाही पतप्रधान मोरारजीभाई किंवा पक्षाध्यक्ष चंद्रशेखर गोव्यातील निकालावरून अंदाज बाधू नका, असे म्हणतात किंवा गोव्याबद्दल काहीही बोलण्याचे टाळतात, याचे प्रमुख कारण राजकीय गरज हेच आहे. समजा, गोव्यात जर जनता पक्षाची सरशी झाली असती तर त्याचे नगारे उत्तर प्रदेश, बगालपर्यंत वाजविले गेले असते पराभव झाला तेव्हा गप्प राहणे सोइस्कर व शहाणपणाचे समजून जनता पक्षाचे नेते त्याप्रमाणे वागत आहेत.

गोव्यामधील जनता पक्षाचे नेते शशिकलाबाईंच्या कारभारावर नाराज होते. आज मात्र इरॅज्म सिकेरा कॉंग्रेसला सत्तेवर येऊ न देणे, याच मर्यादित उद्देशाने आपण निवडणुका लढविल्या होत्या, असे सागत आहेत, तर जनता पक्षामुळे आपण सत्तेवर येऊ शकलो नाही, याची हुरहूर कॉंग्रेसवाल्याना लागून राहिली आहे. कॉंग्रेस आणि जनता पक्ष या दोघाकडून होणारा प्रखर विरोध, पक्षातर्गत फाटाफूट, कौटुंबिक घटनावरून होणारी चिखलफेक, उत्तम वक्त्याचा अभाव अशा अनेकविध अडचणींना तोड देऊन शशिकलाबाई पुन्हा सत्तेवर आल्या आहेत महाराष्ट्रवादी गोमातक पक्षाने यापूर्वी मिळविलेल्या कोणत्याही विजयापेक्षा या वेळचा विजय जास्त तेजस्वी आहे विजयी झालेल्या सभासदाची सख्या घटली असली आणि सतत मंत्रिपदाची धुरा वाहणारे अच्युतराव उसगावकर किंवा पक्षाचे उपाध्यक्ष रघुवीर पामकर या निवडणुकीमध्ये पराभूत झाले असले तरी ही निवडणुकीतील पडझड मानून विजय आनदाने स्वीकारण्याइतके यश म गो पक्षाने नक्कीच मिळविले आहे

राज्यशासनाला केंद्राबरोबर सघर्ष करून चालण्यासारखे नसते. गोवा हे तर काय टिकलीएवढे राज्य त्यातून केंद्रशासित प्रदेश त्यामुळे केंद्राने कटकटी निर्माण करण्याचे ठरविले तर त्या अनेक प्रकारे करता येतील. म्हणून थोडेसे पडते घेऊन केंद्राबरोबर गोडीगुलाबीचे धोरण ठेवूनच बाईंना राज्यकारभार करावा लागणार आहे केंद्राबरोबर आपली भूमिका सहकार्याची राहील, हे बाईंनी स्पष्ट केलेच आहे पक्षाचे नाव महाराष्ट्रवादी गोमातक असे असले तरी गोमातक आणि महाराष्ट्र याचे राजकीय मीलन सभवत नाही. त्याबाबतची आग्रही भूमिका महाराष्ट्रवादी गोमातक पक्षाने पूर्वीच सोडून दिली आहे. आता पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा, यासाठी शशिकलाबाई विशेष प्रयत्न करतील असे दिसते. जनसामान्याच्या आधारावर गोव्यातील गादी अजूनही बळकट असल्याची प्रचीती या निवडणुका देऊन गेल्या आहेत. □

# निवडणूकपूर्व विश्लेषण : पृष्ठ ३ वरून

## बिहार

बिहार म्हणजे जनआंदोलनाची केंद्रभूमी होय. तेव्हा बिहार-विधानसभा निवडणुकांचा विचार करताना जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली झालेले आंदोलन आणि लोकसभा-निवडणुका यांची पार्श्वभूमी लक्षात घेतली पाहिजे शिवाय बिहारी मतदारांचा जातीयतेचा कोश कितपत दृढ आहे याचाही विचार करणे आवश्यक ठरते.

५ जून रोजी बिहार-आंदोलनास तीन वर्षे झाली. त्या निमित्ताने लोकनायक जयप्रकाश नारायण यांनी मुंबईत सभा घेतली, परंतु येथे मात्र निवडणुकांच्या धामधुमीतसुद्धा या निमित्ताने विद्यार्थ्यांचा मोर्चा आणि सभा पटण्यात मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळे युवक-शक्ती जरा नव्या जोमाने रिंगणात उतरलेली आहे जसजसा जनता पक्षाच्या बाजूने उत्साह भरत चालला आहे तसतसा काँग्रेसचा प्रचार दुबळा पडू लागलेला आहे. युवकांचा उत्साह शहरीभागात इतका जास्त आहे की यशवंतरावांची सभा पटण्यात होऊच शकली नाही. या निमित्ताने येथील एका युवकाने चंद्रशेखर व मोरारजी देसाई यांच्या सभेची आठवण करून दिली 'उनको भी युवकोंने छेडा, लेकिन वो चव्हाणसाबके जसे भागे नही ' मोरारजींच्या सभेत एका विद्यार्थ्याने चप्पल फेकली तर ते म्हणाले, 'और एक फेंक दो ' एकंदरीत जनता-नेत्यांचा नम्र गांधीवाद येथील युवकांना जिंक-णारा ठरला.

बिहार आंदोलन व लोकसभा निवडणुका यामुळे सर्व थरातील लोकांमध्ये आशावाद निर्माण झालेला आहे. या आंदोलनाबद्दल भागलपूरचा एक कार्यकर्ता म्हणाला, 'It was more than Mahatma Gandhi's movement in 1942

गांधीजींच्या आंदोलनात तारा, रेल्वेयंत्रणा विस्कळित करण्यात आली होती. परंतु ५ जून रोजी निघालेला पटण्यातील ५ लाखांचा मोर्चा मात्र अतिशय शांततापूर्ण झाला अहिंसा आणि सत्याग्रहाची बीजे खोलवर रुजली गेलेली होती. निवडणुकांच्या दृष्टीने पहावयाचे झाल्यास हा वारसा महत्त्वाचा ठरतो. कारण बिहारमधील गरीब शेतमजूरवर्गाला धाकधपटशाही मार्गाने निवडणुकांपासून वंचित ठेवण्याची परंपरा आहे हा 'पिछडा' वर्ग लोकसभा निवडणुका-प्रमाणे याही निवडणुकांमध्ये महत्त्वाचा ठरलेला आहे, परंतु जनता पक्ष व काँग्रेस या दोन्ही पक्षांनी मोठ्या प्रमाणात उमेदवारी न दिल्यामुळे या वर्गात आज असंतोष धुमसत आहे, हे मात्र नक्की

### तिकिटवाटपाचा प्रश्न

तिकिटे मागण्यासाठी अनेक थरांतून जी गर्दी उसळली तिच्या-बद्दल बरवर पाहता नाराजी व्यक्त होते, परंतु ही गर्दी उसळणे नव्याने निर्माण झालेल्या आशावादाचे द्योतक आहे असे मी मानतो. याचे दुसरे एक कारण म्हणजे गेल्या लोकसभा-निवडणुकांमध्ये व त्यानंतर बऱ्याच लोकांना तिकिटे देण्याबद्दल आश्वासने देण्यात आली शिवाय अर्ज भरण्याच्या काळात अनेकांना अर्ज भरण्याबद्दल प्रोत्साहनही देण्यात आले. हे प्रोत्साहन मात्र विविध घटकपक्षांच्या आणि जातींच्या गटांच्या नेत्यांकडून देण्यात आलेले आहे. त्यामुळे दुटप्पी राजकारणी लोकांनी हा प्रश्न शेवटी इतक्या शिगेला पोहच-विला की त्यामुळे जनतालाट संपुष्टात आलेली आहे. जनता पक्षाची निर्मिती ज्या जनआंदोलनामुळे झाली त्यावरून देशात राजकीय क्षेत्रात नैतिकतेचे राजकीय प्रवाह सशक्त होतील अशी आशा होती. त्यालाच येथे तडा गेलेला आहे. या आशेपोटीच लोकां-नीही जनता पक्षास निवडून दिलेले होते, परंतु या निवडणुकीमध्ये सर्वसामान्यांच्या मनातील हा आशावाद लोप पावू लागलेला आहे त्याचा परिणाम म्हणून जातीयवाद व गटबाजी यांचा प्रभाव वाढत आहे व जुन्याच परंपरा पुन्हा डोकावू लागलेल्या आहेत

लोकनायक जयप्रकाशजींनी ज्या चार कसोट्या उमेदवार निवडी-बाबत सांगितल्या त्याही पाळण्यात आलेल्या नाहीत. विद्यार्थी नेत्यांचा असा दावा आहे की, २० टक्के जनता पक्षाचे उमेदवार बिहार आंदोलनाच्या विरुद्ध असलेले आहेत. त्याचा निषेध म्हणून युवकनेता श्री शिवानंद तिवारी याने आपली उमेदवारी मागे घेतलेली आहे. लोकशाही-काँग्रेसच्या गटामध्येही यांचा समावेश ते करू शकत नाहीत म्हणून लोकशाही काँग्रेसच्या गोटामध्येही असंतोष आहे. 'जातीयता और भाई-भतीजा वाद' हेच यामागचे कारण आहे असे युवकनेते मानतात. हा वाद निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे निवडसमितीने व तिकिटवाटपावर परिणाम करणाऱ्या गटांनी मुख्य मंत्रिपदाकडे नजर ठेवलेली दिसते. त्यामुळेच कोणत्या कसोट्या लावून जनतापक्षाचे उमेदवार निवडले गेले याचा ठामपणे विचार जनतेपुढे मांडण्यात आलेला नाही. वेळ थोडा, गर्दी जास्त इ. माफक तर्क मांडण्याखेरीज जनतापक्षनेते याबद्दल मौन पाळतात महिलांना ३२ तिकिटे देण्याचे आश्वासन मिळाले होते, परंतु प्रत्य-क्षात १८ महिला-उमेदवार उभ्या केल्या गेल्या त्यामुळे महिलासंघर्ष-समितीमध्येही नाराजी दिसून येते घटक पक्षांच्या दृष्टीने पहावयाचे झाल्यास बिहारमध्ये जनसंघास ६४, समाजवादी पक्षास ५५, संघटना काँग्रेसला ४५, भारतीय लोकदलास ४८ आणि लोकशाही काँग्रेसला १८ जागा देण्यात आलेल्या आहेत त्याचबरोबर छात्रसंघर्षसमितीस ४० जागा देण्यात आलेल्या आहेत उमेदवारयादी उशीरा जाहीर झाल्याचा एक परिणाम म्हणजे ३३ उमेदवारांना अशा क्षेत्रात तिकिट देण्यात आलेले आहे, की त्यांनी तेथून अर्ज भरलेले नव्हते किंवा मागे घेतलेले होते. अशा ३३ ठिकाणी दुसऱ्या उमेदवारांना तिकिटे जाहीर करण्यात आली. अनेक उमेदवार याबाबत जनता पक्षाच्या नेत्यांबद्दल नाराजी व्यक्त करतात.

तिकिटवाटपाच्या प्रश्नाचा जनता पक्षावर मोठा परिणाम झालेला आहे. पहिला परिणाम म्हणजे निवडणूकप्रचारयंत्रणेमध्ये विस्कळितपणा आलेला आहे. दुर्वीच्या परंपरा चालविणाऱ्या नेत्यांना

धडा शिकविण्याचे काही युवकानी ठरविले आहे. तथापि त्याचा हा असतोष शात करण्यासाठी स्वत ची उमेदवारी सोडणारा शिवानंद तिवारी, सुशीलकुमार मोदी व अख्तर हुसेन याचा प्रयत्न यशस्वी होत असून थोडयाच दिवसात सर्व युवकशक्ती छात्र संघर्षसमितीच्या रूपाने जनता पक्षाच्या पाठीशी उभी राहील अशी चिन्हे दिसत आहेत. दुसरा परिणाम म्हणजे जनता पक्षास साधनसामुग्रीची कमतरता हा होय. अनेक उमेदवार उभे आहेत व त्यांतील अनेकजण आदोलन व लोकसभा–निवडणुकाच्या काळात एकत्र होते. त्यामुळे साधनसामुग्री विभागली गेलेली आहे. आणीबाणीत सर्वस्व हरवून बसलेले उमेदवार याची झळ सोशीत आहेत झेंडयाचा व पोस्टर्सचाही खर्च त्याना पुरविता येत नाही याबाबत सर्वांत जास्त घृणास्पद गोष्ट म्हणजे घटकपक्षानुरूप असलेले गट आपापल्या गटाच्या उमेदवारानाच साधनसामुग्री पुरवितात त्यामुळे एखाद्या जिल्ह्याचा दौरा करीत असताना जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या दोन जनतापक्ष उमेदवारांच्या साधनसामुग्रीतील तफावत नजरेत भरते. भागलपूर येथे वीरेंद्रप्रताप मिश्रा व जयप्रकाशजीची भाची सुधा श्रीवास्तव याची प्रमुख कार्यालये आहेत. वीरेंद्रप्रसाद मिश्राकडे विपुल साधनसामुग्री दिसते; पण सुधा श्रीवास्तव याच्याकडे कार्यकर्त्यांना चहा पाजण्यासही पैसे नसतात. तिसरा परिणाम म्हणजे काँग्रेसप्रमाणेच गटबाजीचे व जातीयतेचे राजकारण प्रभावी बनू लागलेले आहे. पूर्वाश्रमीचा जनसघ आपल्या शेजारच्या क्षेत्रातील पूर्वाश्रमीच्या समाजवादी उमेदवारास मदत करीत नाही. शिवाय त्या क्षेत्रात अपक्ष म्हणून उभ्या असलेल्या जनता–बडखोरास मदत करतो. अशा तक्रारी अनेकानी बोलून दाखविल्या. पूर्व रेल्वेमेन्स युनियनचे उपाध्यक्ष बाबुलाल सिंग म्हणाले, ' पहले तो टिकट मिलने के लिए गुटोबाजी और अब प्रचार में गुटोबाजी है । ' त्यांच्या मते प्रामुख्याने छात्रसंघर्षसमिती आणि जनसघीय लोक अशी गटबाजी करीत आहेत. छात्रसघर्षसमितीला उमेदवारी अजून मिळायला हवी होती का ? असे विचारल्यावर ते म्हणाले, ' भाई, हम ये मानते है की आदोलनमे उनका प्रभाव सबसे ज्यादा था, लेकिन जे. पी जी. ने तो उनको आदोलनमे आनेका आवाहन करते समय टिकिटोकी आशा नही दिलाई थी । व्हिजिलन्स करनेको कहा था । छात्र का त्याग हम समझते है मगर जो इस आदोलनमे गोलियोका शिकार हुअे उनको कौन टिकटदेनेवाला है ? ' एकंदरीत विद्यार्थीवर्गाबद्दल जुन्या कार्यकर्त्यांना असलेली आस्था या तिकिटवाटपाच्या प्रश्नामुळे कमी होऊ लागलेली आहे. छात्रसंघर्षसमितीने एकदा ४० तिकिटे स्वीकारल्यावर पुन्हा स्वतत्र उमेदवाराची भाषा करणे योग्य नाही असे अनेक नेत्यांचे मत आहे, जनसघानेही दुटप्पी रोल केलेला आहे. जनसंघाने आपल्या ६४ अधिकृत उमेदवाराबरोबर स्वतंत्रपणे आणखी जवळजवळ ६० उमेदवार उभे केलेले आहेत असे जनता पक्षाच्या जिल्हापातळीवरील नेत्यानी सांगितले. या उमेदवाराना उमेदवारी मागे घेण्यासाठी जनसघनेते आवाहन करीत आहेत; परतु ती पोकळ ठरताना पाहून कार्यकर्ते म्हणतात, ' ये उनकी डघुएल पॉलिसी है । '

तिकिटवाटपाच्या प्रश्नाचा आणखी एक परिणाम म्हणजे काही जातीना पूर्णपणे वगळले गेल्याने त्या स्वतत्रपणे निवडणुका लढविण्याची भाषा करतात. मुंगेर, भागलपूर, पूर्णिया या क्षेत्रामध्ये गंगोता जमातीची मते २० लाख आहेत, परतु त्यांना या जिल्ह्यातील सुमारे ४० जागांपैकी एकही जागा मिळालेली नाही. कांग्रेसनेही त्याना दूर ठेवले आहे म्हणून त्यानी आपल्या समाजाची एक सभा घेऊन ठराव केलेला आहे की, ' लोकसभा व विधानसभा–उमेदवारीमध्ये आपल्याला सधी मिळालेली नाही. गंगोला जातीचे उमेदवार या निवडणुकीत उभे करून त्याना निवडून आणायचे ' गगोला नेत्याना अजूनही जयप्रकाश नारायण, जनतापक्ष याबद्दल सहानुभूती आहे, पण ते म्हणतात ' कमसे कम चार सिटो तो देनी होती ! '

एकदरीत तिकिटवाटपावरून झालेली ' खिचा – तानी ' म्हणजे बिहार– आदोलन आणि लोकसभा– निवडणुका याच्या प्रवाहाचा ' अॅन्टी क्लायमॅक्स ' ठरलेली आहे ' जनता लहर ' त्यामुळे कमी झालेली आहे याचा परिणाम म्हणून काही स्वतत्र उमेदवार निवडून येतील, परतु त्याचा फायदा कॉंग्रेसला मात्र होऊ शकणार नाही एकूण मतदानच घटेल कॉंग्रेसमध्येही जुनी गटबाजी चालूच आहे. त्याची पापे इथल्या सर्वसामान्य माणसाना इतक्या प्रकर्षाने जाणवतात की जनता पक्षाबद्दल नाराजी व्यक्त करताना ते हे स्पष्ट करतात– ' इसका मतलब ये नही की हम कॉंग्रेसके गुडोके हाथमे सरकार देना चाहते है । ' २००–३०० मतदार असलेल्या खेडयातील लोकही असे बोलतात. जनमानसावरील जनता पक्षाची पकड सैल होत आहे ही जनता पक्षाची शोकांतिका आहे. परंतु त्यांचा फायदा उठविण्याइतपत कॉंग्रेसचे पुनरुज्जीवन होऊ शकलेले नाही हो त्याहून मोठी कॉंग्रेसची शोकांतिका आहे.

## जातीनुसार विश्लेषण

गगामाईवर विसंबून राहणारा बिहारी अजूनही पारपारिक बंधनातून मुक्त झालेला नाही. लोकसभा– निवडणुकामध्ये पुढाकार घेणारे विद्यार्थी सध्या सुटीमध्ये खेडयात आलेले आहेत व तेही जातीयतेच्या कोशातून या वेळी बाहेर पडू इच्छीत नाहीत. या निवडणुकामध्ये निरनिराळ्या जातोची व मुस्लिमाची गठ्ठामते कोणाला मिळणार हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. बिहारमध्ये ब्राह्मण ( मैथिल ), कायस्थ, भूमिहार, रजपूत, यादव आणि मागासजातीय आहेत. या शिवाय १२ टक्केपेक्षा जास्त मुस्लिम– लोकसख्या आहे.

पारंपारिक सस्कृतीचा परिणाम म्हणून राजकारणात एके काळी ब्राह्मणाचे वर्चस्व होते, परतु भ्रष्टाचारविरोधी आदोलनामुळे ते थोडे कमी झालेले आहे. ब्राह्मणविरोधी प्रवाह बिहारच्या राजकारणात गेल्या दोन-तीन वर्षांत दिसून येत आहेत. ललितनारायण मिश्राची जात म्हणजे मैथिल. ब्राह्मणाच्या या गटाबद्दल इतर जमातीमधील लोकामध्ये विरोधाची भावना दिसून येते. भूमिहारामधील जमीनदारवर्गाच्या सहकार्याने ही जात वर्चस्व प्रस्थापित करीत आलेली आहे. राजकारणात सत्तास्थाने बराच काळपर्यंत भोगीत आलेला हा वर्ग असल्यामुळे भ्रष्टाचारही मोठ्या प्रमाणावर दिसतो. अजूनही या जातीचे मत कॉंग्रेसकडे झुकेल. पिळवणूक करणाऱ्या ह्या वर्गाची प्रतिमा सर्वसामान्यामध्ये फार वाईट आहे. येथे एक म्हण प्रसिद्ध आहे,

' जिस गाजपर ( झाडावर ) बागूल बैठा, जिस राजमें मैथिल रहा, वह गाज गया, वह राज गया । '

कायस्थ ही सुद्धा एक उच्चवर्णीय जात. अल्पसंख्य असल्याने प्रथमपासून राजकारणाबद्दल अलिप्ततेची भावना असलेला हा वर्ग. सुशिक्षित बुद्धिजीवी असे या वर्गाचे वर्णन करता येईल. गेल्या लोकसभा– निवडणुकामध्ये ही जात कार्यक्षम बनली. बिहारमधील जे. पी. च्या जनआंदोलनाचा परिणाम या जातीवर दिसून येतो. यामधील पूर्वीचे सर्वोदयी व समाजवादी– नेते आता जनता पक्षात मोठ्या प्रमाणावर कार्य करू लागलेले आहेत. त्याची राजकीय शिथिलता कमी झालेली आहे ह्या जातीचे बहुसंख्य मतदान जनता पक्षाकडे झुकेल असे म्हणावयास हरकत नाही, परंतु त्याची एकूण संख्या इतकी कमी आहे की त्याचा नजरेत भरण्याइतपत परिणाम दिसणार नाही.

भूमिहार ही बड्या जमीनदाराची जात होय. अल्पसंख्य असूनही यादवाचा पाठिंबा मिळवून ही जात राजकारणात वर्चस्व प्रस्थापित करते. ह्या जातीलाही येथे ब्राह्मण म्हणतात. भूमिहार– ब्राह्मण हा मैथिलाच्या बरोबर राहतो. शिवाय यादवावरही यांचे प्रभुत्व दिसून येते. भूमिहाराचे बिहारच्या राजकारणातील महत्त्व म्हणजे बहुतेक पक्षाचे सेक्रेटरी या जातीचे असतात.

भूमिहाराच्या खालोखाल वर्चस्व असलेली जात म्हणजे मध्यम जमीनदाराची 'रजपूत' किंवा 'क्षत्रिय' ही होय. रजपूत बरेचसे विभागलेले आहेत त्यामुळे राजकारणात मोठे करिअर करू शकलेले नाहीत.

जास्त संख्या असलेली आणखी एक स्पृश्य जात म्हणजे यादव. येथे तिचा उच्चार 'जादव' असा करतात. कुणबी व गवळी या महाराष्ट्रातील जातीशी तिची तुलना करता येईल. भूमिहीन शेत-मजुराचा हा वर्ग असंघटित राहिल्याने कधीही वर येऊ शकला नव्हता कधी भूमिहीनांबरोबर तर कधी रजपुतांबरोबर अशी याची विभागणी दिसून येते समाजवादी चळवळीमुळे हळूहळू हा वर्ग संघटित होत आहे. बिहार आंदोलनामुळे त्याचा राजकारणातील सहभाग वाढत आहे, परंतु यादवाना मोठ्या प्रमाणावर तिकिटे देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या निवडणुकीत यादव जातीयतेच्या जाणिवेतूनच मतदान करील असे दिसते शेतकऱ्यांच्या प्रश्नाना महत्त्वाचे स्थान बजेटमध्ये देण्याची घोषणा करणारे जनता सरकार यादवाच्या जातीय जाणिवा कमी करू शकलेले नाही. या जातीचे लोक त्याना कमी महत्त्व दिल्याने नाराज आहेत घटकपक्षाच्या चढाओढीत या जातीच्या मतदाराचा जेवढा विचार व्हायला हवा होता तेवढा झालेला नाही

अस्पृश्य किंवा मागासवर्गीयामध्ये कूर्मि, कहार, चमार या जातीचा समावेश होतो. यादव, कोयरी, कूर्मि, कहार, चमार या जातीना 'पिछडेवाली' असे संबोधतात. कोयरी म्हणजे भाजीपाला करणारे माळी होत. पिछडेवाल्या अस्पृश्य जमातीमध्येही राजकीय दृष्टचा जागृती कमी आहे. त्यातल्या त्यात चमार– नेतेच बहुतेक अस्पृश्य जमातीवर प्रभुत्व दर्शवितात. या जमातीमध्ये कॉंग्रेसने आज-पर्यंत काही केले नाही याची जाणीव दिसली. हरिजनटोला (नायनगर) मध्ये फिरताना बरेच लोक आटलेल्या विहिरी आणि नसलेले रस्ते दाखवितात. जनता सरकारने याबाबत काही करावे अशी त्याची अपेक्षा आहे. जनता पक्षाचे नेते त्याना मोठी वचने देत आहेत, परंतु जनता पक्षाला जरी मते देणारा हा वर्ग असला तरी त्याना दिलासा वाटण्याइतपत जनता पक्षाचे कार्यकर्ते त्यांच्यात विश्वास निर्माण करू शकलेले नाहीत. या बाबत झालेली एक चर्चा बरेच काही सांगून जाते.

पिछडे जातीना सत्ताकारणात सहभाग मिळतो का असे विचारल्यावर एक कार्यकर्ता मला म्हणाला, 'मागासवर्गीयांमध्येसुद्धा विभागणी होती.' कर्पूरी ठाकूरचे उदाहरण त्याने सांगितले. तो म्हणाला 'मेरे ख्यालसे कर्पूरीजी जैसा काबील आदमी इंडियामे दूसरा नही मिलेगा। आप खुद उसका घर जाके देखो. मंत्री होनेके बाद यहां एकही आदमी ऐसा है कि जिन्होने एक इंच भी जमीन नही बढाई।' 'कर्पूरीजीको सेंट्रलमे मिनिस्ट्री मिल जाएगी?' असा प्रश्न मी विचारल्यावर, निराश चेहरा करून तो म्हणाला,- 'उनको कैसे मिलेगी? वे तो नापिक (न्हावी) है। उनकी जात बहुत मायनॉरिटीमे है. इसके लिए उनकी तरक्की करनेवाले एम् पी नही है। अगर वो चमार होते तो प्राइममिनिस्टर बन जाते।'

मुस्लिम मतदारापैकी बहुसंख्य मते जनता पक्षास पडतील अशी आशा आहे. कांग्रेसचे कार्यकर्तेसुद्धा हे मान्य करतात. त्यामुळेच ठिकठिकाणी अपक्ष मुस्लिम उमेदवाराना ते आतून मदत करतात. मुस्लिमाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात मुस्लिम उमेदवाराना तिकिटे मिळालेली नाहीत या बुखारीच्या विधानाच्या छापील प्रती कॉंग्रेस कार्यकर्ते वाटीत असतात मुस्लिम मतदारामध्ये जनता पक्षाबद्दल आस्था आहे. ठिकठिकाणच्या वस्त्यामधून आणि मशिदीत जमलेल्या वृद्ध मुसलमानाचा सूरही जनता पक्षाच्या बाजूस दिसून येतो. मुस्लिमामध्ये अल्पसंख्याक म्हणून असुरक्षिततेची जाणीव प्रकर्षाने आढळते. त्यामुळे अपक्ष मुस्लिम उमेदवाराना फारसे भवितव्य नाही. त्याना ५४ तिकिटाचा कोटा मिळणार होता; परंतु प्रत्यक्षात जनता-पक्षातर्फे २४ मुस्लिम उमेदवार बिहारमध्ये उभे आहेत. अगदी २०० ते ३०० मतदार असलेल्या गावी जाऊन आलो. मुस्लिमामध्ये त्याबद्दल नाराजी असली तरी शेवटी मते जनतापक्षालाच देणार, असे ते म्हणतात. 'भाई, हमारी ये तो शिकायत है, लेकिन जिसको अल्लाने अकल दियी है वो जानता है की, मुसलमानोका अगर भला होनेवाला है तो जनतापार्टीसेही होनेवाला है।' अपक्ष मुस्लिम उमेदवाराना मते देणार का, असे विचारल्यावर ते म्हणतात, 'वो अकेले क्या कर सकते है? उनको हिंदुओके व्होट मिलनेवाले तो नही है। तो हम किसका साथ देवे, जनताकाही।' कॉंग्रेस किंवा जनतापार्टी यापैकी जनता पार्टीलाच का मते देणार, असे विचारल्या-वर कॉंग्रेसने आणीबाणीमध्ये केलेल्या अत्याचाराचा पाढा वाचतात व म्हणतात, 'हुकमतवाले जो है वही तो हमारा भला कर सकते है। कॉंग्रेस तो अभी हुकमतमें है ही नही, इसलिए जनता पार्टीको व्होट देते।'

जनतापक्षाचे नेते लोकसभा–निवडणुकामध्ये मुस्लिम मतामुळे आम्ही निवडून आलो हे कबूल करतात, याचा मुस्लिमाना अभिमान वाटतो. एका विणकर मुस्लिमास विचारले, 'क्या भाई, इलेक्शन कौन जितेगा?' यावर तो म्हणाला, 'कांग्रेस तो अब खतम हुई। जनतापार्टीको हमें बहुत शिकायत है, लेकिन उनका साथ इतना जल्दी नही छोडेंगे। आगेवालो इलेक्शनमे उनका साथ दिया, अब पिछेवालीमें क्यो छोड दूं? नो तो बेवकूफी होगी।'

'आगेवाली और पीछेवाली क्या होता है?' मी विचारले.

'आगेवाली याने सेंटर और पीछेवाली याने प्रॉव्हिन्शियल!' त्याने मला शहाणपण शिकविले.

मुसलमानाना अपील होणारे मुद्दे म्हणजे आणीबाणीतील अत्या-चार, जनता सरकारचे नसबंदीबाबतचे धोरण, २०० बांगला देश नागरिकाना सोडण्याची जनता सरकारची भूमिका आणि मतदानाचा अभिमान, हे होत खेड्यातील सुशिक्षित मुस्लिम तरुणसुद्धा जनता पक्षाचा जास्त ॲक्टिव्ह प्रचार करीत आहे. कॉंग्रेसचा प्रयत्न

ही मते फोडण्याचा असला तरी बिहारच्या विधानसभेत जनता पक्षास बहुमत मिळण्यासाठी मुस्लिम–मताचा निर्णायक कौल परिणामकारक ठरणार आहे.

## काँग्रेसपुढील प्रश्न

काँग्रेसपुढे सर्वात मोठा प्रश्न आहे तो आणीबाणीतील अत्याचाराबद्दलचा तीव्र असंतोष. जनता-लाट ओसरली असली तरी काँग्रेस-विरोधी लाट ओसरण्यास बराच अवधी लागेल. प्रत्येक मतदारसंघात काही काही घटना आणीबाणीमध्ये अशा घडलेल्या आहेत की, त्याबद्दलची तीव्रता अजून कमी झालेली नाही. त्याची आठवण ठेवून काँग्रेसच्या प्रचारकांना लोक जाब विचारतात. क्षमायाचना करूनच त्यांना भाषणास सुरुवात करावी लागते, परंतु उघडपणे ते जोपर्यंत इंदिरा गांधीविरुद्ध बोलत नाहीत तोपर्यंत लोकांना त्यांच्याबद्दल विश्वास वाटणे शक्य नाही. या अर्थाने काँग्रेसच्या संघटनेत जो आमूलाग्र बदल व्हावयास हवा होता तो दिसून येत नाही. सुमारे १६१ जुने आमदारच त्यांनी उभे केलेले आहेत. काँग्रेसने केलेली प्रगती, येथून पुढे दडपशाही न करण्याची प्रतिज्ञा जनता पक्षातील घटक पक्षांमध्ये निर्माण झालेला विद्रोह यापलीकडे ते फारसे बोलत नाहीत. साधनसामुग्रीच्या बाबतीत मात्र ते जनता पक्षाच्या पुढे आहेत.

## जनता-पक्षापुढील प्रश्न

तिकिटवाटपातील गोंधळ, पिछड्या जातीकडे दुर्लक्ष आणि गटबाजी हे प्रश्न जनता पक्षास भेडसावीत आहेत. गटबाजीमुळे अनेक राष्ट्रीय नेते प्रचारास येऊ शकले नाहीत. आम्हाला खेड्यापाड्यातील लोक हेच सांगतात. आम्ही पुण्याचे आहोत हे समजल्यावर एस. एम. जोशींची चौकशी करतात. तालुक्याच्या ठिकाणी एक कार्यकर्ता तर म्हणाला, ' We regard him as J. P. ' तेव्हा मी त्याला विचारले, ' आपने उनको क्यों नहीं बुलाया ? ' त्यावर तो म्हणाला, ' हम तो बहुत चाहते हैं, लेकिन हम उनको कैसे बुलावे ? पटनासे उनको बुलावा जाना चाहिए । ' अशा तऱ्हेने सर्वसामान्य कार्यकर्ते व एस. एम. जोशी यांच्यातील दुवा साधणे वरिष्ठ नेत्यांना जमले नाही. एका कार्यकर्त्याने चिडून याबद्दल नापसंती व्यक्त केली. साधनसामुग्रीचा अभाव हा दुसरा महत्त्वाचा प्रश्न जाणवतो. नुसताच अभाव म्हणण्यापेक्षा त्याची विषम विभागणी नजरेत भरते.

या विविध प्रश्नांची तीव्रता विविध मतदार संघात कमीजास्त दिसून येते. त्याचे नेमके स्वरूप काय व सर्वसाधारण शक्तीबरोबर इतर स्थानिक शक्ती कशा प्रकारे कार्यान्वित होत आहेत हे समजण्यासाठी उदाहरणादाखल काही मतदारसंघातील निवडणूक–प्रचाराची समग्र माहिती देणे आवश्यक आहे.

## भागलपूर

पटण्यापासून २५० किलोमीटर अंतरावरील हे जिल्ह्याचे गाव. या जिल्ह्यात एकूण १२ मतदारसंघ आहेत. त्यापैकी भागलपूर शहर आणि नाथनगर या मतदारसंघात हिंडलो. भागलपूर मतदारसंघातून जनता पक्षातर्फे विजय प्रताप मिश्र हे उभे आहेत. त्यांना मुस्लिमांचा पाठिंबा आहे. शिवाय जनता बंडखोर उभा नसल्याने त्यांच्या विजयाची खात्री सर्वचजण देतात. काँग्रेसचा उमेदवार अतिशय कच्चा आहे. जगजीवनराम यांची आणीबाणीच्या काळातील वक्तव्ये मोठ्या अक्षरात पत्रकावर लावून ठिकठिकाणी चिटकवलेली आहेत. विजय प्रताप हे पूर्वीचे स. वि. द. सरकारमधील मंत्री असून जयप्रकाशांच्या आवाहनानुसार त्यांनी आमदारकीचा राजीनामा दिलेला आहे. कर्पूरी ठाकूर, रामानंद तिवारी इ. नेते केंद्रीय पातळीवर गेलेले असल्यामुळे मुख्य मंत्रिपदासाठी आपलाच क्लेम आहे, असे ते मानतात. भागलपूरच्या जवळच्याच मतदारसंघामध्ये म्हणजे ' नाथनगर 'मध्ये जयप्रकाशजींची भाची श्रीमती सुधा श्रीवास्तव ह्या जनता पक्षातर्फे उभ्या आहेत. महिला संघर्ष समितीच्या त्या कार्यकर्त्या असून संपूर्ण घराण्यात सर्वोदयी कार्याचा वारसा आहे. घरातील सर्वजण जेलमध्ये असल्यामुळे त्यांच्याकडे साधनसामुग्रीचा मोठा तुटवडा दिसत आहे. त्या निवडून आल्यावर मंत्रिपदासाठी त्यांचाही नंबर लागण्याची शक्यता आहे. म्हणून विजय प्रताप व त्यांच्यात तणाव आहे. नाथनगरमधून पूर्वाश्रमीच्या जनसंघाचा प्रभासचंद्र तिवारी बंडखोर म्हणून उभा आहे. त्याचा प्रचार विजय प्रताप यांचे कार्यकर्ते करताना दिसतात. याबद्दल उमाजी श्रीवास्तव यांनी तीव्र नापसंती व्यक्त केलेली आहे. नाथनगरमधून नेहमी निवडून येणारे समाजवादी कार्यकर्ते बनारसीबाबू गुप्ता हे मात्र तिकिट नाकारूनसुद्धा पक्षशिस्तीनुसार संबंध जिल्ह्यात प्रचार-दौरा करीत असतात. १ लाख ३० हजार मतदार असलेल्या या मतदारसंघात मुस्लिम मते ३० हजाराच्या आसपास असल्याने त्यांचा कौल महत्त्वाचा ठरतो. काँग्रेसचा उमेदवार श्री. चुनचुन यादव मात्र यादवांची मते घेईल. भागलपूरमध्ये आणीबाणीत एका मुस्लिम मुलाला मारून बुलडोझरने फेकून दिलेले होते. तेव्हा जनतेला प्रेत ताब्यात घेण्यासाठी आंदोलन करावे लागले होते. त्यामुळे मुस्लिम लोक काँग्रेसी गुंडशाहीला मते देणार नाहीत, असे म्हणतात. नाथनगरमध्ये एकूण दोन अपक्ष मुसलमान उभे आहेत, परंतु त्यांना ' भाडे के टट्टू ' असे संबोधले जाते. एक मुस्लिम महिला म्हणाली, ' किसीको चढाकर खाली खींचना बेवकूफी होगी । रहती दुनिया तक हमे याद रहेगा की, काँग्रेसने क्या किया है । लडकेको मारकर बोरेमें फेंक देनेवालेको हम कैसे भूलेंगे । अगर वो रमजानका टाइम न होता तो बहुत हल्ला होता । ' चुनचुनबाबूंचे वैशिष्ट्य म्हणजे ते १०–२० बूथ पिस्तुलाच्या व लाठीधारी गुंडाच्या सहाय्याने ताब्यात घेतात. या वेळेस तशा तक्रारी पंतप्रधानापर्यंत गेलेल्या आहेत. डी. एम. पी. नी आश्वासन दिलेले आहे. तरीसुद्धा हरिजनलोक अजून घाबरलेले आहेत. दुसरा एक महत्त्वाचा घटक म्हणजे गंगोता समाजाची सुमारे २० हजार मते त्यांनी उभ्या केलेल्या अपक्ष उमेदवाराकडेच झुकणार आहेत. त्यामुळे जनता पक्षाचा विजय झाला तरी मतदान कमी झालेले असेल व मताधिक्य फार थोडे असेल.

भागलपूर जिल्ह्यामध्ये १२ पैकी १० जागा आम्ही जिंकू. एक C P I व एक काँग्रेसला जाईल असा विश्वास जनतानेते व्यक्त करतात, तर काँग्रेसवाले ५०–५० टक्के विभागणी होईल असे मानतात.

## सिवान

या जिल्ह्यामध्ये श्री. कृष्णकांत सिंग (का.), श्री. जनार्दन तिवारी आणि श्री. शंकरनाथ विद्यार्थी (दोन्ही जनता बंडखोर) या तीन बड्या आसामी उभ्या आहेत, परंतु त्यांना निवडणूक जिंकणे फार कठीण जाणार आहे असे बोलले जाते. गोरीकोठी मतदारसंघात कृष्णकांत सिंगना प्रामुख्याने जनता पक्षाचे उमेदवार श्री. इंद्रदेव प्रसाद आणि कम्युनिस्ट उमेदवार अब्दुल जलील यांच्याशी सामना द्यायचा आहे. या मतदारसंघात कम्युनिस्टांशी युती करू न शकलेल्या काँग्रेस पक्षास मोठा पेच निर्माण झालेला आहे. गोरीकोठी या मतदारसंघात जनता–बंडखोर नाही. १९७२ च्या निवडणुकीमध्ये कृष्णकांत सिंगाचा पराभव महामायाप्रसाद यांनी केलेला होता. आता ते जनता पक्षाचे खासदार असून त्यांच्या प्रभावाचा फायदा जनता पक्षास झाल्यावाचून राहणार नाही. एक महत्त्वाचा घटक

येथे जाणवतो, तो म्हणजे मतदारसंघाची पुनर्रचना. पूर्वीच्या बाराहरीया विभागातील २४ गावे सध्याच्या गोरीकोठीमध्ये समाविष्ट केलेली आहेत त्यामुळे पूर्वीच्या बाराहरिया मतदारसंघातून निवडून आलेला कम्युनिस्ट उमेदवार अब्दुल जलील याला या पुनर्रचनेचा फायदा मिळेल, परंतु यामध्ये प्रामुख्याने कोयरी जातीचा प्रभाव जास्त असल्याने जनता पक्षाच्या इंद्रदेव प्रसाद यानाच त्याचा फायदा होईल असे मानले जाते. दुसरे वैशिष्टय म्हणजे भूमिहाराची संख्या जास्त असलेला विभाग या मतदारसंघातून काढला गेलेला आहे. त्यामुळे कृष्णकांत सिंग या कॉंग्रेसच्या उमेदवाराचे चान्सेस कमी झालेले आहेत. राजकोकिळ भगत हा स्वतंत्र उमेदवार कोयरी समाजाचा असून त्याने जनता उमेदवारासाठी उमेदवारी मागे घेतल्याने जनता पक्षाचा विजय निश्चित झाल्यासारखे आहे, परंतु तिकिट न मिळालेला व जेलयात्रा करून आलेला कार्यकर्ता कमलदेव शर्मा उदासीन झालेला आहे.

सिवान मतदारसंघामधून एकूण दहा उमेदवार उभे आहेत. ते म्हणजे श्री. गुलाम सरवार (जनता), जनार्दन तिवारी (बंडखोर जनता), श्री. शेराजुल हक (कॉं.), श्री. आवाढ चौधरी (बंडखोर कॉंग्रेस), इतर सहा स्वतंत्र उमेदवार महत्त्वाचे नाहीत कॉंग्रेसला अडचणीचा ठरणारा बंडखोर उमेदवार युवक कॉंग्रेसचा नेता असून त्याच्या नात्यामध्ये बडे कॉंग्रेसनेते असल्याने त्यास विजयाची खात्री वाटते. परंतु लागोपाठ तीन वेळा खासदार म्हणून निवडून येणाऱ्या महंमद युसुफ याचा पुतण्या कॉंग्रेसच्या तिकिटावर उभा असल्याने ते प्रचारकार्यात अग्रभागी असतात; परंतु काही कॉंग्रेस कार्यकर्त्यांना युसुफ कुटुंबाची मक्तेदारी सिवान जिल्ह्यात नकोशी झालेली आहे. तथापी बंडखोर उमेदवारापेक्षा कॉंग्रेसच्या उमेदवारास मुस्लिम मतांचा पाठिंबा असल्याने जास्त मते मिळण्याची शक्यता आहे. जनता पक्षाचे श्री. गुलाम सरवार 'बाहरका-आदमी' म्हणून त्याच्या विरुद्ध प्रचार केला जात आहे. त्यामुळेच जनता बंडखोर तिवारीना निवडून येण्याची खात्री वाटते. श्री. तिवारी पूर्वाश्रमीचे जनसंघाचे असून १९६२, १९६९ व १९७२ मध्ये विधानसभेवर निवडून गेलेले आहेत जनता बंडखोरामुळे जनता पक्षास येथे फार कमी शक्यता दिसते

## झंजारपूर

मधुबनी जिल्ह्यातील हा मतदारसंघ सर्वात महत्त्वाचा मानला जाण्याचे कारण म्हणजे माजी मुख्य मंत्री डॉ जगन्नाथ मिश्र कॉंग्रेसच्या तिकिटावर उभे आहेत त्यामुळे या मतदारसंघाला बिहारला 'रायबरेली' मतदारसंघ असे मानले जाते. या मतदारसंघामध्ये कॉंग्रेस आणि जनतापक्षाच्या प्रचाराचा उच्चांक दिसतो जनतापक्षाचे उमेदवार आहेत जगदीश नारायण चौधरी. स्वतंत्र उमेदवारामध्ये माजीमंत्री श्रीरामफल चौधरी सोडले तर इतर नगण्य आहेत. या मतदारसंघाचे वैशिष्टय म्हणजे प्रत्येक निवडणुकीमध्ये उमेदवार बदललेला आहे. १९७२ मध्ये मिश्रानी समाजवादी उमेदवार श्री. रामफल चौधरीचा प्रचंड मतानी पराभव केलेला आहे; परंतु या वेळी मिश्राना निवडणूक फार महाग पडणार आहे असे दिसते याचे प्रमुख कारण म्हणजे कै. ललितनारायण मिश्राच्या मृत्यूची चौकशी करण्याची मागणी त्याच्या पत्नीने केलेली आहे त्याचा परिणाम ४००० ब्राह्मण-मतदार फुटण्यावर होणार आहे अन्यथा ही सारी मते कॉंग्रेसला गेली असती. जनतापक्षाचे यश प्रामुख्याने या फुटणाऱ्या मतावर आणि ५०-६० हजार "पिछडे जातीच्या" मतावर अवलंबून आहे येथील १५ हजार मुस्लिम मताबद्दलही जनतापक्षाचे नेते आशावादी आहेत. धनिकलाल मंडल व हुकुमदेव यादव हे खासदार जनतापक्षाच्या उमेदवारासाठी प्रचार करीत आहेत परंतु राष्ट्रीय पातळीवरील नेता अजून येऊन गेलेला नाही व येणार नाही; याबद्दल युवक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. श्री. रामफल चौधरी कोणत्याही क्षणी बसण्याची शक्यता बोलली जाते. तसे झाले तर जनतापक्षाचा विजय निश्चित आहे अन्यथा उपप्राचार्य श्री. जगदीश नारायण चौधरी राजकारणात नवखे असल्याने व मिश्रा बनचुके असल्याने जनतापक्षास धोका आहे.

या मतदारसंघात बूथ-नियंत्रित करण्याचा धोका बोलला जात आहे. मिश्राची ही पारंपरिक सवय असल्याचे सांगितले जाते. शिवाय गुंडांची मोठी टोळी त्यांच्या हाताशी असल्याने पिछडे-जातीच्या लोकावर ते दबाव आणू शकतात. श्री. राजनारायण यांनी या प्रचाराची दखल घेतलेली आहे सर्वसामान्य माणसे मात्र गुंडगिरीला कंटाळलेली आहेत. त्यामुळे जनता सरकार यावे अशी त्याची प्रामाणिक इच्छा ते बोलून दाखवितात.

## बिहारचा अमेठी

मधुबनी जिल्ह्याचा मधेपूर मतदारसंघ बिहारमधील 'अमेठी' म्हणून ओळखला जातो येथे चार उमेदवार असले तरी खरी लढत कॉंग्रेसचे श्री. राधानंदन झा व जनतापक्षाचे श्री. महावीर प्रसाद महतो याच्यात होईल असे दिसते. माजीमंत्री श्री. झा हे निवडणुकाच्या राजकारणात तरबेज आहेत; परंतु या वेळी त्याच्या विजयाची खात्री देता येत नाही कॉंग्रेस ही प्रेस्टिज सीट समजत आहे; परंतु येथे उच्चवर्णीय व दलितवर्गीय लोकामध्ये तणाव निर्माण झालेला आहे पहिल्यापासून येथे समाजवाद्याचे प्रभुत्व दिसून येते १९६९ च्या निवडणुकांमध्ये आणि १९७२ मध्ये श्री. झा याना समाजवादी उमेदवाराशी मोठी झुंज द्यावी लागली होती; परंतु या निवडणुकीमध्ये त्याना प्रतिकूल असा घटक म्हणजे हरिजन व इतर पिछड्या जातीची मते या वेळी फुटण्याची शक्यता कमी झालेली आहे ही मते जनतापक्षाच्या बाजूने कौल देतील असे वाटते. ब्राह्मण मतदारांची संख्या ३५,००० आहे तर हरिजन व मागासवर्गीयाची संख्या ७० हजार आहे. याशिवाय स्वर्गीय ललितनारायण मिश्राचे चिरंजीव श्री. विजयकुमार मिश्रा (विधान परिषद सदस्य) श्री झा यांच्या विरोधात असून जनतापक्षास मदत करीत आहेत. त्यामुळे मैथिल या उच्चवर्णीय जातीची मते विभागली गेली तर या बिहारच्या अमेठीमध्ये कॉंग्रेसचा दारुण पराभव झाल्याशिवाय राहणार नाही.

एकंदरीत असे हे बिहारचे निवडणूक-चित्र आहे मुजफरपूर, दरभंगा इ जिल्ह्यातील निवडणूकवृत्ताबद्दलही वाचकाना उत्सुकता असेल मुजफरपूरमध्ये ११ जागापैकी ९ जागामध्ये जनतापक्षाचा जोर स्पष्ट दिसतो उरलेल्या दोन जागामध्ये अपक्ष उमेदवाराशी मोठा सामना द्यावा लागेल असे दिसते. कॉंग्रेसची स्थिती फारच डबघाईला आलेली असून जॉर्ज फर्नांडिसाच्या दौऱ्यामुळे जनतापक्षाचा विजय जवळजवळ निश्चित झाल्यासारखा आहे तूर्त एवढेच !

बिहार-निवडणुकाचे विश्लेषण करताना एक मात्र जाणवते. लोकसभा-निवडणुकाचे वेळी असलेला कार्यकर्त्यांमधील बंधुभाव कमी झालेला आहे त्याचा परिणाम म्हणून काही मतदानक्षेत्रात मतदाराचा कौल जनतापक्षाच्या विरोधीही लागेल, परंतु सरकार जनता पक्षाचे बनेल असे म्हणावयास हरकत नाही. जनतापक्षाबद्दलचा जनमानसात दिसून येणारा राग अजूनही आपुलकीपोटी असलेला दिसतो. कॉंग्रेस सत्तेवर यावी अशी कोणत्याही थरातून इच्छा प्रदर्शित होत नाही 'हमने खमीस पहना है धोती भी जरूर पहनावोगे' असे खेड्यातील लोकसुद्धा बोलतात. "तीस साल कॉंग्रेसको सहलिया तो ५ साल जनतापार्टीको सह लेंगे" अशीच भूमिका सर्वसामान्यांमध्ये दिसते. तेव्हा ३२४ जागासाठी २९९४ उमेदवार उभे असले तरी बहुमत जनतापक्षास मिळेल यात वाद नाही; परंतु हा विजय खऱ्याखुऱ्या जनतेचा असेल का? खऱ्या अर्थाने अंत्योदयास तो पूरक ठरेल का? याचा विचार जनतानेत्यांनी येथून पुढे तरी करणे आवश्यक आहे. □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १८।६।७७ ते २४।६।७७

**मेष : नव्या क्षेत्रात प्रवेश**

दुसरा गुरू, तिसरा रवी हे ग्रह अत्युत्तम आहेत. कोणत्याही क्षेत्रात बदल करायला हरकत नाही. तुमचा स्वतंत्र धंदा असेल तर एखादी नवी योजना हाती घेऊ शकाल. राशीतच मंगळ आहे. शेतीचा व्यवसाय छान चालेल नोकरीत एखादी नवी जबाबदारी अंगावर पडेल व ती पार पाडण्याचे सामर्थ्यदेखील प्राप्त होईल. बेकारीची परिस्थिती शिल्लक राहणार नाही. स्वतंत्र उद्योग करायला कर्ज अथवा मदत मिळेल. या वेळी महत्त्वाच्या कामासाठी प्रवास होईल. परदेशप्रवास होईल. मित्रांचे सहकार्य मिळेल. हाती घेतलेले कार्य तडीस जाईल अनेकांच्या आशीर्वादाने काम होईल. शुभ दिनांक २१, २२

**महिलांना** . नोकरीत अधिकारप्राप्ती होईल.

**विद्यार्थ्यांना** : नव्या शाळेत उत्साहाने मन रमेल.

**वृषभ : नवी वाट सापडेल**

मंगळ बारावा असला तरी त्याची तुम्ही मुळीच पर्वा करू नका. कारण गुरूचे भरपूर पाठबळ आहे त्याने तुमचे मानसिक सामर्थ्य वाढवले असून तुम्हाला कोणत्याही क्षेत्रात यश मिळवून द्यायचे त्याने ठरवले आहे. तुम्ही बिनधोकपणे कोणतेही काम हाती घ्या त्यात प्रचंड यश मिळाल्याखेरीज राहणार नाही. रवी गेल्याच आठवड्यात दुसरा झाला आहे. तो पैशाचे वायदे पुरे करणार आहे. जुने येणे वसूल होईल आर्थिक बाजू बळकट करील. व्यापार असो की स्वतंत्र असा कोणताही धंदा असो तो फायद्यात येईल नोकरीत चांगले वातावरण निर्माण होईल. अनेक प्रकारे सहकार्य मिळून कार्यक्षमता वाढेल. शुभ दिनांक २०, २२.

**महिलांना** धार्मिक कार्य मनासारखे पार पडेल.

**विद्यार्थ्यांना** : मन प्रसन्न राहून हुषारी दिसेल.

**मिथुन : नोकरीत अनुकूलता**

आठवडा फार छान आहे बारावा शुक्र आहे, पण त्यामुळे तुमच्या एकूण कार्यक्रमावर कोणताच परिणाम होणार नाही. तुम्ही लेखक असाल तर तुमचे अपुरे लेखन पुरे होईल. तुमच्या ग्रंथाला लोकप्रियता लाभेल धंद्याची परिस्थिती फार उत्तम राहील अनेक प्रकारे लाभ दृष्टिपथात येईल. आरोग्य उत्तम राहील जुना आजार असेल किंवा मनाची अप्रसन्नता असेल तर ती दूर होऊन मन उत्साही राहील नोकरीबाबतीत कोणतीच काळजी नको. वरिष्ठांची मर्जी राहून हेतू सफल होईल. आर्थिक स्थिती समाधानकारक राहिली तरी खर्च मात्र अचानक निर्माण होईल असे दिसते शेतीचा व्यवसाय मार्गी लागेल. प्रवास सुखकर पार पडेल. शुभ दिनांक १९, २०.

**महिलांना** सार्वजनिक क्षेत्रात प्रतिष्ठा व मोठेपणा मिळेल.

**विद्यार्थ्यांना** नवे शालेय जीवन आवडेल.

**कर्क : अडचणीतून मार्ग**

राशीत शनी आहे व गुरू अकरावा आहे, हीच तुमची खरी जमेची बाजू आहे. तुम्हाला सर्व प्रकारचे लाभ आणि फायदे या दोन ग्रहामुळेच मिळणार आहेत सध्या रवी बारावा झाला आहे, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही कारण रवी हा ग्रहाचा राजा आहे व तोच बारावा आहे प्रामुख्याने नोकरीत चुका होऊ देऊ नका नियम व कायदा व्यवस्थित पाळा. तुमच्या हाती पैशाचे व्यवहार असतील तर ते काळजीपूर्वक करा. नोकरीत एरवी काही प्रतिकूल नाही चालू व्यवसायात काही प्रगतीची पावले पडतील अडचणीतून मार्ग निघेल. पैशाची परिस्थिती समाधानकारक राहील गरजेपुरता पैसा मिळेल व्यापारात प्रगती होईल. व्यापारी अंदाज अचूक ठरतील. शेअर्सचे व्यवहार लाभदायक ठरतील. एकूण प्रगतीकडे वाटचाल राहील. शुभ दिनांक १९–२१

**महिलांना** . पैसा मिळवून देणारा एखादा घरगुती उद्योग चालू करावा.

**विद्यार्थ्यांना** . अपेक्षापूर्तीचा आनंद मिळेल.

**सिंह : यशाची चाहूल**

बाराव्या शनीची उग्रता आता कमी होत चालली आहे विशेषत प्रतिष्ठा–मानमरातब याबाबतीत तुमचे जे अवमूल्यन चालू होते त्यात बदल होत असलेला प्रत्ययाला येईल. रवी हा राशिस्वामी असून त्याची कृपा हे तुमचे मोठे बळ आहे तो अकरावा आहे तो तुमची आर्थिक बाजू खूपच बळकट करणार आहे. रेस–लॉटरी इत्यादी साधनांपासून आर्थिक बाजू बळकट होईल बक्षीस मिळू शकेल. जुने येणे वसूल होईल. व्यापारात प्रगतीची नवी क्षितिजे दृष्टिपथात येतील. प्रतिष्ठा वाढेल लोकात तुमच्या शब्दाला महत्त्व प्राप्त होईल. तरी पण राजकारणात मात्र फार मोठ्या अपेक्षा बाळगण्यात काही अर्थ नाही नोकरीची एकूण स्थिती तशी समाधानकारक राहील; परंतु वरिष्ठाबरोबर मतभेदाचे प्रकार टाळा. बेकाराना बरीच अनुकूलता आहे संसारात शुभकारक घटना घडतील शुभ दिनांक २२–२३.

**महिलांना** : नोकरीच्या बाबतीत अपेक्षित यश पदरात पडेल

**विद्यार्थ्यांना** शालेय जीवनात चांगली संगत मिळेल.

**कन्या : स्वास्थ्य गवसेल**

अकरावा शनी, वहावा रवी, नववा गुरू व राशीत राहू अशी छान ग्रहांची एकूण कृपा तुमच्यावर आहे. गडबड, धावपळ, गर्दी ही तुमच्या राशीची खास वैशिष्टये आहेत. ती सतत तुमच्याबरोबर असतात; पण आता तुमच्या अनेक अपेक्षा सफल होणार आहेत. प्रामुख्याने अनेक महत्त्वाची कामे पार पडलेली आहेत त्यामुळे अपेक्षापूर्तीचे समाधान व त्यामुळेच मिळणारे स्वास्थ्य गवसणार आहे आर्थिक बाजू भक्कम नसली तरी गरजेपुरता पैसा त्रासाशिवाय उपलब्ध होणार आहे. रेंगाळत पडलेली अनेक कामे मार्गी लागतील नोकरीत वरिष्ठांच्या कृपेने झुकते माप तुमच्याकडे झुकणार आहे. त्यामुळे तोटा थांबेल खर्चावर नियंत्रण राहील. लोकात आदर निर्माण होईल अनेक कामे स्वतःच्या सामर्थ्यावर होतील. आरोग्य चांगले राहील कार्यक्षमता वाढेल. मन आनंदी राहील शुभ दिनांक १८–२४

**महिलांना** : आरोग्याची सर्व प्रकारची तक्रार दूर होईल.

**विद्यार्थ्यांना** . हुशारीमुळे अनेकाना हवे-हवेसे वाटाल

**तूळ : नोकरीत अनुकूलता**

राहूसारख्या त्रासदायक ग्रहाने व्ययस्थानी प्रस्थान ठेवल्यापासून तुमचे सारे कर्तृत्व अधारात चाचपडत आहे. जे जे करायला जावे ते ते अर्धवट राहात आहे, पण शनि अंशत अनुकूल आहे त्यामुळे या सर्व अडचणी-तून देखील तुमची अपेक्षापूर्ती होत आहे या वेळी रवि भाग्यस्थानी आला आहे. तो तुमच्याबाबतीत अनेक महत्त्वपूर्ण घटना घडवणार आहे. नोकरीत सारे मनासारखे घडेल असे नव्हे, पण कोठे काही दिवस वरिष्ठाकडून तुमच्याकडे जे दुर्लक्ष होत होते ते आता सपणार आहे. पुन्हा चागले सबंध प्रस्थापित होणार आहेत. बेकारीचे सकट टळणार आहे. कलावत लोकाना चागले दिवस येणार आहेत लोकप्रियता मिळणार आहे. नवी कामे मिळणार आहेत. प्रवास होणार आहे. परदेशी जाण्याची सधी देखील मिळू शकेल. शुभ दिनाक २०–२३.

**महिलाना** ' महत्त्वपूर्ण असा एखादा शैक्षणिक कोर्स घेता येईल.

**विद्यार्थ्यांना :** अगात असलेल्या गुणाना वाव मिळेल.

**वृश्चिक : पैसा मिळेल**

आजवर तुम्ही आर्थिकदृष्टया फार कट-कटीत दिवस काढले आहेत आता ही परिस्थिती पालटणार आहे. रवि आठवा आहे तो लॉटरी–रेस यांपासून लाभ घडवू शकेल. व्यापारी वा दलालीच्या क्षेत्रात अचूक अदाज ठरून भरपूर कमिशन मिळवू शकाल उद्योगात अडचणी नाहीत. नवीन भाडवल गुतवून रखडलेला उद्योग वर आणू शकता. व्यापारात या वेळी तुमचे बरेच हित होणार आहे. नोकरीत वरचष्मा राहील. प्रमोशन–बढती असे काही तरी होऊ शकेल. वरिष्ठ दर्जाचे अधिकार हाती येतील. ज्याच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्याच्या नोकऱ्या कायम होतील. बेकारीची परिस्थिती आता उरणार नाही. जे प्रयत्न केले जातील त्याला अपेक्षित यश मिळेल. शुभ दिनाक १९–२१.

**महिलांना :** घरात उद्योग करून नोकरीचे जमेल.

**विद्यार्थ्यांना :** नवीन मित्र मिळतील. अभ्यासात मन रमेल.

**धनू : प्रगतीकडे घोडदौड**

चद्र–रवीचा प्रतियोग असला तरी तुमचे वजन व प्रतिष्ठा वाढणार आहे अनेकाचे सहकार्य मिळवून तुम्ही तुमचे इच्छित कार्य पार पाडू शकता तब्येतीची कुरकुर तशी मधूनमधून चालू राहिली तरी फारशी काळजी करण्याचे कारण नाही. सहावा गुरु आर्थिक बाजू सावरून धरण्याचे प्रयत्न यशस्वीपणे करणार आहे. दुय्यम धद्याबद्दल मध्यतरी तो उबग निर्माण झाला होता तो आता दूर होईल. नव्या उमेदीने काही तरी विशेष अशी प्रभावी योजना आखून उद्योग पुन्हा उभा कराल त्यात यशही येईल. एकदरीत सारे बस्तान ठीक असेल कर्तृत्वाची सधी मिळेल व ते कर्तृत्व वरिष्ठाना मान्य करावे लागेल. अचानक धनलाभाचे योग आहेत. रेस–लॉटरीपासून लाभ सभवतो शुभ दिनाक १८–२१

**महिलाना :** अनेक प्रकारच्या अडचणीवर मात कराल.

**विद्यार्थ्यांना** . मन प्रसन्न राहून अभ्यासात लक्ष घाला.

**मकर : विरोधक कमी होतील**

आजवर तुम्हाला जे शनीचे पाठबळ होते ते आता कमी कमी होत आलेले आहे व त्याची उपकारकता देखील तुमच्या वाटयाला आता फार काळ येणे नाही सध्या तुमचे सारे तत्र गुरूच्या हाती आहे व भाग्यस्थानी असलेल्या राहूबरोबर त्याचा योग होत आहे. त्यामुळे विरोधक कार्यक्रम करण्यात तुम्ही सारेच यश मिळवाल सयमाची व स्नेहशील वागणूक तुमच्या पथ्यावर पडेल नोकरीत वरिष्ठाच्या विरुद्ध काही करू नये. कारण तो डाव उलटण्याची शक्यता आहे. मात्र तुमचे स्वतत्र कर्तृत्व दिसून येईल व त्याचा तुम्हास फायदाही होईल राजकारणात तुमची सरशी होणे जरा कठीणच आहे तुम्ही अजून काही दिवस राजकारण व समाजकारण यापासून दूर राहणेच योग्य होईल. आर्थिक बाजू भक्कम राहील व उद्योगधदा यशस्वी रीतीने उभा करू शकाल शुभ दिनाक. २०, २३.

**महिलाना** . सर्व प्रकारची तब्येतीची तक्रार दूर होईल

**विद्यार्थ्यांना :** आळस कमी होईल. त्रास कमी होईल.

**कुंभ : हितकारक घडेल.**

कोणत्या ना कोणत्या विचाराने तुम्ही तुमचे मन उगीच शकेत अडकवून ठेवू नका सध्या तुमचे दिवस ठीक आहेत चागल्या दिवसाची चाहूल येत आहे व सप्ताहा-पासून तुम्हाला त्याची जाणीव होऊ लागेल तुमचा पिड उद्योगाचा आहे हे खरे; त्याचबरोबर राजकारण हेही तुम्हास प्रिय आहे या दोन्ही क्षेत्रात आता अडचणी उरलेल्या नाहीत तुम्ही जे ठरवाल ते पार पडेल त्याला अनेकाचे सहकार्य व आशीर्वाद मिळतील. स्वतत्र उद्योगाची कल्पना साकार होईल पैसा व तत्राज्ञाची मदत उपलब्ध होईल व्यापारात मागील तोटा भरून निघेल मदीचा त्रास शिल्लक राहणार नाही. नोकरीत वाईट दिवस आता सपलेले आहेत वरिष्ठाचा समज तुमच्याबद्दल चागला असेल त्याच्या मदतीने एखादे स्वप्न पुरे होईल पैसा व प्रतिष्ठा या दोन्ही बाजू भक्कम होतील. आरोग्य सुधारेल शुभ दिनाक. २१–२४

**महिलाना** नोकरीत त्रास होणार नाही. बदलीची शक्यता

**विद्यार्थ्यांना :** भविष्याने मन प्रसन्न राहील

**मीन : कर्तृत्वास सधी.**

राशीस्वामी गुरु तिसरा आहे ही एकच घटना खरे तर तुमच्या बाबतीत पुरेशी समाधान देणारी आहे वाचन, लेखन, चिंतन व अध्यापन हे तुमचे आवडते विषय. यात तुमची बुद्धी चमकेल आता गुरूची तुमच्यावर भरपूर कृपा असल्यामुळे या वेळी जे मनात आणाल ते पुरे करण्याचे सामर्थ्य तुम्हास लाभणार आहे प्रामुख्याने नव्या-नव्या क्षेत्रात सधी मिळणे हे मोठे काम या वेळी होणार आहे. नोकरीची परिस्थिती फारच समाधानकारक राहील त्रास कमी होईल कामाचा ताण पडणार नाही. जे मनात असेल ते घडेल वरिष्ठाची मर्जी राहील बेकाराना नोकरी मिळेल फक्त ती तात्पुरती आहे अवघड जागी बदली झालेल्याना जर बदली करून घ्यायची असेल तर अनुकूलता आहे. पैसा, प्रतिष्ठा, कीर्ती या वेळी तुमच्यावर खूष आहेत इच्छा–आकाक्षा–सफल होतील शुभ दिनाक–२०–२१.

**महिलांना :** स्वप्न सफल होईल. आशा पालवतील

**विद्यार्थ्यांना** अभ्यासास नव्या उमेदीने सुरुवात होईल ☐